साळअखेर '' ७ '' ८८
किरकोळ अंकास ............ ८४

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस.... ०१०६
दुसरे खेपेस ........ ०१

Single copy........................ 4 as.

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over 10...4 as.
Repitition per line 3 as.

THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII AKOLA MONDAY 1 OCTOBER 1894 NO 39

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख १ माहे अक्टोबर सन १८९४ इ० अंक ३९

## सर्व नजरबंदीच्या माकडचेष्टांस ह्मणून पाडता येते.

मी रस्त्यांत जेव्हां लोकांडी खात चालत असे तेव्हां लोकांनीं माझ्याकडे बोट दाखवून हिणवावें कीं पहा काय बेटा झिंगून गेलेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुह्मासही खास त्यांच्या सारखेंच वाटलें असतें. परंतु ते सर्व चुकत होते. भर रस्त्यांत मला चालतांना झोकांड्या येतात ह्मणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुष्यक्रमाचे पूर्व मार्गावर थोडेसें गेलें पाहिजे.

आज तागाईत एखाद्या आनंदी व रंगेल मनुष्या प्रमाणें मी सुखी प्राणी होतो परंतु चार पांच वर्षांपूर्वीं मला वाटूं लागलें कीं माझ्यांत कांहीं कांहीं तरी कमी जास्त होत आहे. जेवतांना पूर्वीं सारखी माझी क्षुधा राहिली नव्हती. मला भूक लागे व खाण्याची इच्छा होई परंतु तोंडांत घास गेला कीं लागलीच पक्वाशय उमळून येई व जसें कांहीं बंडावा करून माझ्या हेतूस ह्मणून पाडी. हें मला अरिष्ट नवीनच व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां ह्मणून खाण्याचा भाव घाली तेव्हां तेव्हां मला फारच तिटकारा येई. कदाचित पोटांत कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाटतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्यामुळें निजायाला जातांना आपल्यास जशी सुस्ती चढून थकवा येतो त्या प्रमाणें मला होत असे. ह्या मुळें रात्री झोपेचा कल अगदीं बदलला. झोप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्या सारखें मला वाटे त्यामुळें मी केव्हां केव्हां अफू किंवा इतर अमली पदार्थ घेत असे. मी जीभ पहातों तों तिच्यावर थर जमलेला आणि काम करण्याची होस बिलकूल नाहींशीं झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठींत सपाटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खांद्यांत भाला टोंचल्या सारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तों माझे डोळे पिवळे दिसूं लागले. आणि माझ्या दांत व हिरड्या सभोंवती कीट जमलेला दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्यामुळें किंवा इतर साधनें दांताजवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येई. माझा कोठा फारच जड झाला आणि पक्वाशयांत घाणेरडा वायू उत्पन्न होऊन तोंडावाटे ढेंकर देतांना जिवून जाई. ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं. ह्या वेळीं रस्त्यांत चालत असतां एकदम घेरी यावी, हलक वाटावें. आणि गरगर फिरल्या सारखें वाटून लोकांच्या देत चालावें व जमिनीवर सबशेल पडून नमस्कार घालावा लागत असे. माझ्यानें हें विघ्न जितकें टाळतां येईल तेवढें टाळून घेई व आतां तें गेलें असें समजून ते दिवस घालवीत असे.

माझ्या मित्र मंडळीनें व वैद्यानें जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तीं घेतलीं. त्या पासून गुण न येतां मी अगदीं सुद्यामदेव झालों. व आतां ह्या वस्तीस रामराम ठोकून परलोकिचा रस्ता धरावा असें मला वाटूं लागलें. ह्या प्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुह्मास थोडक्यांत निवेदन करितों कीं, बरा कसा झाला ह्याचें कारण आपणास कळवावें हें अगदीं रास्त आहे. लंडनात माझा एक स्नेही होता. त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्या बरोबर त्यानें सांगितलें कीं, मदर सिजेलचा रोगहारक सिरपा ( ह्मणजे माता सिजेलचा रोगहारक पाक ) तुह्मास फारच गुणकारी होईल.

माझा कांहीं त्याच्या ह्मणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक बाटली तर थोडे दिवस घेऊन पहावी ह्मणून विचार केला. मला ह्या औषधा पासून इतका जलद गुण आला कीं, मला खातांना बरें वाटलें व झोंप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्यामुळें इतकें बरें वाटलें कीं, मी ह्या औषधाच्या आणखी चार बाटल्या पार केल्या.

मी बरा झालों. हें औषध दैविका सारखें वाटलें. मला खचित वाटलें कीं, हें औषध ईश्वराच्या प्रेरणेनेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हां ताजातवाना झालों व त्या मुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगतां पुरवत नाहींत. आतां केव्हां तरी थोडेसें अपचन झालें कीं, जें सर्वांस होत असतें, त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतों व लागलींच मला त्या पासून आराम वाटतो.

ह्याचा तात्काळ गुण असल्या मुळें मला नजरबंदीच्या खेळांची आठवण होते. परंतु खरोखर माता सिजेलचा क्युरेटिव सिरपांत डोळ्यांत माती टाकण्या सारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगतां येतें कीं, कितीही जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थिती पासून असो तरी ह्या औषधा पासून हटकून गुण यावयाचाच.

मी तुमचा उपकार मानणारा.

( सही ) जे. सी. सिमसन.

११ ब्रानोबरचा रस्ता, न्युकास्टल अंडर लाईन, स्टाफर्ड शिपर इंग्लंड.

B. T.

नाहिरात.

सर्वत्र लोकास खाली सही करणार यांजकडून जाहिर केलें जातें कीं रा. रा. मारुती खुशाल नाईक राहणार पिंपळगांव यास आह्मी कुलमुखत्यार नेमिले होतें. त्यांस आम्ही कुलमुखत्यारीचे कामावरून दूर केलें आहे हें सर्वत्रास कळावें ह्मणुन दिल्ही जाहीरात सही तारीख २६ माहे सपटंबर सन १८९४ इसवी.

सही

सही देवकर्ण गिरधारी लाल मालक गिरधारीलाल देवकर्ण दुकान पिंपळगांव काळे दस्तुर खुद

## विजयादशमीचें सानें

( मागील अंकावरून पुढें चालू )

And that she nursed him ic a cave,
And how his madness went away,
When on the yellow forest-leaves
A dying man he lay;
—His dying words—but when I reach'd
That tenderest strain of all the ditty,
My faltering voice and pausing harp
Disturb'd her soul with pity!

All impulses of soul and sense
Had thrill'd my guileless Genevieve;
The music and the doleful tale,
The rich and balmy eve;

And hopes, and fears that kindle hope,
An undistinguishable throng,
And gentle wishes long subdued,
Subdued and cherished long!
She wept with pity and delight,
She blush'd with love, and virgin shame;
And like the murmur of a dream,
I heard her breathe my name.

' शिलेदार जरि सावध झाला, हतदैवानें अनर्थ केला, मृत्युसमय तो निकट पातला, उद्बोधी तो मग त्या सतिला, मरण समयिंचे ' शब्द तयाचें ' — सर्वसार तें मद्गीताचें, स्खलद्रवें वदणार सतीला, गद्गद कंठहि भरोनि आला, तंत्री वाजविता कर हटला, विव्हल मानस होउनि पाहे, दुःखावेग न तन्मन साहे, चंचल चित्तें ती मजला निरखी कांता ॥९॥ मधुर इ० ॥

अंतःकरणावेग नावरे, अस्थिर चेतोवृत्ति बावरे, दोन सखी मग टकमक पाही सुचेना कांहीं, —सुस्वर माझें गीत, कथा ही अनिष्ट दावी, संध्याकाळ विचित्र सुनिर्मळ— आद्याशतपवनानें उठती, असंख्य लहरी सखिच्या चित्ती, साध्वस नाना परिचें येती सखिच्या चित्तीं सुखदुःखाशा एकच गोंधळ, इप्सित शत ते मानसि होते या गीतानें बाहेर पडू पाहाति आतां ॥१०॥ मधुर

करुण कृपाघन सखिचा वळला, दयामारुतें उंचबळला, घळघळघळ ते सखिच्या नयनीं, तोषा श्रूचे पाट वाहुनी, उज्वल वदनसरोज सखीचें, प्रेमभरें लज्जाकुल साचें, कौमार्यभाव तें दिव्य मनोहर, स्फुरती वदनीं शब्दहि सुस्वर, मदभिवान तें हलके बाहे, तिर्यङ् नयनें मजला पाहे, स्वप्नी जैसा तरुचा मर्मररव वाटावा, जणा खरोखर, तसा मला आभास जाहला, चित्तीं माझ्या तोष दाटला, असा न पूर्वी मोदपूर आला मम चित्ता ॥ मधुर कथा ॥ ११ ॥

( आमच्या एका मित्रा कडून )

जिल्हा वासीम ता० २३।९।९४

हवामान— गेले आठवड्यांत पाऊस चांगला झाला. आता पावसा बद्दल तक्रार राहिली नाहीं. पिकें उत्तम आहेत. पुसद तालुक्यांत तुरळक तुरळक महामारीचा आजार आहे. बाकी ठिकाणीं कोठें ही नाहीं.

येथील सीव्हिल सरजन ह्यांची स्वारी उमरखेड व पुसद येथील दवाखान्यांची तपासणी करण्याकरिता तिकडे गेली आहे.

विजपडून मेला—तारीख १५ मिनहु रोजी वाशीमास डे० कमीशनर कचेरीचे पुर्वेस एक झाडावर विज पडली त्या झाडाखालीं एक मुसलमान शिपाई उभा होता. तो मेला त्या वेळीं त्यांस कोणी पाहिलें नाहीं. त्याचें प्रेत दुसरे दिवशीं सकाळीं रस्त्यांनीं जाणारांस दिसलें. नंतर त्याचा कपास होऊन तो विजेनें मेला असें ठरलें.

मोठी दुखापत— वाशिमाहून दोन अडीच मैलांवर कांटे म्हणून पालमपट गांव आहे तेथील मुसलमान पाटलानें एका औरतेस मारण्याचा प्रयत्न केला होता. त्यानें त्या औरतेस दोन वार करून आपले पोटांत तरवार खुपसून घेतली होती. ही बातमी येथील सिव्हील सरजन ह्यांस आल्यावर ते व हास्पीटल असिस्टंट हे तेथें गेले होते. त्यांनीं त्या दोघांस ही तेथच्या तेथें जरूरीचा इलाज करून वाशिमास दवाखान्यांत आणिलें हल्लीं तीं दोघेही बरीं आहेत.

जिल्हा नाझर कचेरींतील कोणी बापूराव मालेगांवकर नावाचे पंधरा रुपयाचे कारकुनास कमी करून १२ रुपयावर डे. कमिशनर साहेब ह्यांचे मराठी दफ्तरांत बदल्या बद्दल समजतें.

तारीख ११ मिनहू रोजी येथील जिल्हा बोर्डाची सभा होती. त्या वेळीं रा. रा. गणेश बापूजी ए० अ० कमिशनर ह्यांस जिल्हा बोर्डाचे व्हाईस चेअरमन निवडलें. ह्यांनीं बरेच दिवस अकोल्यास जिल्हा बोर्डाच्या चेअरमनच्या जबाबदारीचें काम उत्तम प्रकारें केलें आहे. त्या वरून आमच्या जिल्ह्यांत कांहीं कमीपणा त्यांस आढळून आल्यास तो ते काढून टाकतील अशी आशा आहे. ह्या बोर्डानें सर्व तालुक्यांस सारख्याच पगारावर वर सब ओव्हर शियर न नेमतां एक ३० दुसरा ४० व तिसरा १० वर नेमण्या बदल शिफारस केली आहे. आमचें मतें ही कल्पना बरी आहे; कारण ह्या पासून खालच्या मनुष्यांस बढती मिळण्याचे आशेनें चांगलें काम करण्याचा हुरुप येतो. ही व्यवस्था इतर जिल्ह्यांत ही केला असतां ह्या पासून चांगला परिणाम होईल.

येथील अ. कमीशनर लेफ्टेनंट मारीस हे उमरावतीस परीक्षे करितां गेले होते ते उद्या इकडे येऊन इंगोलीस तेथील मुकदमे चालविण्या करितां जातील.

मेहेरबान डे. ए. इन्स्पेक्टर साहेब ह्यांची स्वारी मंगरूळ येथें आहे.

मे० ए० इनस्पेक्टर साहेब यांची स्वारी ७।८ दिवसांत वाशीम येथील शाळेची परिक्षा घेण्या करितां येईल, असें समजतें.

रा० रा० केळकर येथील इं० म० शाळेचे हेड मास्तर यांनीं पहिले रजेस लागून दोन महिन्यांची जास्त रजा घेतली त्यांचे रजेंत पहिली व्यवस्था कायम ठेविली आहे.

तारीख १ अक्टोबर १८९४ रोजीं जिल्हा स्यानिटरी बोर्डाची सभा आहे त्यावेळीं मे० स्यानिटरी कमिशनर व एक्झीक्युटीव इंजिनियर हे येणार आहेत. वासीम येथील म० शाळेंच खालचे वर्ग करितां ९ हजार रुपये खर्चून एक इमारत वाशिमास शुक्रवार पेठेंत व्हावयाची आहे. तिचा पाया खोदण्यास सुरवात झाली.

## बंगाल प्राव्हिन्सीअल रेलवे कंपनी

हिंदुस्थानांत नेटिवानीं सुरू केलेले रेलवे कंपनीची हकीकत, आपले पत्राचे वाचकांस उपयुक्त होईल, असें जाणून आपलेकडे पाठविली आहे.

ही कंपनी बंगाल्यांत "बंगाल प्राव्हिन्सीअल रेलवे कंपनी" ह्या नांवाची कलकत्यास स्थापन झाली आहे ह्या कंपनीचे उद्देश हिंदुस्थानांत व विशेष करून बंगाल्यांत लहान लहान रेलवे किंवा वाफेच्या ट्रामवे करण्याचा आहे.

पहिले काम—बंगाल्यांत हुगळी जिल्ह्यांत ३० इंच गेजची हलकी रेलवे इस्ट इंडियन रेलवेच्या तारकेश्वर स्टेशन पासून मुग्रागंज पर्यंत नेऊन तेथून त्रिवेणी घाटापर्यंत न्यावयाची आहे. ता० १९ सप्तेम्बर १८९४ चा जो रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून असें समजतें कीं, हिची लांबी ३१ मैल आहे. ही सर्व लाईन बहुतेक तयार झाली आहे. फक्त तीन पूल पुरे व्हावयाचे आहेत ते पुरे होऊन ही सर्व रेलवे दिसेंबर १८९४ अखेर तयार होईल असा अदमास आहे ह्या पैकीं तारकेश्वर पासून बासुआ पर्यंत १९॥ मैल रस्ता तयार होऊन गाडी सुरू करण्यास सरकारची परवानगी मागितली आहे ती मिळाली ह्मणजे आक्टोबर १८९४ मध्यें ह्या दोन गांवांचे दरम्यान गाड्या जाऊं येऊं लागतील.

ह्या कंपनीचें भांडवल आठ लाख रुपयांचें आहे तें वाढवून साडे आठ लाख रुपयांचे करण्यांबद्दल डायरेक्टर लोकांचा ठराव झाला आहे. प्रत्येक भाग दहा रुपयांचा आहे. पहिले भागीदार आहेत त्यांस हे नवीन भाग द्यावयाचे आहेत आणि त्यांस पुरून शिल्लक राहिल्यास इतरांस मिळतील. ह्या कंपनींत सर्व नेटीव लोक आहेत व सर्व हिंदुस्थानांत अशा प्रकारची कंपनी ही पहिलीच आहे. हिच्या कामांत सर्व गोष्टी नवीन असल्यामुळें बऱ्याच अडचणी आल्या असतील त्या सर्व नाहींशा करून येथपर्यंत कंपनीनें मजल आणिली हें व्यवस्थापकांस भूषण आहे. कोणास त्याबद्दल कांहीं माहिती पाहिजे असल्यास ती सदर कंपनीचे सेक्रेटरी बाबू अमृत लाल राय, ३०० बो बाजार स्ट्रीट कलकत्ता ह्या पत्यावर पत्रव्यवहार करून मागवून घ्यावी.

वऱ्हाडसमाचार

मित्ती आश्विन शुद्ध २ शके १८१६

म्हैसूर संस्थानांत लग्नांतील वधुवरांच्या वयाच्या संबंधानें एक कायदा होत आहे तो असा कीं मुलीचें लग्न तिच्या वयाचे आठव्या वर्षां खालीं होऊं नये आणि पन्नास वर्षांच्या पुरुषानें चौदा वर्षां खालील वयाच्या मुलीशी लग्न करूं नये. सामाजिक सुधारणा नेटीव संस्थानांत होण्यास पुष्कळ साधनें अनुकूल असतात. देशी संस्थानांत सामाजिक विषया संबंधानें कायदे झाले तरी त्या पासून हितच आहे. वरील कायदा सुधारणेची दिशा दाखवितो आणि त्याची ही मजल सुधारणेच्या तळाच्या पायरी पर्यंतची आहे तेव्हां अशा कायद्याच्या धोरणा वर आमच्या मुलखांतील लोक निरनिराळ्या समाजांच्या द्वारें या क्षुल्लक, निकृष्ट व जरूरयात सुधारणा अवश्यमेव करितील अशी आम्ही उमेद बाळगतों. किंबहुना त्या आपोआप होत ही आहेत.

---

पुण्यास दंगा झाल्याचे ऐकून आह्मांस फार वाईट वाटलें. हिंदुमुसलमानांच्या तंट्यामुळें सरकारला आपली कारवाई गाजविण्याला चांगलें फावतें! दोघांचा तंटा लागला ह्मणजे कधीं कधीं तिसऱ्याचाच फायदा होतो त्या धोरणाला धरून सरकारची राजनीती असते तेव्हां तिला वरील प्रकारच्या दंग्यामुळें नवीन स्फूरण चढतें. मुंबईच्या दंग्यानंतर पुण्याच्या जाहिरसभेनें सरकारास विनंती केली होती त्याप्रमाणें हिंदुमुसलमानांचे हक्क व वहिवाटी नियमित करून टाकल्या असत्या ह्मणजे हा दंगा उसळला नसता. इंग्रजी मूळ राजनीति मध्यस्त प्रमाणें इंडियांत असली तथापि सरकारी अधिकारी एका पक्षाला उचल व उत्तेजन देऊन नारदमुनीचें वर्तन करितात. मुंबई, येवलें, रावेर वगैरे प्रकरणीं अधिकाऱ्यांचें वर्तन मुसलमानाला चढविण्याचें होतें आणि पुण्याच्या नागोबाच्या प्रकरणांत देखील मुसलमानांची समजूत बुद्धीपूर्वक चालू दिली. दंग्याचीं कारणें सजीव असतांना कायें घडणार नाहींत हें सृष्टीधर्माविरुद्ध व्हावें कसें? उत्तर हिंदुस्थान, बंगाल वगैरेकडे गोरक्षणा निमित्त धुमाकुळी अशाच मुळें चालूंच आहेत हें सर्व प्रकार अधिकाऱ्यांच्या स्वैरगामी वर्तनामुळें घडतात.

---

अकबर बादशहाच्या कारकिर्दींत हिंदुमुसलमान एक होते तर इंग्रजा सारख्या तिऱ्हाइत राजछत्राखालीं खरोखर उभय धर्मवाल्याचें समीलन लवकर झालें पाहिजे. परंतु प्रांतिक सरकारचीं धोरणें कलहप्रवर्तक असतात आणि त्यामुळें हीं अरिष्टें एकावर एक आदळत आहेत. लार्ड हारिस या मुंबईचे गव्हर्नरांचे तारे 'मराठा' या वजनदार पत्रावर तुटतात आणि पिनलकोडा सारख्या बहुव्यापक कायद्यानें त्यांस पुरेसें बळ मिळत नाहीं ह्मणून पोकळ ठराव प्रसिद्ध होतात हें एक कली वर्तनाचें दर्शक नव्हे काय?

---

पुण्यास हल्लीं जी धरपकड व धामधूम चालू आहे व कित्येक थोरथोर व सरदार घराण्यांतील नातू सारख्या लोकांवर पोलीस आपला हात चालविते हें फार वाईट होय. लोक विथरले ह्मणजे काय होईल याचा नेम नाहीं. धर्माच्या वहिवाटींत व प्रकरणांत सरकारनें एकतर्फीपणा केला ह्मणजे दंग्याचें निराळें बिजारोपण झालें असें ह्मणावें लागेल. तसेंच वाई, सोलापूर, नगर इत्यादि ठिकाणीं चळवळी चालू आहेत हें ठीक नाहीं. हें दंग्याचें वादळ फार मानत चाललें आहे आणि याचा सर्व देशभर प्रसार झाला म्हणजे इंग्रजी राज्य व हा देश निमिषमात्रांत लयास जाईल. ईश्वर करो, महाराणी सरकारचें राज्य चिरकाल राहो व आह्मा प्रजाजनांचें नीट संगोपन होवो!

---

हिंदुमुसलमानांनीं परस्परांस बुद्धिवाद व शास्त्रार्थ सांगण्याचा वेळ निघून गेला! उभयतांतील बरवरच्या वर्गांतले लोक एकदिलानें राहतात तथापि शेवटील प्रतीचे लोकांत हें भांडण मिटणार नाहीं. डोळ्यापुढें गोष्टी घडतात त्या घातुक व विकोपाला नेण्या सारख्या असल्या म्हणजे वेदान्त गुंडाळून ठेवावा लागतो. राज्यकर्त्यांनीं आपली अधिकारनौका समतोलपणानें व लाटावर लाटा उसळूं न देतां शांतपणानें चालविली तरच निभाव लागेल हल्लीं पुण्यास पोलिसांच्या भयंकर पैरवीनें व न्यायाधीशांच्या सुलतानीनें लोक हवालदील झाले आहेत! हा प्रकार अत्यंत वाईट आहे आणि त्याचें अनुकरण इतर प्रांतांत न होवो ह्मणजे झालें.

---

## जठार वैजयंती.

राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार बी. ए. सी. आय. इ. डायरेक्टर आफ पब्लिक इनस्ट्रक्शन, मुलुख अमानी हैद्राबाद यांची चाकरी गेल्या २४ वे तारखेस संपूर्ण होऊन त्यांस पेनशन देण्यांत आलें. त्यांच्या अत्युत्तम सेवेचा गौरव करून त्यांचा निरोप घेते वेळीं आलिशान रेसिडेन्ट मि. प्लौडन यांनीं आपल्या जाहा हुकूमानें राव बहादूरांचें अभिनंदन आनंदपूर्वक व प्रेमपुरस्सर केलें आहे. हा जाहा हुकूम 'जठार वैजयंती' या संज्ञेनें आमच्या शाळाखात्यांच्या इतिहासांत सुवर्णांलंकृत अक्षरांनीं लिहिला जाईल. राव बहादूर नारायण भाई दांडेकर यांनीं ज्या यशश्रीचा पाया घातला, व जिचा जयध्वज 'जठार वैजयंती' या सदरा खालीं फडकत राहील, त्या यशश्रीचा मनोहर दुर्ग, व लोकप्रिय किल्ला रावसाहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन उभारतील आणि त्या सुखसेव्य सुस्थळीं रा. रा. विष्णु मोरेश्वर माहाजनी एम. ए. यांची स्थापना होऊन लोकवृंद कालवर्षी आनंद पावेल असें आम्ही भाकीत करितों!

---

येत्या नोवेंबरांत व्हाईसराय लार्ड एल्गिन हे लाहोरास मोठा दरबार भरविणार आहेत. हा दरबार भव्य, श्रीमती डामडौलाचा, व राजवैभवाला अनुरूप असा होणार आहे. एवढ्या खर्चाच्या दरबाराची जरूरी दिसत नाहीं. परंतु राजा बोले आणि दळ हाले या प्रमाणें सर्व प्रकार आहे. खजिना रिकामा असला व लोक करा खालीं चिरडले तरी अवाढव्य खर्चाला कोणत्याच दिशेनें कांहीं धरबंध नाहीं हें मोठें दुर्भाग्य होय!

काश्मीरच्या महाराजास सर्व राज्याधिकार व पूर्ण मालकी या लाहोरच्या दरबारांत देण्यांत येईल तर कांहीं थोडें दुःखांत सुख वाटेल. लार्ड लान्सडाऊन यांनीं महाराजास पदच्युत १८९१ त केलें. पुढें अडीच वर्षांनीं त्यांस पोकळ मुखत्यारी दिली व कौंसिलचा कारभार चालूं केला. परंतु रेसिडेंटच खरे महाराज व सत्ताधारी बनले आहेत. गेल्या तीन वर्षांत काश्मीरचें दरबार पुष्कळ सुधरलें असून प्रजेच्या हिताच्या गोष्टी सुयंत्र व सुरळीत चालतात. लार्ड क्रास व लार्ड लान्सडाऊन यांनीं रेसिडेंटाची पातशाही दूर करण्याचें अभिवचन पूर्वीं दिलें आहे आणि सांप्रतच्या सुस्थिती वरून एक उत्तम दिवाण नेमला ह्मणजे तें संस्थान नीट चालेल तेव्हां वरील वचन खरें करण्याचा योग निराळा तो कोणता पाहिजे. परमेश्वर करो लार्ड एलजिन यांस ही सद्बुद्धी होवो!

---

आलिशान रेसिडेंट मि. प्लौडन यांची कारकीर्द हैदराबाद दरबाराला चांगली लाभली हें कळविण्यास आनंद वाटतो. मि. प्लौडन साहेब यांचे कर्तृत्वानें त्या संस्थानचे राज्यकारभार अगदीं सुयंत्र झाला असून लांचलुचपत, अन्याय, अंधळी राजनीती व दुर्व्यवस्था यांचा संपूर्ण बीमोड करण्यांत आला. मि. प्लौडन यांच्या तंत्रानें निजाम सरकार वागले व ते जाते वेळीं सुप्रसन्न होते ही गोष्ट त्या नेटीव दरबारचा भाग्यकालच समजला पाहिजे. काश्मीर संस्थानची आठवण लोकांस होऊन हैदराबाद संस्थानाविषयीं मोठी भिती वाटत होती पण सर्व अरिष्ट टळलें इतकेंच नाहीं तर पुढील राज्यकारभार उत्तम चालेल अशी शाश्वती आली. मि. प्लौडन यांच्या वेळीं अनेक कारस्थानें व दरबारांत पादाक्रांती झाल्या आणि त्यांचा शेवट गोड झाला हें पाहून आह्मी आलिशान रेसिडेंट यांचा धन्यवाद गातों.

आलिकडे एक गोष्ट सुमार झाली आहे ती अशी कीं युरोपियन आफिसरांचें प्राबल्य त्या दरबारांत फार माजलें आहे! नवीन हुद्देदार गोरे लोक या पुढें नेमले जाऊं नयेत. या गोष्टीकडे आमचे निजाम सरकार लक्ष्य पुरवितील असें आह्मी इच्छितों.

---

हिंदु देवस्थानांच्या संबंधानें मद्रासेस एक महत्वाचा प्रश्न निघाला आहे. देवस्थाना करितां जीं उत्पन्नें पूर्वीं पासून चालत आलीं आहेत त्यांचा योग्य व्यय न होता पापिष्ट व कुपात्र रक्षकांच्या हातीं गेल्यानें तीं देवस्थानें कमीपणाला पावतात असें पुष्कळ ठिकाणीं दृष्टीस पडतें. हें दुर्व्यवस्थेचें व पापमूलक अपव्ययाचें बंड मोडावें आणि देवस्थानांची देखरेख खुद्द जिल्हा अधिकाऱ्याकडे सोंपवावी आणि त्यांच्या तंत्रानें पंचमंडळी किंवा तसेच ग्रामस्थ विश्वसनीय लोक यांनीं देवस्थानें चालवावीं अशा मतलबाचा कायद्याचा मसुदा मद्रास सरकारा समोर आहे. त्यावर हिंदुस्थान सरकारचा असा अभिप्राय पडला कीं १८६३ सालीं या बाबदींत जो कायदा पसार झाला आहे त्याचें मूलतत्व असें आहे कीं धर्मप्रकरणा मध्यें किंवा तत्संबंधी देवस्थाना मध्यें सरकारचें अंग उपयोगी नाहीं; सरकारांतून देवस्थानांची व्यवस्था होत जावी असा लोकांचा सार्वत्रिक मानस आहे असें वाटत नाहीं; त्या अर्थीं या मसूद्यावरील विचार तहकूब ठेवावा. परंतु

सरकाराकडे लोकांची मागणी झाली तर देवस्थाना निमित्त होणाऱ्या कागदपत्रांत व फिर्यादीअर्यांदींत स्टांपाचा खर्च अगदीं कमी केला जाईल म्हणजे त्या योगें दुर्व्यवस्था उजेडांत आणण्यास व तिचा बीमोड करण्यास लोकहितवादी जन पुष्कळ पुढें येतील आणि त्यांच्या ही नजरे खालीं देवस्थानेंही उर्जित दशेस येतील. तजवीज करण्या विषयीं हिंदुस्थान सरकारनें पुर्ण अभिवचन दिलें आहे.

आमच्या प्रांतीं हिंदु मुसलमानांच्या देवस्थाना प्रीत्यर्थ पुष्कळ वंशपरंपरेच्या देणग्या आहेत. शेतांची देणगी असली म्हणजे इनाम म्हणतात व एखाद्या गांवाच्या वसूलाची देणगी दिलेली असली म्हणजे तिला जहागीर असें म्हणतात. अशा देवस्थाना प्रीत्यर्थ चालू असलेल्या देणग्या ज्यांच्या वहिवाटींत व उपभोगांत असतात त्या पैकीं शेकडा दहा तरी लोक त्या देणग्यांचा यथार्थ व देशकालाला अनरूप असा विनियोग करितील आणि दात्यांचा उदारपणा विस्तृत करून परमेश्वराचा गौरव भिन्न भिन्न मार्गांनीं वृद्धिंगत करितील अशी आम्हास खात्री नाहीं; देवस्थानांच्या वहिवाटदारांनीं मद्रासे कडील चालकेले प्रयत्न लक्ष्यांत धरावे आणि जेथें जेथें आपलें वर्तन चुकत असेल तेथें तेथें तें सुधारावें हें बरें. वेळेवरच शहाणपण शिकावें यांत मोठेपणा आहे. नाहींतर कायद्याची गदा किंवा लोकांची चौकस दृष्टी या जेथें फिरूं लागतील तेथें कालवशें सुधारणा होत असतातच पण हा प्रसंग आमच्या प्रांतीं येऊं न देण्या साठीं आमच्या देवस्थानवाल्या लोकांनीं झटावें अशी आमची सूचना आहे.

---

## The Berar Samachar

**MONDAY OCTOBER, 1, 1894**

Last Monday was a red-letter day in the educational history of Berar. Rao Bahadur Jatar retired on that day with a very appreciative recognition of his brilliant and conspicuous administration on the part of the local Government. The *Extraordinary* of the Residency Orders notified the honorable retirement and the text itself speaks volumes in praise f the esteemed gentleman and deserves to be written in golden letters.

Such a brilliant record of NATIVE administration is a national gain. The ideals of a successful life may be as numerous as the number of men who hold them but here in the career of Rao Bahadur Jathar a loving and attentive student may find a noble and living pattern for safe guidance and worthy imitation. Let one imagine for a moment what a variety of intellectual powers, what strange arts of pleasing all while sticking to the path of solid truth and what strict observances of occasions of silence with a politic yes or no a man must bring into play to make life successful in the long run.

Before we reproduce the whole notification, we offer once more our heartfelt congratutation to Rao Bahadur Jathar and wish him a long life, health and prosperity.

"With effect from this date, Rao Bahadur Shriram Bhikaji Jatar B. A. C. I. E., retires from Government service and from the post of Director of Public Instruction in Berar, which he has held since the 3rd. of August 1884. During this considerable period Mr. Jathar has administered the important department entrusted to his care to the complete satisfaction of successive Residents, and Mr. Plowden, under whom Mr. Jathar has served for the last six years, cannot permit him to pass into honorable retirement without publicly expressing the high sense which the Resident entertains of the excellent work done by Mr. Jathar during his long and meritorious career."

---

In regard to the Industrial Conference at Poona, the Hindu of Madras takes as its theme the stirring address of the Hon'ble Mr. Ranchodlal and thus gives in an eloquent manner the sum—total of his speech:—

"In concluding an able and thoughtful speech, the President of the Conference appealed to the young men of the country, whom he wished to direct their attention to industrial and commercial occupations instead of the service of Government and profession of law. By developing the industries that already exist and establishing new ones, our countrymen would not only benefit themselves individually but would confer a great boon on the country. Sooner or later this will have to be done, because it is impossible the extremely limited fields of Government service and the legal profession can continue to accommodate the ever-increasing number of young graduates that our Universities turn out. Education produces the natural result of raising the standard of life. Individual and national ambition is inflamed. Educated Indians cannot rest content with the necessaries and comforts that satisfied their ancestors. They are ambitious of rising to a high station in life and wish their nation as a whole to rise from the present state of level pauperism to a state of affluence and power."

---

The Criminal report of 1892—93 is as good a record as its predecessors. It is a full statement of facts interspersed with a few sprinklings of personal opinions which are advanced with the modest silence as to arguments in detail. As an example of what we mean, we may give space to the remark of the Judicial Commissioner wherein he advertises to the signal failure of prosecutions in a great number of cases:—

"It follows that convictions have fallen off by nearly 2 per cent. Akola is again this year lowest in this respect and Ellichpur has fallen from 54 per cent. to 33.6. Every district except Wun, which shows a slight increase has fallen off in percentage of convictions It is impossible to account for this tendency, except by attributing it, to the increasing strength of the Bar or weakness of the Magistrates in Berar. There is no doubt that there is a great want of experienced Magistrates in Berar. The Assistant Commissioners are, almost without exception, young and unused to the methods of native witnesses, and a good many of the Extra Assistant Commissioners are also new to the work. In this fact lies some hope for the future, as time will remove the cause. I am inclined to think that the strength of the Bar is felt to be very great by the majority of our young officers."

Granted that the bar is strong and the bench is weak to cope with. But whose fault it is? To our plain mind, the charge goes home to the Local Government which makes and unmakes Magistrates in its manufactuary.

---

## वऱ्हाड.

हवामान—पावसाच्या आगांतुकपणानें कंटाळा आला. वारा दुष्ट असून हवा कुंद व रोगिट आहे. अनेक दुखणीं चळावलीं आहेत.

---

राव साहेब देवराव विनायक यांस सार्वजनिक कार्याची व लौकिकची मोठी हौस आहे. हिंदु मुसलमानातील भविष्यकालीन दंगे बंद करण्यासाठीं पूर्वसभा भरवून ते जाहिरसभेचा भागिरथप्रयत्न जुळवीत आहेत. कार्यंतरु सुफळ होवो!

---

मलकापुर इंग्लिश मराठी शाळेचे हेड मास्तरचे जागीं रा. रा. पांडुरंग पंत लिमये यांस वणीहून बदललें आणि त्यांच्या ७५ रुपये पगारावर रा. रा. चिंतामण गणेश हेडमास्तर मेहकर, यांस तेथेंच बढती देऊन वाशिमचे आक्टींग हेड मास्तर रा. रा. गंगाधर रामचंद्र सोहनी यांस वणीचे जागीं कायमचें बदललें आहे परंतु त्यांची आक्टींग नेमणूक चालूं आहे तो पर्यंत आणखी दोन महिने वाशिमास ते राहतील आणि वणीचे हेडमास्तरचें काम रा. रा. दाते फर्स्ट असि, परतवाडा यांस तूर्त सांगितलें आहे.

---

उमरवती हायस्कुलांतील विद्यार्थ्यांची संख्या वाढल्या कारणानें एक नवीन वर्ग करून त्यावर ५० रुपये पगाराच्या नवीन शिक्षकाची मंजुरात मिळाली आणि तिच्या अन्वयें रा. रा. नारायण मोरेश्वर रहाळकर बी. ए. सब प्रोटेम ६ वे असिस्टंट यांस कायम करण्यांत आलें आणि त्यांच्या ४० पगाराच्या जागेवर कलकत्ता युनिव्हरसिटीचें एक पदवीधर सब प्रोटेम नेमण्यांत आले असें कळतें.

---

रा. रा. मेरूलिंग अनंत गोडबोले असि. इंग्लिश मराठी स्कुल आकोला यांची कामा संबंधानें गैरवाकबगारी व अव्यवस्था दिसल्या मुळें त्यांस चाकरी वरून दूर करण्यांत आलें पण लागलीच बुलढाण्यास लोकांच्या वर्गण्यावर चालणाऱ्या इंग्लिश शिक्षकाच्या जागेवर सारख्या पगारावर नेमणूक झाली. नवल इतकेंच कीं नुसती पांचवी इयत्ता संभाळता येत नाहीं असें कारण दाखऊन पांचवी व सहावी या दोन्ही इयत्ता शिकविण्याची शिक्षा दिली! खरोखरच नालायक आहेत असें नसून हा परिणाम अधिकाऱ्यांच्या क्षणिक कोपाचा असावा किंवा असें नसेल तर लोकांच्या पैशाचें कांहीं महत्व नाहीं ह्मणून ही व्यवस्था करण्यांत आली असें वाटतें!

---

यंदाच्या वकिलीच्या परीक्षेत रा. रा. विष्णु तुकाराम पुजारी व हनुमंत रावजी खानझोडे हे उभयतां उमेदवार ६।७ मार्कांनीं नापास ठरतात तेव्हां त्यांस तितक्या मार्कांची माफी देण्याची व्यवस्था मे. जुडिशिअल कमिशनर मागील वहिवाट लक्ष्यांत आणून करितील अशी उमेद आहे. निव्वळ पासांची संख्या कमी अगर जास्त आहे अशा तत्वावर निकाल होऊं नये.

---

आज तारखे पासून रेल्वेच्या वेळापत्रकांत फरक झाल्या अन्वयें आकोल्यास उतारूंच्या गाड्या खालील वेळीं येतील व पांच सात मिनिटांनीं रवाना होतील:—

मुंबई बाजू कडून येणाऱ्या.

मिक्स्ड—११—३२

पासेंजर—१४—९

„—१—९

मुंबई बाजूस जाणाऱ्या.

पासेंजर—२—१२

मिक्स्ड ९—४६

पासेंजर १२—१२

---

नादारी मोकदमा नंबर ३४/१८९४

नक्कल ( जी )

विद्यमान नादारी कोर्टाचे ज्यडुज्य जिल्हे अकोलें.

नोटीस सर्वत्रांस प्रसिद्ध करण्यांत येते कीं, किसन टिकाराम लहरये राहणार अकोलें. हा नादारी आहे असा आज तारीख १९ माहे ९ सन १८९४ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख २० माहे १० सन १८९४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्याज बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या टेविल्या आहेत.

ज्यांस नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचे प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिष्टरांत दाखल होतील कळावें तारीख २२—९—९४ इ०

B. B. Sule.
Judge.
Bankruptcy Court.
AKOLA.

---

## वर्तमानसार.

माजिस्ट्रेटी सुलतानी—मि. केनेडी, माजिस्टेट, वांई यांनीं हिंदुमुसलमानांच्या दंग्यांतील थोर थोर हिंदुलोकांना २१।२१ दिवसांच्या कैदेची शिक्षा दिल्याचें दुःखकारक वर्तमान पसरांतच तेथील बारा हजार हिंदूमध्यें एकच कल्लोळ उसळल्याचें तेथील 'मोदवृत्ता' वरून कळतें.

### अत्यंत लहान घड्याळें.

हें घड्याळ नीगीवाच्या एका घड्याळजीनें तयार केलें. याची तबकडी १/१६ इंच व्यासाची आहे. या घड्याळाच्या आंतील यंत्रें नुसतीं सुव्यवस्थितपणें बसविण्यास त्या घड्याळजीस बरोबर दोन वर्षें लागलीं. एका टांकाच्या वरच्या टोंकास हें घड्याळ बसविलेलें आहे. या टांकाच्या वरच्या टोंकास याची मुख्य तबकडी व दोन बाजूंस दोन तबकड्या आहेत. मधली मुख्य तबकडी तास, मिनिटं व सेकंड दाखविते. व दोनही बाजूस दोन आहेत, त्यांतली एक तारीख व दुसरी महिने दाखविते. थोडे वर्षांपूर्वी न्युयॉर्क शहरांत एका जवाहिऱ्याच्या दुकानांत त्याचें प्रदर्शन केलें होतें. इ० सन १८९० साली न्यूकासल शहरांतील एका घड्याळजीनें एक विलक्षणच घड्याळ केलें होतें. तें असें सद्याच्या तीन गुंज्या असतात तशा सोन्याच्या तीन गुंज्या केल्या. मधल्या गुंडींत घड्याळ केलें होतें. त्या तीनही गुंज्या रुप्याच्या तारेनें संबद्ध केलेल्या होत्या. मधली गुंडी—ह्मणजे घड्याळ याची तबकडी बरोबर ३/१६ इंच व्यासाची होती. वरच्या बाजूची गुंडी फिरविल्यानें त्या घडयाळास किल्ली दिली जाई, खालची फिरल्यास कांटे फिरविले जात. दुसरें एक घड्याळ सुमारें १९/३२ इंच व्यासाचें स्वित्सरलंडमध्यें तयार केलें होतें, त्याचा वरची केंस वगैरे सुद्धां पावली एवढा आकार होता. मि. एडवर्ड जे. वुड यांनी 'वाचें व क्लाकें यांचे चमत्कार ह्मणून एक पुस्तक लिहिलें आहें त्यांत असे लिहिलें आहे कीं इ. स. १८६४साली आर्नल्ड नांवाच्या एका घड्याळजीनें इंग्लंडचा राजा तिसरा जार्ज यास एक आंगठी नजर केली. या आंगठींत एक घड्याळ बसविलें होतें. त्याचा आकार चवलीपेक्षां मोठा नव्हता. त्यांत एकंदर १२० निरनिराळे भाग होते. त्याचें वजन सारें ५॥ पेनिवेट होतें. पुढें १७७० साली दुसऱ्या एका आर्नल्ड नांवाच्याच गृहस्थानें राजास एक ठोके पडणारें परंतु तसेंच आंगठींत बसविलेलें घड्याळ नजर केलें. याच्या तबकडीचा व्यास १/५४ इंच, व वजन १/२० ग्रेन होतें !

पाण्याच्या तळीं द्वंद्वयुद्धः— मनुष्यप्राणी स्वभावतः रानटी व भांडखोरच खरा. परवां एका ठिकाणीं पाणबुड्यांनीं बुड्या मारल्या असतां आंत पाण्याच्या तळीं लढाई केल्याचीं दोन उदाहरणें वाचण्यांत आलीं. इ. स. १७९२ साली एक तारू बुडालें, तेव्हां पाणबुडे कामास लावून त्याचा कांहीं भाग सांपडल्यास पहावें ह्मणून पाणबुडे लाविले. त्यांतील दोन पाणबुडे तळीं जाऊन भांडले व तेथेंच मारामारी करूं लागले. शेवटीं एकानें दुसऱ्याच्या शिरस्त्राणाची कांच फोडली त्या बरोबर तो नाकातोंडांत पाणी जाऊन मरणोन्मुख झालेला असा वर आला. इ. स. १८६१ साली असेंच एक द्वंद्वयुद्ध झालें. या युद्धांतले पाणबुडे एकाच स्त्रीवर प्रेम करीत असल्यामुळें दोघांच्या मनांत परस्परां विषयीं मत्सर उत्पन्न होऊन त्यांनीं द्वेषानें हें युद्ध केलें. यांनींही पाण्याच्या तळीं एका फुटलेल्या जहाजांचा शोध लावण्यासाठींच बुड्या मारल्या होत्या. करम०

मौजे कांदलगांव, ता. बार्शी, येथें शाळेतील मुलें १८८६ सालापासून गणपतीचा उत्साह करीत असत. हा उत्साह १८९२ सालापासून बऱ्याच थाटानें व चढत्या मानानें होऊं लागला. त्या साली गणेशचतुर्थीच्या रात्रीं गणेशाची आरती चालली असतां सुमारें करांगुली एवढा जाड व २ हात लांब असा एक नाग दहा पांच लोकांच्या अंगावरून चालत येऊन गणपतीपुढें बसला. तेथें ७०।८० लोक होते. नागानें ज्या अर्थी कोणासही इजा केली नाहीं, त्याअर्थी तो श्रीचे दर्शनार्थच आला असावा, असें समजून कांहीं लोकांनीं त्यास बाहेर घालवून दिलें. इतक्यांत कांहींनीं त्यांस मारण्याचें मनांत आणलें, पण तो अदृश्य झाला. त्यावर गेल्या गणेश चतुर्थीचे रात्रीं १ वाजण्याचे सुमारास तसाच पण त्यापेक्षां किंचित मोठा असा एक नाग ५०—६० मनुष्यांच्या मधून येऊन, जुना गणपती खालीं होता त्याचे पायावर मस्तक ठेऊन व त्यास उजवे घालून नंतर सिंहासनावरील गणपतीच्या मुकुटावर फणा धरून, मनुष्यें प्रार्थना करतात त्याप्रमाणें सुमारें ५ मिनिटेंपर्यंत स्तब्ध राहिला. व श्रीचरणीं मस्तक ठेऊन खालीं उतरल्यावर त्यानें तेथून निघून जावें ह्मणून वाद्यें वाजविलीं, तो नाग श्रीसमोर सुमारें १५ मिनिटें डुलत होता. नंतर तो रस्त्याकडे जाऊं लागला, तो एक मनुष्य दिवा घेऊन पुढें चालला. त्याचे मागोमाग दिव्याचे उजेडानें स्वारी २ वाजण्याचे सुमारास बाहेर गेली. ९३ साली नाग आला नव्हता, याचें कारण त्यासाली गणपति करणारास सुतक होतें; तें लोकांस माहीत नव्हतें, तरी नागास कळल्यामुळेंच तो आला नसावा असें आतां अनुमान होतें. यंदां आलेला नाग ९२ सालचाच असल्यास तो दरसाल येईल असें वाटतें.

चीन देशांतील लोकसंख्या ४१ कोट असून तेथें अवघी ४१ मैल रेलवेची सडक आहे.

चीनदेशांत पायदळ शिपायाला दरमहा तीन रुपये व घोडेस्वारास दरमहा १५ रुपये यांपेक्षां अधिक वेतन कोठेंही देण्याचा शिरस्ता नाहीं. क०

साखर खाल्यानें काम करण्यास जास्त हुशारी येते असें ह्मणतात.

टाईम्स ऑफ इंडिआ पत्रावरून कळतें कीं, थोड्याच दिवसांत आर्धा आणा व एक आण्याची वर्तमानपत्रांत लपेटण्याचीं कव्हरें हिंदुस्थानांत सरकार सुरू करणार आहे. पाव आण्यानें जाणारीं वर्तमानपत्रें बरींच आहेत. तेव्हां त्या किंमतीचें कव्हर कां सुरू करूं नये? हिंदुस्थानांत सरकार पोष्टल कार्डाचे कागदाचा खर्च पडत नाहीं त्या प्रमाणें या दराचे कागदाचा खर्च पडूं नये. न्या. सिं.

युरोपांतील राष्ट्रांत लढाई न होण्याची पूर्ण चिन्हें दिसत नाहींत असें गेल्या मंगळवारीं आस्ट्रियाच्या प्रधानानें राजसभेंत केलेल्या भाषणावरून दिसतें. श्री. स.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस खाली सही करणार यांजकडून असें जाहिर केलें जातें की रा. रा. अनंत रामचंद्र यांस व पनालाल बुलीदास या उभयतांस आम्हीं कुलमुखत्यार नेमिले होते. त्या पैकी रा. रा. अनंत रामचंद्र यांस आम्ही कुलमुखत्यारीचे कामावरून काढीलें आहे. व त्याच्या बद्दलचें कुलमुखत्यार पत्र रद्द केलें आहे. हे सर्वत्रास कळावे ह्मणुन दिल्ही जाहिरात सही तारीख २६।९।९४ इसवी.

सही

सही देवकरण गिरधारीलाल मालक गिरधारीलाल देवकरण दुकान पिंपळगांव काळे वस्तुर

---

नादारी मोकदमा नंबर ४१/१८९४

नमुना नंबर (जी)

विद्यमान नादारी कोर्टाचे ज्यडुज्य जिल्हे अकोलें.

नोटीस सर्वत्रांस प्रसिद्ध करण्यांत येते कीं, नुरखान वा। लालशाबासखान रोहिला राहणार अकोलें. हा नादारी आहे असा आज तारीख १९ माहे सप्तंबर सन १८९४ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख २० माहे अक्टोबर सन १८९४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल तें आणि त्या बद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या टेविल्या आहेत.

ज्यांस नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचे प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिष्टरांत दाखल होतील कळावें तारीख २२–९–९४ इ०

B. B. Sule.
Judge.
Bankruptcy Court.
AKOLA.

---

नादारी मोकदमा नंबर ४०/१८९४

नमुना नंबर (जी)

विद्यमान नादारी कोर्टाचे ज्यडज्य जिल्हे अकोलें.

नोटीस सर्वत्रास प्रसिद्ध करण्यात येत कीं शेखचांद वा। शेखबन्नु राहणार रेल ता० आकोट हा नादारी आहे असा आज तारीख १६ माहे ९ सन १८९४ इ. रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख १० माहे १० सन १८९४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्या बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावीं. हि नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यांस नादारावर दावे नोंदविणें असतील त्याणीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचे प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दुरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिष्टरांत दाखल होतील कळावे तारीख २२–९–९४ इ०

B. B. Sule
Judge
Bankruptcy Court
AKOLA

---


### घड्याळ.

कि. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेळेव रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें. व ६ ज्युएलचे (ह्मणजे चक्रांचे खाली वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक विलायती काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें स्विस्पांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता–
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक


---

हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर „ ७ „ ८८
किरकोळ अंकास ................ ८४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.... ८।८६
दुसरे खेपेस ........ ८१

ingle copy.............................. 4 as.

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over 10...4 as.
Repitition per line 3 as.

THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII AKOLA MONDAY 8 OCTOBER 1894 NO. 40

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख ८ माहे अक्टोबर सन १८९४ इ० अंक ४०

## सर्व नजरबंदीच्या माकडचेष्टांस ह्मणून पाडतां येते.

मी रस्त्यांत जेव्हां झोकांडी खात चालत असे तेव्हां लोकांनीं माझ्याकडे बोट दाखवून हिणवावें कीं पहा काय बेटा झिंगून गेलेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुह्मासही खास त्यांच्या सारखेंच वाटलें असतें. परंतु ते सर्व चुकत होते. भर रस्त्यांत मला चालतांना झोकांड्या येतात ह्मणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुष्यक्रमाचे पूर्व मार्गांवर थोडेसें गेलें पाहिजे.

आज तागाईत एखाद्या आनंदी व रंगेल मनुष्या प्रमाणें मी सुखी प्राणी होतों परंतु चार पांच वर्षांपूर्वीं मला वाटूं लागलें कीं माझ्यांत कांहीं कांहीं तरी कमी जास्त होत आहे. जेवतांना पूर्वीं सारखी माझी क्षुधा राहिली नव्हती. मला भूक लागे व खाण्याची इच्छा होई परंतु तोंडांत घास गेला कीं लागलीच पक्काशय उमळून येई व जसें कांहीं बंडावा करून माझ्या हेतुस ह्मणून पाडी. हें मला अरिष्ट नवीनच व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां ह्मणून खाण्याचा भाव घाली तेव्हां तेव्हां मला फारच तिटकारा येई. कदाचित पोटांत कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाटतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्यामुळें निजायाला जातांना आपल्यास जशी सुस्ती चढून थकवा येतो त्या प्रमाणें मला होत असे. ह्या मुळें रात्रीं झोपेचा कल अगदी बदलला. झोंप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्या सारखें मला वाटे त्यामुळें मी केव्हां केव्हां अफू किंवा इतर अमली पदार्थ घेत असे. मी जीभ पहातों तों तिच्यावर थर लमलेला आणि काम करण्याची हौस बिलकूल नाहींशी झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठींत सपाटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खांद्यांत भाला टोंचल्या सारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तों माझे डोळे पिवळे दिसूं लागले. आणि माझ्या दांत व हिरड्या सभोंवती कीट जमलेला दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्यामुळें किंवा इतर साधनें दांताजवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येई. माझा कोठा फारच जड झाला आणि पक्काशयांत घाणेरडा वायू उत्पन्न होऊन घोंडावाटे ढेंकर देतांना निघून जाई. ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं. ह्या वेळीं रस्त्यांत चालत असतां एकदम घेरी यावी, हलक वाटावें. आणि गरगर फिरल्या सारखें वाटून झोकांड्या देत चालावें व जमिनीवर सवशेल पडून नमस्कार घालावा लागत असे. माझ्यानें हें विघ्न जितकें टाळतां येईल तेवढ टाळून घेई व आतां तें गेलें असें समजून तो दिवस घालवीत असे.

माझ्या मित्र मंडळीनें व वैद्यानें जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तीं घेतलीं. त्या पासून गुण न येतां मी अगदीं सुद्दामंदव झालों. व आतां ह्या वस्तीस रामराम ठोकून परलोकचा रस्ता धरावा असें मला वाटूं लागलें. ह्या प्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुह्मास थोडक्यांत निवेदन करितों कीं, बरा कसा झाला ह्याचें कारण आपणास कळवावें हें अगदीं रास्त आहे. लंडनात माझा एक स्नेही होता. त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्या बरोबर त्यानें सांगितलें कीं, मदर सिजेलचा रोगहारक सिरपा ( ह्मणजे माता सिजेलचा रोगहारक पाक ) तुह्मास फारच गुणकारी होईल.

माझा कांहीं त्याच्या ह्मणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक बाटली तर थोडे दिवस घेऊन पहावी ह्मणून विचार केला. मला ह्या औषधा पासून इतका जलद गुण आला कीं, मला खातांना बरें वाटलें व झोंप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्यामुळें इतकें बरें वाटलें कीं, मी ह्या औषधाच्या आणखी चार बाटल्या पार केल्या.

मी बरा झालों. हें औषध दैविका सारखें वाटलें. मला खचित वाटलें कीं, हें औषध ईश्वराच्या प्रेरणेनेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हां ताजातवाना झालों व त्या मुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगतां पुरवत नाहींत. आतां केव्हां तरी थोडेसें अपचन झालें कीं, जें सर्वांस होत असतें, त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतों व लागलींच मला त्या पासून आराम वाटतो.

ह्याचा तात्काळ गुण असल्या मुळें मला नजरबंदीच्या खेळांची आठवण होते. परंतु खरोखर माता सिजेलचा क्युरेटिव सिरपांत डोळ्यांत माती टाकण्या सारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगतां येतें कीं, कितीही जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थिती पासून असो तरी ह्या औषधा पासून हटकून गुण यावयाचाच.

मी तुमचा उपकार मानणारा.

( सही ) जे. सी. सिमसन.
२१ ब्रानोबरचा रस्ता, न्युकास्टल
अंडर लाईन, स्टाफर्ड शियर इंग्लंड.

B. T.

## विजयादशमीचें सोनें

( मागील अंकावरून समाप्त )

Her busom heaved—she stepped aside,
As conscious of my look, she stept—
Then suddenly, with timorous eye
She fled to me and wept.

She half enclosed me with her arms,
She press'd me with a meek embrace;
And bending back her head, look'd up,
And glazed upon my face.

'Twas partly love, and partly fear,
And partly 'twas a bashful art,
That I might rather feel, than see,
The swelling of her heart.

I calm'd her fears, and she was calm,
And told her love with virgin pride;
And so I won my Genevieve,
My bright and beauteous bride.

S. T. Coleridge

दाटुनि आला कंठ सखीचा, वक्षो भाग फुगे तपि साचा, वदन फिरविलें अश्रु पुसाया, दाटुनि सखिनें स्वीय मानासि कल्लोळ मनोचा दृष्टीस माझ्या पडो न द्यावा, माझे नेत्र सुवक्त्रसरोजीं, सज्जचि होते ठावे तिजला, कातर चंचल नेत्र कटाक्षें एका एकी सखिनें वळुनि, माझ्या समीप झटकरि येऊनि, घट्ट गळ्याला मिठी वलुनि किंचित् आवळुनि वरि अवला, वदना सारुनि मागें सखिनें, सूक्ष्म दृष्टिनें मला निरखिलें, खरोखरी सखिची ती मूर्ती दीन मुग्धा मन तैसीच दिसे आतां ॥ मधुर कथा प० ॥१२॥

कांहीं प्रेमें कांहिं भीतिनें, घट्ट आलिंगन दिधलें सखिनें, कांहीं नैसर्गिक अवलांची युक्ती साची, लज्जित होता शद्ब निघेना तोंडावाटे, माझ्या नयना दिसो नये परी स्पर्शसुखें हृच्चंचल लहरी मला भासवी, अहा! तोषवी सखिची युक्ती, पळवुनि भीति, आश्वासन मग देऊनि सतिचें, प्रसन्न केलें चित्त मनीचे खेद निमाले, लाजत मुरकत, सौम्य वचें ती, 'माझा प्रेमा तुमच्या वरती' स्पष्ट चि वदली माझी नोवरी सुंदरतन्वी मित्रा या परी मोठ्या कष्टें मी मिळविली कांता ॥ मधुर कथा १३ ॥

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन शुद्ध ९ शके १८१६

## नोंदणी खातें

( सन १८९३—९४ ची हकीकत )

या प्रांतांत एकंदर ६ जिल्हा— रजिष्ट्रार व ५७ सबरजिस्ट्रार मिळून ६३ कचेऱ्या आहेत. खतें पत्रें वगैरे या वर्षीं जितकीं नोंदण्यांत आलीं तितकीं पूर्वीं कधींच आलीं नाहींत. सन १८८९–९०त हा आंकडा फार मोठा ह्मणजे ३१७६६ होता यंदा हा आंकडा ३५१८३ पर्यंत चढला आहे. सर्वांत नवलाची गोष्ट अशी कीं मध्यप्रांतांचा विस्तार नोंदणाच्या कचेऱ्या संबंधानें या प्रांताच्या तिप्पट आहे आणि असें असून देखील त्या प्रांतांतील गुदस्ता नोंदणीची एकूण बेरीज ३११०३ होती. या प्रांतांतील नोंदणीचें काम पुष्कळ वाढलें आहे तरी तें काम थोड्या खर्चांत अगदीं उत्तम होतें आणि सरकारचें उत्पन्न सालोसाल वाढत्या प्रमाणावर आहे. हें समाधानकारक होय. पण नोंदणीच्या कामाची इतकी भरभराट लोकांच्या सुस्थितीचीच दर्शक आहे असें आह्मास वाटत नाहीं. व्यापारवृद्धि फार झाली असें ह्मटल्यानें नोंदणी कामाच्या विस्ताराचें स्पष्टीकरण होत नाहीं. जमीन जुमला घरेंदारें इत्यादिकांची देवघेव, गहाण व्यापार, व वहिवाटीचे करारनामे हीं कामें अत्यंत वाढलीं असें दिसतें. शंभर रुपयापासून अधिक किंमतीच्या स्थावर इस्टेटी संबंधानें सर्व उलाढाली नाना मार्गांनीं वाढल्या आहेत आणि इतर दिवाणी, पोलीस व तुरुंग या खात्यांच्या कार्यवृद्धीपासून त्या त्या खात्याचे अधिकारी लोकस्थिती वाईट असल्या विषयीं जीं अनुमानें बांधतात तींच अनुमानें या नोंदणी खात्याच्या रिपोर्टीनें कायम व सबळ होत आहेत. सर्वत्र लोक जमीन, घरें वगैरे स्थावर इस्टेटी संबंधानें फार काळजी वाहतात; आणि इस्टेटीच्या किंमती इतका व्याजाचा आंकडा फुगला तथापि ते त्या इस्टेटीची विल्हेवाट करूं इच्छीत नाहींत. असे लोकांच्या मनाचे स्वाभाविक कल असतांना देखील स्थावर इस्टेटीविषयीं अतोनात घडामोडी होतात हें लोकांच्या इच्छेविरुद्ध अनिवार्य कारणामुळें होत असावें असें स्पष्ट दिसतें. ज्या ज्या स्थावर इस्टेटी संबंधानें व्यवहार घडले त्यांची एकूण किंमत रुपये १०२,८२,२८५,१२ आणे ४ पै होती. त्या मध्यें ३८ लक्ष किंमतीच्या इस्टेटी विकण्यांत आल्या आणि सुमोर ५० लाख रुपयांच्या इस्टेटी गहाण ठेवण्यांत आल्या. आमच्या या लहानशा प्रांतांत इतके दस्तैवज स्थावर मालासंबंधानें होतात ही गोष्ट आमच्या मतें लोकांची नादारी व गरिबी दाखविते.

रिपोर्टीच्या वर्षीं नोंदणीच्या फीचें उत्पन्न रुपये ८८०८० झालें त्या पैकीं खर्च वजा जाता बाकी नक्की उत्पन्न रुपये ३९२८२ १ आणा ४ पै झालें. सन १८७० सालीं नोंदणी खात्याची या प्रांतीं स्थापना झाली आणि तेव्हांपासून या खात्यानें सरकारच्या तिजोरींत रुपये ४०७९।६।६ आणे ४ पै इतकी रकम पोचती केली.

एकंदरीनें नोंदणी खात्याचें काम इनस्पेक्टर जनरल कर्नल लेन साहेब यांच्या कारकिर्दींत फार सुयंत्र व सुरळीत चाललें आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय. सन १८८० साला पासून गेल्या १४ वर्षांत कोणत्याही सर्व्हे नंबरच्या शेता संबंधानें किती गोष्टी घडल्या हें समजण्यासाठीं अलिकडे दोन चार वर्षे तयार होत असलेलीं नवीं सूचीपत्रकें अत्यंत उपयोगी आहेत. या सूचीपत्रकांची युक्ति कर्नल लेन यांनीं काढली आणि त्याच्या हाता खालचे इन्स्पेक्टर कैलासवासी चिंतामण मोरेश्वर आपटे यांच्या बहुश्रमानें त्या युक्तीची स्वल्प कालांत उत्तम प्रकारें फलद्रुपता झाली. कै०

वा० चिंतामणराव यांच्या संबधानें त्यांच्या वरिष्ठाचा उत्तम अभिप्राय ऐकून आह्मांस एके प्रकारें त्या गृहस्थाची आठवण मोठ्या उमाळ्यानें येते. हे सरकारचे इमानी, विश्वासुक व हुशार कामगार होते. ग्रंथलेखनांतही यांचें पाऊल पुष्कळ पुढें होतें. असो, कै० चिंतामणराव यांची सत्कीर्ती ऐकून लोकांनीं त्यांचा कित्ता गिरविण्यास शिकावें.

---

वाईच्या थोर थोर गृहस्थांवर तेथील माजिस्ट्रेटानें जो कहर उसळून दिला आहे त्यामुळें सर्वत्र हिंदू लोकांचीं मनें क्षुब्ध झालीं आहेत. किंबहुना विचारी व दूरदर्शी मुसलमान भाई देखील या प्रकरणाबद्दल मोठा अपसोस करित आहेत. निव्वळ लोकांवर आग पाखडण्यासाठीं कायद्याचा उपयोग केला ह्मणजे सरकारच्या हुकूमाची किंमत कांहीं मात्र रहात नसते. आज वाईच्या सद्गृहस्थावर माजिस्ट्रेटी गदा पडली ती वाईकरांवरच नाहीं तर सर्व राष्ट्रांवर आहे. हें राष्ट्रीय अरिष्ट आहे. हिंदु काय व मुसलमान काय, सर्वजण एकाच पारड्यांत आहेत. ज्या राज्यांत कायद्यानेंच अन्याय, जुलूम व बेबंदशाई माजते त्या राज्यात स्वस्थता, शांतता व अन्नादानी हीं कधीं तरी रहातील काय! वाईस होरे ह्मणून उत्सव होतो त्यांत एका मुलानें मशिदीपुढें झांज वाजविली ह्मणून त्या समारंभांत हजर असलेल्या लोकांवर दंगा केल्याचा किंवा करविल्याचा आरोप ठेवून तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यांत आली. कायद्याच्या अक्षरमंत्रानें हा शिक्षेचा जादू टोणा करण्यांत आला पण वास्तविक या निकालाबद्दल सरकारच्या राज्यपद्धतीला व कायदेकानूंला काळिमा आला असें सर्वत्र लोकमत आहे.

जिल्हा माजिस्ट्रेटांनीं पूर्वीचा वहिवाट लक्ष्यांत न घेतां एकदम मशिदी समोरील वाजंत्री बंद केली पण त्या हुकूमाची अमान्यता एका झांजेच्या नादानें एका अर्भकानें केली आणि त्याचें प्रायश्चित्त श्रीमान, लौकिकवान, व सार्वजनिक लोकास तुरुंगवासाच्या रूपानें मिळावें हा न्याय कोणत्या सुलतानशाहींतला!

---

मुंबई हायकोर्टानें हें वाई प्रकरण फेर तपासणीसाठीं मागितलें आहे. न्यायमूर्ती जारडीन यांचा अभिप्राय न्यायमूर्ती रानडे यांच्या अभिप्रायाहून भिन्न पडला होता परंतु अखेरीस उभयतांच्या विचारानें तें प्रकरण हायकोर्टासमोर बोलाविलें आहे. निकाल काय होईल तो खरा.

---

परंतु तो पर्यंत वाईकराचे सर्वमान्य लोकाग्रणींना बंदिवासांत काळ कंठावा लागेल त्याची काय दशा! सरकारची शिक्षा हें फक्त देहताडणाला कारण आहे. जे लोक बळी गेले त्यांना हायकोर्टानें निर्दोषी ठरविलें किंवा शिक्षेच्या मुदती नंतर ते मुक्त झाले तथापि त्यांची अप्रतिष्ठा, हाल व यातना हीं लोकांच्या डोळ्या समोर सुऱ्या प्रमाणें फिरतील. लोकांच्या मनांत हा अन्यायी न्याय सदैव जागृत राहील. सरकारच्या विरुद्ध राजद्रोह किंवा बंड करावयास सहसा कोणी प्रवृत्त होत नाहींत हें खरें परंतु लोकांच्या मनास जो भूकंपा प्रमाणें अचका व धक्का बसला आहे त्याचा परिणाम चांगला नाहीं आज सरकारावरचा बहुत वर्षांचा पटलेला विश्वास लोपत चालला हें सुचिन्ह नव्हे!

---

ज्या कायद्यान्वयें वाईकरांस शिक्षा झाल्या त्याचा भावार्थ कागदांतच राहिला. त्यांतील लोकमान्यता नष्ट झाली. लोकमान्यतेचें ज्या कायद्यास बळ नाहीं तो कायदा राज्यास अपायकारक व घातुक समजला पाहिजे. लोकमत व कायदा हीं जुळ्या भावंडा प्रमाणें नांदलीं तरच कोणतेंही राज्य चिरकाल व सुयंत्र चालेल.

कायद्यानें ज्या वाईकरांस शिक्षा झाल्या त्यांस पुष्पमालांनीं अलंकृत करून जयघोष करित लोकांनीं त्यांस स्वगृहीं आणिलें. इतकेंच नाहीं तर लोककाजा साठीं भोगलेल्या देहदंडा बद्दल त्यांचे धन्यवाद गाऊन सर्व दिशा दणाणून सोडल्या ह्मणजे सरकारच्या शिक्षेची योग्यता व भातबरी ती काय! वाईचे लोक बंदींत गेलेल्या लोकांच्या सुटके नंतर सर्वत्र आनंदोत्सव व अभिनंदन करितील यांत नवल काय! त्याच्या त्या सोज्वल कृत्यांला आमच्या प्रांतांतील लोकमताची शाबासकी वाईकरांना दिल्या वांचून आमच्यानें राहवणार नाहीं.

सरकारी कायद्याचा अपमान करून राजद्रोही बनण्यास आह्मी सूचवीत नाहीं तर लोकांनीं अधिक राजनिष्ठ व देशभक्त होऊन सरकारच्या अधिकाऱ्यांच्या घातुक चुका दाखवाव्या आणि सरकारच्या ठायीं लोकप्रेम वाढवावें अशा मतलबाचे आमचे उपाय आहेत. इंग्रजी राज्याच्या भक्कमपणावर व मजबुतीवरच आमचे सर्व मनोराज्य चालतें. इंग्रजी छत्रा खालीच आमच्या सर्व भाग्योदयाचीं सूत्रें गुंफित झालीं आहेत. आमच्या सर्व आशा या राज्याच्या चिरस्थायीपणावर अवलंबून आहेत तेव्हा आमच्याच स्वार्था साठी तरी निदान आम्ही गैर गोष्ट करणार नाहीं हें मनुष्यत्वाला अनुसरूनच आहे.

---

पुण्याचा दंगा लोकामधील मिटला खरा परंतु न्यायकोर्टात त्याला फार भयंकर स्वरूप आलें आहे. पुण्याचे श्रीमंत तात्या साहेब नातू आदि करून पुष्कळांना पुष्कळ अपराधांची कलमें लागूं करून त्यांचे खटले सेशन कमिट करण्यांत आले! अखेर निकाल काय होईल तो पहावा.

---

पुण्याच्या दंग्याविषयीं लिहितांना कांहीं पत्रकर्त्यांनीं विलक्षण विचार प्रकाशित केले आहेत. त्यांच्या मतें पुण्याच्या लोकांनीं मोठी चूक केली कीं त्यांनीं गणपतीचे टोलेजंग उत्सव केले. गणपती काय तो चिखलाचा गोळा! आणि त्याचा पुणेकरांनीं उत्सव करून मुसलमानाशीं दुही माजविली व दंगे उसळविले! एकी राखण्याची वेळ होती तेथें त्यानीं बेकी केली! अशा विधानांस महत्व देऊन त्यांचें वैचित्र्य लोकांस कळविण्याचा आमचा हेतु नव्हता परंतु अशा लेखांचा आमचे शत्रु भलभलतः उपयोग करितील अशी आह्मास भिती आहे.

खरोखर, हिंदुमुसलमानांची एकी सर्वत्र आहे हें राष्ट्रीय सभेने अगदी स्पष्ट केलें आहे. अलीकडे द्विजाभाव उत्पन्न झाल्याविषयीं वारंवार होत असलेले दंगे साक्ष देतात परंतु त्याचें कारण टोपीवाल्या अधिकाऱ्यांची मुसलमान पक्षाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष फूस ही होय. एकाला पळ व दुसऱ्याला घर असें करण्यास लावण्याची युक्ती हल्लीं प्रचलित आहे. ही धरपळ लबाडीची असून इंग्रजी राज्याला घातुक आहे असें आह्मी पूर्वीपासून ह्मणत आलों. हिंदुमुसलमानांचे रितीरिवाज, जुन्या वहिवाटी व हक्क यांचा सविस्तर खुलासा करावा आणि त्याप्रमाणें हिंदुमुसलमानांपैकीं पंच निवडून त्यांच्या मार्फत सरकारानें व्यवस्था चालू ठेवाव्या हाच लोकमान्य राजमार्ग आहे परंतु सरकारची करणी निराळीं असून या फाटाफुटीला अनेक वाटा खुल्या करण्याचा प्रयत्न दिसतो.

सर्व दंग्याचा उगम क्षुल्लक गोष्टीमध्ये असतो. परंतु मुसलमानांची तर्फदारी व महाराष्ट्र ब्राह्मणांचा छळ यांचें सत्र हल्लीं पुण्याकडे चालूं आहे. आळंदीची पालखी व नागोबाची मिरवणूक यावेळीं आपलेपणा कायम राखण्यास पुणेकर शिकले आणि ती गोष्ट गणपतीच्या समारंभानें व्यक्त केली. अंगांत कांहीं चमत्कार असल्याशिवाय भीक सुद्धां कोणी घालीत नाहीं. पुणेकरांनीं नामर्दपणा दाखवून मौनव्रत व व्यापारशून्यत्व पतकरलें असतें तर ते लोक संगमनेयोग्य आहेत असें आमचे मुसलमानभाई त्यांस ओळखणार नाहींत ह्मणजे परिणामीं हल्लीं अनेकद्वारा सरकार जो पायमल्ली आमच्या लोकांची करित आहे ती मुसलमानांनीं ही चालू केली असती. ज्या लोकांमध्यें जोवटपणा व पाणी आहे त्यांच्यापाशीं सर्वजण मैत्री करूं इच्छितात व त्यांच्या बऱ्या वाईट ह्मणण्याला मान देतात. हल्लीं सरकारानें जो एककल्लीपणा चालविला आहे त्यामुळें सरकार हिंदु मुसलमानांस एकदील परिणामीं होऊं देत नाहीं. हा प्रकार बंद होऊन अगदीं निःपक्षपाता प्रमाणें सर्व सापत्नभाव सोडून समतोल बुद्धीनें सरकार वागूं लागलें ह्मणजे आह्मी हिंदुमुसलमान एकच आहों आणि आमच्या ह्मणण्याचें प्रत्यंतर येत्या राष्ट्रीय सभेच्या बैठकीला येईल.

---

बडोद्यास 'बापट प्रकरण' चाललें आहे त्याची कच्ची हकीकत 'श्री सयाजी विजय' पत्रांच्या अन्हिक जादा पत्रकावरून व मुंबईच्या ग्याझेट व टाईम्स पत्रा वरून कळत असेंत. मागें क्राफर्ड प्रकरण जसें पुण्यास गाजलें होतें त्या प्रकारचें स्वरूप 'बापट प्रकरणा' वरील बसलेल्या कमिशनास आलें आहे. न्यायदेवतेला सर्वत्र मान मिळतो आणि तिच्या निर्णयात्मक अनुग्रहा साठीं दिड दोन लाख रुपये खर्च करण्याचा श्रीमंत गायकवाड सरकारचा निश्चय आहे. राजश्री बापट (मुख्य सर्व्हे आफिसर मि. इलियट यांच्या हाताखालील आफिसर) यांनीं नवीन मोजणी व जमाबंदी या कामांत ४९ हजार रुपये लांच खाल्ले या आरोपावर सध्या चौकशी चालूं आहे. कोणी केव्हा व कसकसा लांच दिला व काय काय हरतऱ्हा यांजिल्या याचे साक्षी पुरावे सध्यां चालूं आहेत. लांच देण्याचे प्रकार व युक्त्या कळण्या साठीं तरी लोकांनीं हें प्रकरण अवश्य वाचावें. बडोदे शाहींत लांच देणारा गुन्हेगार होत नाहीं म्हणून लांच दिलेले लोक पुरावा देण्यास लवकर पुढें सरसावतात. खुद्द मि. इलियट यांची साक्ष घ्यावयाची आहे म्हणून त्यांना विलायतेहून परत येण्या विषयीं आमंत्रण रवाना झालें आहे. लांचाच्या आरोपांची नामावळी फार मोठी आहे आणि त्यांतील निवडक आरोप व भक्कम व वजनदार पुरावा ते सध्यां कमिशनरां समोर येत आहेत. लांचाचे खटले ऐकून लांच खाणाऱ्यांस दहशत बसेल तर आम्ही वारंवार या खटल्या संबंधानें लिहिणार आहों त्याची सार्थकता झाली असें समजूं.

---

## The Berar Samachar

MONDAY OCTOBER, 8, 1894

---

The Industrial Conference at Poona has proved beyond doubt that the possibilities of improving the industries of the nation paint a bright picture provided the energies and the capital in the nation be properly directed. Service and agriculture are the only walks of profession men tread in. Population is increasing with the ruinous disadvantages that early births and deaths in great members entail. But even these professions are cramped up to their uttermost limits Labour is wasted and men's intellects are decaying because there are no conduitpipes to open new fields for them. The salaried, liesured and literary classes of our society are annually receiving new accretions and have played a sorry dance. The Industrial development of the country is the only saviour of the present helpless condition The Industrial Conference has surveyed in a very able and comprehensive manner the whole field of activity in industry and commerce. Co—operation and time will alone multiply our means of living and ensure a hopeful fore—cast. But the propects can never be realized unless a new lever be provided wherewith to direct the national activities and intellect in new channels. We plead guilty to the charge that the Hon'ble Ranchodlal from his Presidential chair laid at the doors of the Indians as a whole people but we would accentuate our difficulties to point out that the masses are at sea because neither do the Government nor the leaders of our societies who control our distinies supply the beacon—light to show our route. Men in the ordinary run have no thought as to where they are drifted. Free primary education, initiatory scientific training, and plenty of factories, mills and workshops are in short the three wants of the time.

Free education is the foremost requisite of the present population. The State is *bound* to provide elementary training so as to give to each member of its subjects a fitting educational status wherewith he should start to enter any professional line. But these ideas do not hold water with the ruling powers though they are themselves schooled in the free primary schools of Great Britain. We shall have to fight in the Legislative Councils and the Parliament until our rights as British subjects are granted to us.

Dr. Moreshwar Gopal Deshmuk has ably shown why our provincial industries are disappearing one after another There has been a chaos out of which we have to evolve a new order of life—long industries. He points out how the revival of chemical training can be effected. This one example will suffice our purpose:—

"In fact they should become manufacturing chemists. They would thus be introducing a new profession in our country. Chemistry has of late become such a highly developed science, and is every day becoming more so, that to practise chemistry successfully, if I may be allowed to use the expression, requires no inconsiderable amount of general education. In former time the work of manufacturing articles of commerce was left to the labouring classes and illiterate workmen, and it was owing to this mistake that many of our old industries have completely died out, and others are fast going the same way. It is high time that we should rectify this error. Manufacturing chemistry is only a practical application of the science of chemistry to the useful arts. Requiring, as it does, a considerable amount of general education and an accurate and careful study of the science of chemistry, to be a manufacturing chemist would be no mean profession to follow. Our young men of science, therefore, must now enter this branch of livelihood, and help to rescue our dying arts from complete annihilation. Our Univerisity course in arts and science gives our young men sufficient general education to be able to selct for themselves a parcticular branch of manufacture that would be under the existing circumstances, likely to pay. After finishing their University course, these young men should devote a few months in obtaining information as to the requirements of the market and then visit places where raw material of a particular kind is found or where manufacturing industries are carried on by ignorant workmen in the same time-honored oldfashioned style which they may have learnt from their fathers. The young scientist must then set about making experiments for utilizing the raw materialin a particular manner or improving the indigenous industries in a particular way that would satisfy the requirements of the market. A few months spent in making these experiments would give them the necessary skill and knowledge to be able to successfully manage some one kind of manufacturing industry."

The third necessity of workshops and mills is every where acknowledged and requires the patronage of the Government and the liberal investments of the idle capital in the country. These times are favourable for this remedial measure to introduce a new industrial life and it is a good sign that our countrymen have already made a beginning.

We are glad to see that the towns-people of Akola have a germ of public life and activity. Conferences we have in educational and Congress matters but this year we have a novel beginning to found a similar conference of the Police Department. This week we had a conclave of Police officers from all the six districts on account of the departmental examinations which came off as usual. But the occasion served for the foundation of a Police Conference. The idea originated with Mr. N. R. Cumberlege while at Akola. The highest type of discipline and the admirable character of Police officers which he moulded during his brilliant career at Akola were not a seed sown on a barren land. Messrs Dhondaji Kondaji and Vinayak Ganesh were not slow of head and heart to let slip the occasion. Mr. Cotgrave the District Superintendent promoted their idea of a Conference and under his auspices and sound adivice we saw on Saturday last the first sitting of the new assembly.

We foresee a highly useful prospect for an institution like the above. The thrilling and interesting speeches at the meeting infused a new police life to popularize the condemned service and to improve the relations between the police officers themselves. The Police Conference will ventilate its own grievances and facilitate friendly communications with the masses at large. We congratulate once more Messrs. Dhondji and Vinayak Rao, and their band of youthful assistants upon the perfect success and the complete harmony and friendliness that prevailed in the meeting; but before we take leave of the subject with the happy impressions of the entertainment and the speeches at the first sitting we offer our hearty thanks to Mr. Cotgrave for his able and and sympathetic guidance and hope him to cut a good figure in the organization as one of its main founder and patron.

Mr. Malbari is a familiar name with the Hindus. He organized on paper a number of reforms for the Hindu-society. He is an able writer and his command over the English language is really admirable. The London Times had a few years ago a long article on his life-history. He is now in England. He was interviewed the other day as to his views about the recent riots. He hit at the right point when he said that the pivot of every good government was love and not fear, confidence and not distrust. His short advice to the British Government is worth ten thousand repetitions until it is acted upon:—

"Let the masses in India have enough to live upon, possibly with a standard of living that has a tendency to rise. Avoid to tax the poor man's necessaries of life, to unsettle his mind with experiments in what is called land settlement, prevent the British soldier loafing about his homestead, his village-tank or river; bring primary education within his reach, help him with the aid of the educated and influential classes, to the smaller arts, industries and trades. Above all, cease to worry him with new laws; simplify, codify, popularize the laws already in force. This much, rather this little for the people!"

## वऱ्हाड.

येथें पोलीस लोकांचा एक क्लब आहे. त्या क्लबानें पोलीस खात्याच्या परीक्षेसाठीं आलेल्या इनस्पेक्टर, चीफ कानस्टेबल वगैरे आफिसरांचें आगतस्वागत करून एक पोलीस कान्फरन्स स्थापण्याचा योग आणिला. रा. रा. धोंडजी कोंडजी, विनायकराव, भगवानदीन, दादीशेट आदिकरून मंडळीला या समाजस्थापनेचें श्रेय आहे. मे. काटग्रेव्ह समाजाला अनुकूल आहेत.

यंदा म्याट्रीक्युलेशन परीक्षेस अकोला हायस्कुलांतून १२ विद्यार्थी जाणार आहेत.

बुलढाणा जिल्ह्यांत मि. गाडविन आस्टीन यांनीं हाताखालील लोकांच्या रजे विषयीं कडकपणा धरून पुष्कळ बदल्याही केल्या आहेत. असें म्हणतात

यवतमाळ म्युनिसिपालिटीनें चौचाकी व दुचाकी गाड्या, हत्ती व उंट, घोडा व बैल, म्हैस, आणि गाढव व कुत्रे यांवर सहामही दोन रुपया पासून चार आण्या पर्यंत नवीन कर चालूं महिन्या पासून बसविले आहेत.

प्रोफेसर गोपाळ गणेश आगरकर एम. ए. यांची स्वारी हिंवाळ्याच्या सुटींत अकोल्यास आली आहे. दहा वर्षां पूर्वीं हे आले होते तेव्हांच्या यांच्या प्रकृतीच्या मानानें हे हल्लीं फार थकलेले व अधिक वयोवृद्ध दिसतात. सध्यां त्यांची तब्येत अस्वस्थ आहे.

पण हवा पालटण्यानें त्यांस लवकरच चांगली हुशारी वाटेल.

रा. सा. देवराव विनायक वकील व रा. रा. अमृतराव अवाजी यां दोन गृहस्थांमध्यें गहाण शेती संबंधानें पुष्कळ वर्षांचा तंटा चालला होता. कागदपत्रीं रावसाहेबांचे बंधु बळवंतराव हे गहाणदार धनको आहेत उभयतांनीं हा खटला पंचाकडे नेला पण पंचाचा निकाल रावसाहेबांस पसंत पडला नाहीं. राजश्री अमृतराव यांनीं दिवाणी कोडतांत हुकूमनामा मिळविला. पण त्यावर हाय कोर्टांकडे अपील झालें आणि अपिलेट कोर्टानेंही पंचाचाच ठराव कायम ठेविला दुनियेंतील पुष्कळ गोष्टी सुखदुःखमिश्रित असतात. एका पक्षाचा विजय तोच दुसऱ्या पक्षाचा पराजय असा प्रकार असतो. राव साहेबांस पंधरा वीस हजारांची ठोंकर लागली यांत न्याय झाला असेल तर तिनें रावसाहेबांस कांहीं वाईट वाटणार नाहीं व अशा द्रव्यहानीची ते फारशी फिकीरही करणार नाहींत. लाभालाभाची आशा नसते तेथें देखील आमच्या सारख्या तिऱ्हाइतांचीं मनें न्यायाचा निवाडा करीत असतात. हा अव्यापारेषु व्यापार खरा पण तिऱ्हाईत देखील जुडिशिअल कामिशनरांच्या निकालास माना डोलवितात रा. रा. गणेश बापूजी, मार्तंड लक्ष्मण व जयकृष्ण बगाजी यांनीं या तंट्यात पंचाईत केली आणि गहाणाची जमीन ताब्यांत देऊन हिशोबाचें काम तहकूब ठेविलें. पुढें रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांस पंच नेमिलें. ही पंचाईत चालू असतां दोन्ही बाजू कडील वकील डोळ्यांत तेल घालून पक्ष प्रतिपक्ष चालवीत होते. रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर यानीं पंचाचा निकालच कायम करून हुकूमनामा दिला राव साहेबांनीं या हुकूमनाम्यावर अपील केलें. परंतु कळविण्यास आनंद वाटतो कीं वरील सर्व लोकांच्या निकालाला यश आलें आणि पंचाचा निकाल कायम झाला.

या प्रकरणांत कांहीं कायद्याची बाजू चुकली असेल असें यत्किंचितही आम्हास वाटत नाहीं. वऱ्हाडच्या रा० रा० मुधोळकर व पटवर्धन या वकीलांवर कार्य भागेना म्हणून मुंबईचे वकील व प्रसिद्ध बारिस्टर इनव्हरारिटी यांनीं या खटल्याचा चांगला खल केला व त्यांच्या वकिलींत देखील राव साहेब देवराव विनायक यांच्या श्रमांचें वैफल्य झालें हें पाहून वाईट वाटतें. राजश्री अमृतराव यांच्या तर्फे रा. रा. जोग, चिटणीस व देसाई असे तिघे वकील काम करीत होते.

---

वाशिम ता० ४।१०।९४

हवामान— गेले आठवड्यांत पाऊस पडला नाहीं. रोगराई नाहीं. प्रातःकाळीं गुलाबी थंडी पडत असते.

परीक्षा— रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. एज्युकेशनल इन्सपेक्टर साहेब ह्यांची स्वारी येथें येऊन येथील इं. म. शाळेच्या वार्षिक परीक्षेस परवां पासून सुरवात झाली. ह्या आठवड्यांत परीक्षा संपून दसऱ्या करितां स्वारी अकोल्यास जाईल असा सुमार आहे. इन्सपेक्टर साहेब ह्यांचा स्वभाव शांत असून परीक्षकाचे अंगीं जे गुण पाहिजेत ते सर्व ह्यांचे ठिकाणीं आहेत.

ता० १ मिन्हू रोजीं स्यानिटरी बोर्डाची सभा झाली. ह्या जिल्ह्यांतील काम चांगलें आहे असा स्या० बोर्डाचा शेरा मिळाला म्हणून समजतें.

ता० २ रोजीं मेडिकल बोर्डाची सभा होती त्या वेळीं पुसद येथील नायब तहसिलदार मि० नारायण रावजी ह्यांची परीक्षा होऊन त्यास पेनशन घेण्यास लावलें. ही जागा कायमची रिकामी झाली, तेव्हां तेथें कोणाची नेमणूक होते तें पहावें. योग्य मनुष्याची नेमणूक झाली म्हणजे मिळविलें. नहीं. तर शिफारशीचे तट्टू आहेतच!

---

नोटीस.

शिवदयाळ मारवाडी दु० जळंब तालुके खामगांव यांस खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुम्ही मजजवळून सुमारें सहा महिन्या पुर्वी अकोलें येथें २५० चा रोखा करून घेतला व त्यांत रु. ययाचा भरणा रोख लिहीला आहे. परंतु आपली रूपयाची सोय अकोलें येथें न जाल्या मुळें रुपये जळगावास गेल्यावर देईन असें सांगितलें परंतु त्या प्रमाणें रुपये तुम्ही मला दिले नाहींत. मी रुपया करिता आपले जवळ दोनचार वेळ मागणें केलें परंतु आज देऊ उद्यां देऊ असें करून आतां नागवी गोष्ट सांगतां तर या नोटीशीनें तुम्हास असें कळविण्यांत येतें कीं सदहूं पुरज्या बदल मजला तुमचे देणें नाहीं. हो पुढें मागें तुम्ही सदहु पुरज्या बदल मजवर फिर्याद वगैरे काल तर मी त्याज बदल जबाबदार नाहीं सदर्हू पुरजा पोकळीस्त आहे कळावें सदर्हू नोटीशीचा खर्च आपणास द्यावा लागेल ता० ६।१०।९४

( सही )

सहाची निशानी बांगडी तुळसी

मर्द संपतसिंग ईचे हातचे असें.

दस्तुर शंकर राजाराम पटवा

री राहणार उंद्री हल्लीं

मुक्काम आकोलें

दस्तुर खुद.

---

नोटीस

भगवंतराव वल्लद रुस्तमराव पाटील मौजे उंदरी तालुके चिखली यांस खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे उंदरी येथील स० नंबर १४ माझे नांवे असून साल मजकुरीं तुह्मास बटाईनें लाविला आहे. परंतु तुह्मी करारा प्रमाणें जमिनीची किस्तकारी करीत नाहीं व खरिपाचे पिकाची ही वेळ निघून गेली व पुढें ( रब्बीचें पिकाकरितां ) ही आवला किस्तकारी करण्याचा रोख दिसत नाहीं तरी या नोटीशीनें कळवितो कीं सदर्हू नंबरची जमीन तुह्मी आपले हलगर्जीनें पडीत पाडली तरी त्याजबद्दल जबाबदार तुह्मी आहांत. मी नाहीं. तुह्मास करारा प्रमाणें माझे जमिनीचे पिकाचे नुकसान भरून दिले पाहिजे. नाहीं तर आह्मी दावा करून तुह्माजवळून भरून घेऊं. कळावें. ता० ६।१०।९४ इ०

[ सही ]

श्रीपती वा केशवराव पाटील दस्तुर

शंकर राजाराम पटवारी राहणार

उंद्री हल्ली मुक्काम आकोलें

दस्तुर खुद.

---

## वर्तमानसार.

मागें प्रसिद्ध झाल्याप्रमाणे हिंदुस्थानांतल्या लष्करी खात्याची व्यवस्था पाहून जाण्याकरतां निघालेले दोघे जपानी आफीसर या आठवड्यांत मुंबईस आले. त्यांच्या बरोबर हिंदुस्थान सरकारचा एक पोलिस आफीसरही आहे.

शांघाईची २३ ची तार सांगते कीं, मोकडन येथील खजिन्यांत चीन सरकारचे २२, ००,००,००० डालर्स आहेत व गेल्या २०० वर्षांत सांठविलेली ही संपत्ती आहे व त्या ठिकाणावर चीनचा चांगला बंदोबस्तही आहे आणि या खजिन्याच्या आशेनें त्या ठिकाणावर हल्ला करण्याचा जपानचा इरादा आहे.

जपानी फौज विजूं रस्त्याचे मोकडनवर जात असून तिला वाटेंत अजून कांहीं हरकत झाली नाहीं.

युलुनदीच्या वाटेवर चीनची ३८,००० फौज आहे.

जपानी फौजेच्या पुढें येण्यास हरकत करण्याकरतां माकडन व विजूं रस्त्यावर तटबंदी चालूं आहे.

कोरियन समुद्रांतील हइहंगटो हें बेट जपानानें घेतलें व तेथें आपल्या आगबोटीस कोळसा पुरविण्याचें स्टेशन केलें.

आंचो व इचो या चिनी ठिकाणांवर जपान्यांनीं हल्ला केला, पण चिन्यांनीं हाकून लावले.

युलु लढाईंत जपानची फार चांगली तयारी दिसून आली असें ती लढाई प्रत्यक्ष पाहणारांचें ह्मणणें आहे.

हल्ल्या त्या फौजेशीं सामना करण्यास योग्य अशा आपल्या चिलीयन फौजेस चीनसरकार पुढें आणीत आहे.

कोरियाच्या दक्षिण भागांतले लढाऊ लोक जपानच्या विरुद्ध बंडावा करण्यास प्रवृत्त झाले आहेत.

रशिया, इंग्लंड व फ्रांन्स यांणीं चीनचें राज्य वाटून घ्यावें असें रशियन ह्मणू लागले आहेत.

युलु लढाईंत असलेल्या कित्येक चिनी आफीसरावर त्या लढाईंत मूर्खपणाचें वर्तन केल्याचा त्या सरकारानें आरोप केला असून त्यांतील एकास ठारही केलें.

वजिरिस्थानची सरहद्द कायम करण्याचें काम दक्षणेस जोमाल नदीवरील डोमंडी येथून सुरू होणार आहे.

वजिरी लोकांच्या पुढाऱ्यांची जी एक सभा भरली होती त्यांत बहुमत इंग्रजांच्या तर्फेनें झालें.

मूरलोकांनीं इंग्रज कामदारास त्रास दिल्याबद्दल मूरगव्हरनरानें इंग्रजसरकारची माफी मागितली आहे.

इंग्रजकंपनीची एक आगबोट लंकेच्या वाटेनें विलायतेस जात असतां खडकास लागली. उतारू व खलाशी बचावले.

हजारों काफर लोक डेलिगोवा व या पोर्टुगीस ठिकाणावर हल्ला करण्याच्या बेतांत आहेत व त्यामुळें तेथील लोक घाबरून गेले असून तेथील इंग्रजवकिलाच्या रक्षणार्थ इंग्रज फौज तेथें गेली आहे. ७,००० महाजुला लोकांनीं ३२० पोर्टुगीस फौजेवर हल्ला करून त्यांचा मोड केला.

सैबेरियन रेलवेवर चिनी चोरट्यांनीं हल्ला करून आठ रशियन लोकांस ठार केलें.

हिंदुस्थानसरकारच्या ताफखान्याची कवाईत बलासोर येथें होणार आहे.

हिंदुस्थानच्या मिठावरील कराची जमा आलीकडे वाढत असून १८९३।९४ सालीं ९ लाख कमी झाली. परदेशी मीठ जास्त आल्यानें ही जमा कमी झाली असें ह्मणतात. ठा० अ०

मोठ्या प्रयासानें, जपानसरकार पांच लक्ष फौज जमवूं शकेल; परंतु तीस लाख फौज सहज रीतीनें चीन सरकार मिळवूं शकतें असें ह्मणतात.

पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील एका लहानशा संस्थानावर लढाई मारून इंग्रजांनीं जय मिळविला असल्या बद्दल वर्तमान आलें आहे.

आर्यलंडांत पुन्हा बंडाळी सुरू झाली.

लढाईचें सामान असल्यामुळें, चिनी लष्करांनीं कुलिंगबंदरावरून एक इंग्रजाची आगबोट पकडून नेली आहे.

लौकरच एक मोठी लढाई, एशिया किंवा आफ्रिका खंडांत उत्पन्न होईल, व त्यांत फ्रेंच व रशिया पुढाकार घेऊन, इंग्लंडवर जोखीम घेऊन गुदरेल अशा प्रकारची चर्चा युरोपांत छापाल्यानें चालली आहे.

आग्रा येथील कलेक्टराच्या बंगल्यांतून कांहीं दरोडेखोरांनीं किंकोळ सामानांची चोरी केली आहे चावडीवर दरवडा खरा!

जपानापाशीं इंग्लंडची मैत्री आहे असें लंडन टाइम्स ह्मणतें. चीनशीं रशियाची मैत्री दिसूं लागली ह्मणजे सिद्धसाधकपणा नीट जुळेल. स० वि०

बालसाधू—गुलबर्ग्याजवळच एका शेतांत धनगराच्या ७।८ वर्षांच्या दोघा मुलांनीं दगड रचून २ देवळें तयार केलीं आहेत. त्यांत २ दगड देवें ह्मणून बसविले आहेत. त्यांला गाडग्यानीं पाणी आणून स्नान घालतात. त्यांणीं देवा जवळ दिवा लावण्यास घरीं तेल मागितलें. तें मिळालें नाहीं, तेव्हां "सर्व जण आजारी पडाल" असें बोलून ते गेले, व गवताचे भारे आणून त्याच्या विक्रीच्या पैशांतून आपले देवापुढें दिवा लाविली. दुसरे दिवशीं घरांतील मनुष्यें आजारीं पडलीं. तेव्हां आईबापांनीं तेल देऊं असें कबूल केलें, व तीं बरीं होऊन वाजत गाजत त्या दोघांचे दर्शनास गेली व तेल समर्पणाचा विधि केला. तेव्हां पासून त्या देवांच्या व त्या बालसाधूच्या दर्शनास लोकांच्या झुंडीच्या झुंडी जात आहेत. त्या बाल साधूतील एक ७ वर्षांचें बालक मनकवडा आहे. मनांतील गोष्ट चटकन सांगतो. मुलाची वृत्ति वेड सर आहे. जेवणावर सुद्धां लक्ष नाहीं, अशी वृत्ति आहे. आतां त्या शेतांत कोणी देऊळ बांधणार आहेत. तेथें नाणाऱ्या दर्शनेच्छूंच्या साठीं दुकानें २ घातलीं असून तें शेत मनुष्यानीं तुडुंबें गजबजून गेलें आहे; असें गुलबर्गा समाचार पत्रकर्त्यांनी मुद्दाम बातमीदार पाठवून खात्रीपूर्वक लिहिलें आहे. स० शो०

हिंदु मुसलमानांचे आजपर्यंत कोठें कसकसे दंगे उद्भवत चालले याची थोडक्यांत माहिती:—

ता० १७ आगष्ट सन १८९३ मध्यें प्रथम मुंबईत मुसलमानांनीं दंगा करून बरेच हिंदू चीत केले.

२ कृष्णगडकडे मुसलमानांनीं गाई मारुन हिंदूस चिथवून मारामारी सुरू केली व ते खटले तेथील जज्ज ह्याडले यांजपुढें चालून कैद व दंडाची शिक्षा भोगावी लागली. यांत जडज्यानें मुसलमानास उद्देशून कळविलें कीं "तुह्मी गोहत्या करून हिंदु लोकांच्या मनास खिजाऊ नका"

३ प्रभासपट्टण मध्यें मोठा दंगा होऊन तें प्रकर्ण गोरक्षणावर ढकललें.

४ वायव्य प्रांतांमध्यें अलिगड येथील हिंदु मुसलमानांचा अग्नि मि० ज्युवर जेक्स यांच्या फाजीलपणामुळें विकोपास गेला.

५ येवले जि. नाशिक येथें मुसलमान यांणीं आपल्या अधिकाराच्या जोरावर हिंदूचे गोकुळ अष्टमीचे पालखीस आडवे येऊन मशीदीवरून वाद्यें वाजवीत जाण्यास अडथळा केला व त्यामुळें अतिशय बखेडा झाला!

६ ठाणें जिल्ह्यांत उभय जातींत असाच वणवा पेटला!

७ वसई तालुक्यांत अगर येथें मशीदीवरून वाजवीत न जाण्याबद्दल हुल्लड.

८ दक्षिण मलबारांत हिंदुमुसलमानास चिथावणी मिळून हिंदुचीं देवालयें फोडलीं व जाळलीं.

९ पुण्यास आळंदीचे पालखीस आडवे येऊन मुसलमानी दगडाचा वर्षाव पालखीवर केला व पुढें नागोबाच्या मिरवणुकी वे बाजार उडविला.

१० पुणें येथील मुसलमानांनीं गोवधाचा भयंकर देखावा दाखविल्या मुळें तुफान झालें.

११ वऱ्हाड प्रांतांत दोन तीन ठिकाणीं मुसलमान व हिंदुमध्यें चिथावणी.

त्याच प्रमाणें १२ अलाहाबाद, १३ नाशिक, १४ रत्नागिरी १५ मालेगांव, १६ चिपळूण १७ अलीबाग, १८ कल्याण, १९ सोलापूर, २० अहंमदनगर, २१ वई पुणें वगैरे.... म० मि०

---

श्री

## छापत आहे.

कै० आनरेबल राव साहेब

वि. नां. मंडलीक; सी. एस्. आय. कृत

मराठी

## हिन्दु धर्मशास्त्र

भाग १ व २.

तृतीयावृत्ति

आजपर्यंतच्या चारी हाय कोर्टाच्या व प्रिव्ही कौन्सिलच्या नवीन ठरावांचा, रा०रा० दाजी आबाजी खरे, बी. ए. एल् एल्. बी., वकील, हायकोर्ट यांच्या देखरेखीखालीं एका माहितगार गृहस्थाकडून ठिकठिकाणीं समावेश करवून व इतर प्रकारें सुधारवून तयार केलेली.

येत्या अक्टोबर महिन्यांत तयार होईल.

तारीख १५ अक्टोबरच्या आंत आगाऊ देणारास दोन्ही भागांस रुपये ६ किंमत पडेल; नंतर रुपये ८ पडतील. शिवाय टपाल हाशील व प्याकिंग खर्च आ. ६ पडेल.

पैसे भरणें ते म्यानेजर, नेटिव ओपिनियन प्रेस, आंग्र्याची वाडी, गिरगांव ब्याकरोड, मुंबई, यांजकडे भरावे. त्यांज कडून पावती मिळेल. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

---

## नोटीस.

गम्या बाहाधन्या महार राहणार कळंबी खुर्द तालुके बाळापूर हल्लीं राहणार शेगांव यांस नोटीस देणार मोघाजी वा धर्माजी पाटील राहणार कळंबी खुर्द तालुके बाळापूर नोटीशीनें असें कळवितों कीं, तूं आमचे पासून रुपये ७१ घेऊन ह्या रुपयाचे तारणा साठीं तुझें राहतें घर तूं गहाण दिलें व जंगम माल गहाण दिला आणि रुपये घेतले. ह्या रुपयास व्याज दर महा दर शेंकडा रुपये २ प्रमाणें करार करून घेतलेस व तीन वर्षांत रुपयांची फेड करून देऊं म्हणून करार केला. करारा प्रमाणें रुपये न फेडल्यास रुपये फिटे पर्यंत शेंकडा रुपये ३ प्रमाणें व्याज देऊं. अशा करारानें तारीख ३ माहे सप्तेंबर सन १८९० इ० रोजीं गहाणखत करून दिलें. त्यास आज तीन वर्षे झालीं परंतु तुजकडून आज पावेतों कांहीं एक आदा झालें नाहीं तर तुजला ही नोटीस केली आहे. तर नोटीस पावल्या पासून सदर्हू मुद्दल रुपये व त्याचें व्याज आज पावेतों मिळून रुपये देऊन निकाल करावा. असें झालें नाहीं तर रीती प्रमाणें काम चालवून रुपये वसूल करण्यांत येतील, व तों पावेतों ह्या नोटिशीच्या खर्चा सुद्धां सर्व नुकसान भरून घेतलें जाईल. म्हणून दिली नोटीस सही तारीख ३ माहे अक्टोबर सन १८९४

( सही )

सहीचीं निशाणी बखर, मोघाजी

वा धर्माजी पाटील राहणार

कळंबी तालुके बाळापूर

यांचे हातची असे.

---


## घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रोलेव रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर

नाशीक


---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ........……… ०४

Single copy........................ 4 as.

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.... ०१०६
दुसरे खेपेस ....…. ०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over 10...4 as.
Repetition per line 3 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII — AKOLA MONDAY 15 OCTOBER 1894 — NO. 41

वर्ष २८ — आकोला सोमवार तारीख १५ माहे अक्टोबर सन १८९४ इ० — अंक ४१

## सर्व नजरबंदीच्या माकडचेष्टांस हाणून पाडतां येते.

मी रस्त्यांत जेव्हां झोकांडी खात चालत असे तेव्हां लोकांनीं माझ्याकडे बोट दाखवून हिणवावें कीं पहा काय बेटा झिंगून गेलेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुह्मासही खास त्यांच्या सारखेंच वाटलें असतें. परंतु ते सर्व चुकत होते. भर रस्त्यांत मला चालतांना झोकाड्या येतात ह्मणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुष्यक्रमाचे पूर्व मार्गावर थोडेसें गेलें पाहिजे.

आज तागाईत एखाद्या आनंदी व रंगेल मनुष्या प्रमाणें मी सुखी प्राणी होतो परंतु चार पांच वर्षांपूर्वी मला वाटूं लागलें कीं माझ्यांत कांहीं कांहीं तरी कमी जास्त होत आहे. जेवतांना पूर्वी सारखी माझी क्षुधा राहिली नव्हती. मला भूक लागे व खाण्याची इच्छा होई परंतु तोंडांत घास गेला कीं लागलीच पक्काशय उमळून येई व जसें कांहीं बंडावा करून माझ्या हेतूस हाणून पाडी हें मला अरिष्ट नवीनच व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां ह्मणून खाण्याचा आव घाली तेव्हां तेव्हां मला फारच तिटकारा येई. कदाचित पोटांत कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाटतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्यामुळें निजायाला जातांना आपल्यास जशी सुस्ती चढून थकवा येतो त्या प्रमाणें मला होत असे. ह्या मुळें रात्री झोंपेचा कल अगदी बदलला. झोंप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्या सारखें मला वाटे त्यामुळें मी केव्हां केव्हां अफू किंवा इतर अमली पदार्थ घेत असे. मी जीभ पहातों तों तिच्यावर थर जमलेला आणि काम करण्याची हौस बिलकूल नाहींशी झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठींत सणाटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खांद्यांत भाला टोंचल्या सारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तों माझे डोळे पिवळे दिसूं लागले. आणि माझ्या दांत व हिरड्या सभोंवती कीट जमलेला दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्यामुळें किंवा इतर साधनें दांताजवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येई. माझा कोठा फारच जड झाला आणि पक्काशयांत घाणेरडा वायू उत्पन्न होऊन तोंडावाटे ढेंकर देतांना निघून जाई. ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं. ह्या वेळीं रस्त्यांत चालत असतां एकदम घेरी यावी, हलक वाटावें. आणि गरगर फिरल्या सारखें वाटून झोकाड्या देत चालावें व जमिनीवर सबशेल पडून नमस्कार घालावा लागत असे माझ्यानें हें विघ्न जितकें टाळतां येईल तेवढें टाळून घेई व आतां तें गेलें असें समजून तो दिवस घालवीत असे.

माझ्या मित्र मंडळींनें व वैद्यांनें जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तीं घेतलीं. त्या पासून गुण न येतां मी अगदीं सुदामदेव झालों. व आतां ह्या वस्तीस रामराम ठोकून परलोकचा रस्ता धरावा असें मला वाटूं लागलें. ह्या प्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुह्मास थोडक्यांत निवेदन करितो कीं, बरा कसा झाला ह्याचें कारण आपणास कळवावें हें अगदीं रास्त आहे. लंडनात माझा एक स्नेही होता. त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्या बरोबर त्यानें सांगितलें कीं, मदर सिजेलचा रोगहारक सिरप ( ह्मणजे माता सिजेलचा रोगहारक पाक ) तुह्मास फारच गुणकारी होईल.

माझा कांहीं त्याच्या ह्मणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक बाटली तर थोडे दिवस घेऊन पहावी ह्मणून विचार केला. मला ह्या औषधा पासून इतका जलद गुण आला कीं, मला खातांना बरें वाटलें व झोंप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्यामुळें इतकें बरें वाटलें कीं, मी ह्या औषधाच्या आणखी चार बाटल्या पार केल्या.

मी बरा झालों. हें औषध देविका सारखें वाटलें. मला क्वचित वाटलें कीं, हें औषध ईश्वराच्या प्रेरणेनेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हां ताजातवाना झालों व त्या मुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगतां पुरवत नाहींत. आतां केव्हां तरी थोडेसें अपचन झालें कीं, जें सर्वांस होत असतें, त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतों व लागलींच मला त्या पासून आराम वाटतो.

ह्याचा तात्काळ गुण असल्या मुळें मला नजरबंदीच्या खेळांची आठवण होते. परंतु खरोखर माता सिजेलचा क्युरेटिव सिरपांत डोळ्यांत माती टाकण्या सारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगतां येतें कीं, कितीही जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थिती पासून असो तरी ह्या औषधा पासून हटकून गुण पावयाचाच.

मी तुमचा उपकार मानणारा.

( सही ) जे. सी. सिमसन.
२१ ब्रानोजरचा रस्ता, न्युकास्टल अंडर लाईन, स्टाफर्ड शियर इंग्लंड.

B. T.

---

### वाशिम

११।१०।९४.

गेले जून महिन्यांत वाशीम म्यु. कमिटीनें सुमारें १५०० रुपये खर्च करून येथील बालाजीचे देवळा जवळील तळ्यांतील पाणी व गाळ काढिला. ते रुपये एक महिन्याचे आंत द्यावे, नाहीं पेक्षा कायदेशीर इलाज केला जाईल ह्मणून कमेटीनें बालाजीचे संस्थानास नोटीस दिली होती. संस्थानाकडून ही उलट कमेटीस अशी नोटीस आल्याचें समजतें कीं, तळ्याचे कामाचे रुपया बद्दल संस्थान जबाबदार नाहीं. विनाकारण जप्ती वगैरे केल्यास त्याची जबाबदारी कमेटीवर राहील. कमेटींत वकील लोक आहेत; तसेंच संस्थानासही वकीलांची सल्ला आहे. तेव्हां पुढें काय होतें, तें पहावें!

येथील आसिस्टंट कमिशनरचें कोर्ट प्रत्येक महिन्यांतून एक आठवडा हिंगोलीस जातें, ह्या मुळें येथील व तेथील लोकांसही फार कठीण झालें आहे. येथून कोणी वकील तिकडे जात नसल्या मुळें अडाणी लोकांस कायद्याचें सहाय्य व वकिलाची मदत मुळींच मिळत नाहीं व एक आठवडा येथें कोर्ट बंद असल्यानें इतर मुकदमे तहकूब राहून इतर पक्षकारांचें नुकसान होतें. वाशीम येथील कोर्टास १५।२० कोसांवरील लोक येतात तर मग बारा कोसांचे अंतरावरून हिंगोलीचे लोकांस येथें येण्यास काय हरकत आहे. सरकारास लोकांच्या गैरसोयी बद्दल येवढी काळजी वाटत असेल तर फिरतीं कोर्ट करून गांवोगांवीं जाऊन निकाल करावे. ह्या बद्दल कांहीं तरी विचार होणें जरूर आहे. व तो हल्लींचे लोकप्रिय डे. कमिशनर करितील अशी आशा आहे.

येथील म्यु. कमिटींतील एका शिपायानें एका महार गाडीवाल्यास मारल्या मुळें त्याचे डोक्यास खोंक पडली. सदर्हू महारानें फिर्याद केल्या वरून मे. डे. कमिशनर साहिब ह्यांचे कोर्टांत चौकशी होऊन शिपाई मजकुरास पन्नास रुपये दंड झाला व त्या दंडाचे रुपयां पैकीं तीस रुपये फिर्यादीस द्यावे, ह्मणून हुकूम झाला. हा शिपाई फिर्याद झाल्या दिवसा पासून सस्पेंड होता. त्यास पुन्हां कायम करावा किंवा नाहीं याचा ता. ३ च्या म्यु० कमेटीचे सभेत विचार होऊन बहुमतानें त्यांस कायम करावा व तो सस्पेंड असलेले दिवसाचाही त्यास पगार द्यावा असें ठरल्याचें समजतें. ज्याचेवर अपराध शाबीत होऊन ज्यास दंडाची शिक्षा झाली त्यास पुन्हा नोकरीवर ठेवण्यास कांहीं विशेष कारणें असतील असें वाटतें; परंतु ती कारणें प्रसिद्ध झालीं पाहिजेत किंवा कोणत्याही कारणावरून त्यास पुन्हां नोकरीवर ठेवणें बरोबर नाहीं असेंही कांहींचें ह्मणणें आहे. असो, खरें काय आहे तें कमेटीचे मेंबरास माहीत असेल.

ता. ३ च्या सभेंत दुसऱ्या एका महत्वाचें विषयाचा विचार झाला. येथील पूर्वींचे कान्सर्व्हन्सी इनस्पेक्टर रा. रा. नपु श्रीकृष्ण त्यास त्यांचे ह्मणणें ऐकून न घेतां कमेटीनें बहुमतानें कामावरून दूर केलें होतें त्यानें मे० कमिशनर साहेबाकडे अपील केल्यावरून सदर्हू इसमाचें ह्मणणें ऐकून घेऊन नंतर कमिटीस योग्य दिसेल तें करावें." असा कमिशनर साहेबांचा हुकूम आला होता. तें सर्व प्रकरण विचारा करितां ता० ३ चे सभेंत होतें. त्या संबंधानें पुन्हां पूर्वीं प्रमाणेंच बहुमतानें त्यांस दूर करावें ह्मणून ठराव झाला. ह्या दोन्ही ठरावा वरून येवढें निघतें कीं, येथील कमेटींत दोन पक्ष झाले आहेत. सार्वजनिक कामांत आपलें खानगी बरें वाईट एकीकडे ठेऊन योग्य दिसेल तें बोलणारे गृहस्थ बाल्यास येणें हो मोठेंच नशिबाची गोष्ट आहे.

---

## विजयादशमीचें सोनें

THE CLOUD

I bring fresh showers for the thirsting flowers,
From the seas of the streams;
I bear light shade for the leaves when laid
In their noonday dreams.
From my wings are shaken the dews that waken
The sweet birds every one,
When rocked to rest on their mother's breast
As she dances about the sun.
I wield the flail of the lashing hail,
and whiten the green plains under,
And then again I dissolve it in rain,
And laugh as I pass in thunder.

बहु दूर दूर जाउनि जलनिधि तटिनी-
जलासि सेवोनी ।
प्रत्यग्र नीरवृष्टि म्लान-सुमीं मी करी नगीं
रानीं ॥१॥
मध्यान्हीं चंडातप-तप्त लतापर्णवृंद खिन्न मनें।
निद्रा वरी; सुखवहा छाया देतों तयासि
हर्षानें ॥२॥
मी दीर्घ पक्ष पसरुनि खगला दवबिंदु
वर्षतों विपुल ।
त्या सुप्रभात समयीं निद्रेंतूनि उठावितों
विहंगकुल ॥३॥
येता रजनी जननी-चंचल-वक्षः-स्थलीं
खगें वरिली ।
दीर्घ सुषुप्ति, रविकरीं दिसते ती भूतधात्रि
रागेली ॥४॥
मी बलवान् वर्षोपल तीक्ष्ण मुसलधार
सोडितों अस्त्र ।
आच्छादितों हरिद्वन, जाणों सित पांघरे
मही वस्त्र ॥५॥
त्या करकांचा करितों विध्वंस पुन्हां नवीन
पर्जन्यें ।
विद्युत्समागम जयीं हांसत जातों नभीं
प्रसन्न मनें ॥६॥

---

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन वद्य १ शके १८१६

एका गुलहोसी सिव्हील सर्जनाच्या चुंबनलालित्यानें त्याच्या जन्माचें मातेरें विलक्षण प्रकारें झालें! डाक्टर स्मिथ म्हणून मद्रासेस

एक सिव्हील सर्जन आहेत. त्यांनीं मिसेस क्रेग इचा मुका घेतला. तिनें नवऱ्याला सांगितलें. त्यावर डाक्टरानें माफी मागितली तथापि तें प्रकरण कलेक्टर कडून मद्रास सरकारास कळलें. डाक्टराची बदली ब्रह्मदेशांतील वैराण प्रदेशांत झाली पण स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं त्यावर ताण केली आणि डाक्टरास राजिनामा देण्यास भाग केलें! चुंबनासाठीं पारिरस्प फार भयंकर झालें. युरोपियन बाई होती व वशिला पोचला ह्मणून एवढी सुनीतीपर गोष्ट घडली पण नेटीव स्त्रियांचा उपमर्द व बेअदबी करितांना पकडलेल्या युरोपिनास सरकारनें चांगलें योग्य शासन केल्याचें आह्मास स्मरत नाहीं. फार तर काय पण नेटिवांचे प्राण घेणारे गोरे राक्षस देखील कसे तरी दोषमुक्त होतात! न्याय देवता एका डोळ्यानें आंधळी आहे काय!

---

हिंदुस्थान सरकारानें चार व्याजाच्या सबंध ठेवी ३॥ व्याजाच्या केल्या विषयीं नवा हुकूम सोडला आहे. लोकांच्या ठेवी वरील व्याजाचा दर कमी केल्यानें सालिना एक अर्धा कोट रुपयांचा फायदा झाला परंतु या कृती मुळें सरकारची सूक्ष्मदृष्टी व्यक्त झाली खरी पण लष्करी खर्च, पगारावर आकारलेली हुंडणावळीची मगोती, दरमहाचीं पगारांचीं ओझीं इत्यादि सहस्त्रावधि प्रकरणांत हत्तीचे हत्ती गडप होऊन सर्व राष्ट्रीय खजिना रिकामा पडला आहे तिकडे सरकारची दृष्टी आंधळी कां होते !

---

मुंबईचे गव्हरनर नामदार लार्ड हारिस यांची पंचवार्षिकी पातशाही संपत आली हें पाहून तिकडील लोकांस थोडाबहुत दुःखपरिहार वाटेल. या नामदारांच्या मंत्रिमंडळीनें सर्व महाराष्ट्र अस्वस्थ, निराश व संकटापन्न करून सोडला आहे. खरोखर त्या इलाख्यांत हिंदु मुसलमानाचे तंटे नाहींत पण सरकारच्या मुलतानीला अवरोध करण्याचें हिंदु लोकांच्या कपाळीं आलें आहे. हिंदु लोकांच्या शक्तीची परीक्षा घेण्याची ही सरकारी कुलूपी अजब युक्ती असावी असा आमचा पक्का ग्रह झाला आहे. लार्ड हारीस हे चेंडूला टोले मारण्यांत जसे निष्णात आहेत तसें हिंदू लोकांना टोले मारून मुसलमानांच्या हातून त्यांस झेलून आणविण्यांत मोठे चतुर आहेत असें म्हणावें लागतें. सोलापुरास लार्ड हारिस यांच्या अखेरच्या सफरीचा तळ गेल्या अठवड्यांत होता तेव्हां नामदार साहेबांस तेथील मुनसिपालिटीनें मानपत्र दिलें त्यावर उत्तर देतांना नामदार साहेबांनीं आपल्या अभिप्रायांचा परिस्फोट स्पष्टतेनें केला. कायदे कौंसिलाचे जे हक्क दक्षिणेंतील मुनसिपालिटीच्या संस्थांस देण्यांत आले आहेत त्या हक्कांला दक्षिणी लोक अपात्र आहेत; त्या अर्थी अधिक निराळे हक्क मिळण्याची गोष्ट बाजूसच राहिली पण सध्यां जे दत्त हक्क आहेत त्यांला आपली योग्यता दक्षिणी लोकांनीं दाखविण्यास शिकलें पाहिजे हिंदू लोकांना संबोधून नामदार ह्मणाले कीं सरकार काटेतोल व निष्पक्षपाती आहे, हिंदु लोकांची मुसलमानांशी वागणूक मिळावटीची, सलोख्याची व स्नेहप्रवर्तक अशी नाहीं, आणि हल्लीं जी गडबड व अस्वस्थता पसरली आहे ती हिंदु लोकांच्याच कृतीचें फळ आहे! हे सर्व विचार डोळ्या समोर फिरूं लागले म्हणजे भावी स्थिती अधिक कष्टमय होते कीं काय अशी मोठी भिती मुंबई इलाख्यांतील लोकांस आहे हें पाहून आम्हांस फार वाईट वाटतें.

---

## देशाभिमान

पुण्याच्या युरोपियन व युरेशियन विद्यार्थ्यांस देशाभिमान जागृत ठेवण्याविषयीं लार्ड हारिस यांनीं थोडे दिवसापूर्वीं बोध केला. आपला स्वदेश ह्मणजे इग्लंड या मातृभूमीस विसरूं नका, तिचा उत्कर्ष सर्वतोपरी मनांत वागवा. आणि प्रत्येकाची कृति सूक्ष्म असली तथापि अशा देशाभिमानी मनुष्यांचा समूह जेथे जेथें जमेल तेथें तेथें देशाभिमानाचा बावटा फडकत राहू द्या, आणि इंडियांतच आपल्या कर्तव्याची इतिश्री संपते असें न मानतां आपल्या मातृभूमीचें साम्राज्य सर्व पृथ्वीवर पसरेल व कायम राहील असें वागा इत्यादि बोधपर वचनामृतें लार्ड हारिस यांच्या मुखांतून ऐकतांच सर्व विद्यार्थिगणांनीं टाळ्यांचा गजर करून प्रोत्साहनपर उद्गार काढले.

लार्ड हारिस यांनीं जो देशाभिमाना विषयीं उपदेश केला तोच उपदेश आह्मी आमच्या लोकांस करूं लागलों ह्मणजे त्याचा अर्थ काय होतो? हिंदुस्थानांत जे आमरण वास्तव्य करणारे आहेत त्यांस नेटीव या संज्ञेखालीं असा बोध केला तर त्या कृतीला राजद्रोह असें आंग्लो-इंडियन ह्मणूं लागतील. देशाभिमान ह्मणजे सर्व देशवास्यांची स्वार्थपरायणता नव्हे काय? आह्मी आमच्या इंडियाचीच फिकीर केली, आणि त्या देशाभिमानाच्या वाऱ्यानें ग्रेट ब्रिटनला द्वितीयस्थान दिलें ह्मणजे इंडियाच्या हिताची व ग्रेट ब्रिटनच्या हिताची दिशा परस्पर उलट येईल त्या स्थळीं आह्मास देशाभिमानानें ग्रेटब्रिटनला विसरावयाला लागेल असें उघड होतें.

खरा आमचा देश राजकीय व्यवस्थे प्रमाणें इंडिया हा नव्हे. चक्रवर्तिनी महाराणी सरकारच्या साम्राज्याखालीं ग्रेटब्रिटन व इंडिया यांचा एक जीव झाला आहे. वस्तुस्थिती प्रमाणें आमचा देशाभिमान ह्मणजे या साम्राज्या खालील सर्व देशांविषयीं सारखा अभिमान होय. इंग्लिश राज्याची रचना भूगोल दृष्ट्या निराळेपणा दाखविते तथापि नुसत्या राजकीय दृष्ट्या तरी सर्व मिळून एक देश मानण्याचा प्रचार आहे. आणि याच एका राज्याचे खरे राजभक्त आह्मी बनूं इच्छितों. दादाभाई नवरोजी यांनीं जो नवा राजधर्म शिकविला आहे तो देशाभिमानाचा असाच धडा घालून देतो आणि तोच आपण सध्यां पाठ केला पाहिजे.

देशाभिमानाचें वर्तुळ फार मोठें आहे. त्याच्या परिघाला पोंचण्यापूर्वीं दुसरीं वर्तुळें पुष्कळ ओलांडावीं लागतात. सर्व वर्तुळांचा मध्य बिंदु 'स्वत्व' हा आहे स्वत्वापासून देशाभिमानापर्यंत अंतर मोठें आहे आणि त्या प्रदेशाचें सिंहावलोकन केल्यानें कांहीं स्थूल कल्पना आपल्या मनांत येईल. आह्मास इंग्लिश राज्य कशासाठीं पाहिजे? इंडियाच्या सुरक्षितपणासाठीं. इंडियाचा सुरक्षितपणा आमच्या प्रांतासाठीं, आमचा प्रांत आमच्या गांवासाठीं, गांव आपल्या घरादारासाठीं, व घरदार स्वतांच्या सुखासाठीं अशी परंपरा आहे. परंतु स्वकीय सुख निरंतर, अव्याहत, व यथेष्ट मिळावें ह्मणून स्वार्थत्याग केलाच पाहिजे. स्वसुखासाठीं स्वसुखत्याग केला पाहिजे हें ह्मणणें विसंगत दिसतें परंतु मानवीं खरीं सुखें एकलकोंडेपणांत, आपमतलबाच्या सर्व व्यापी व्यामोहांत व परहित चिंता ताटातुटींत नसतात. जो नर आपल्याच पाया पुरतें पांघरूण ओढील, तो तर अखेर सुखविन्मुख व अदूरदृष्टीचा ठरेल. तेव्हां स्वसुखासाठीं देखील प्रत्येक मनुष्यानें परहितरत असलें पाहिजे. याचा अर्थ असा कीं आपलीं तात्कालिक सुखें सोडू आपण आपल्या घरदारासाठीं, गावासाठीं, प्रांतांसाठीं, देशासाठीं व इंग्लिश राज्यासाठीं स्वतांस झिजाविण्यास शिकलें पाहिजे. या कार्यासाठीं चंदना प्रमाणें देह कष्टविण्यांतच खरा देशाभिमान आहे. या उत्तम कोटींतला देशाभिमान व लार्ड हारिस यांचा कोता देशाभिमान यांत किती अंतर आहे. इंग्लिश लोकास हा देश सुखसाधनांचा समुद्र वाटतो आणि यांत आपली आगबोट चालवून येथील संपत्ति इंग्लंडांत नेण्या पलिकडे त्यांस इंडियाची काळजी नाहीं. समुद्राच्या बुडाशीं असलेलीं मोत्यें काढण्याहून दुसरा हेतु पाणबुड्यांचा नसतो तद्वत आमचे राज्यकर्ते या देशाला पाणबुडे लागले आहेत. लार्ड हारिस यांच्या उपदेशानें आपपरभावाचें नवें बीजारोपण होत नाहीं काय व स्वार्थलोभानें इंग्लंड व इंडिया यांचा भुगोलांतील भिन्नपणा राजकीय दृष्ट्या देखील कायम ठेवावा असा कित्ता आंग्लो-इंडियनास राज्यकर्तेच घालून देत नाहींत काय? मग तो जर आह्मी काळजीपूर्वक गिरविला तर काय हरकत आहे?

---

The Berar Samachar

MONDAY OCTOBER, 15, 1894

## THE PRESENT MAHA—RASHTRA

Our Bombay contemporaries are set on doing us an irreparable harm by commenting upon the arguments which appear in the Vernacular Press. They are however indirectly doing us a service. We need not be discouraged at the discreditable attitude which they have assumed. One thing is certain and on it at least there are no two opinions. The people as a whole are infuriated. They are discontented and smarting under wrongs real or imaginary. This much has deen admitted and recognised.

We can not but admire the ingenuity of the contrivance adopted by the Bombay dailies in shifting the burden of proof from those to whom it properly belongs and who we suspect would find it cumbersome. It is for the prosecutor to make out his case. The Bombay Gazette has of late become an essentially Government organ and its spirit is rather of the bar than of the bench. Its attempts however plausibly honest in winning over public opinion to the Government unhappilly and to foster the bitter rancour which unfortunately sprang up between the rulers and the ruled. In upholding the cause of its clients it has deliberately set itself on a palpable misrepresentation and profound disregard of the Hindus.

Unfortunately since the year that closed there have been palpable signs of the revival of those animosities and religious intolerances which it was the boast of the ruling power to have imposed silence upon by a common subjection. In Ovid we are told of a strange metamorphosis between a serpent and a man. The unusual and unnatural excitement which the nation sustained for over a decade of centuries of altern ate oppression, self government, and maintenance of order necessarily sought repose broken only by one convulsive commotion. The palsy which thus lulled the public mind into repose appeared to be everlasting and deluded our most benign rulers into a belief that the people were inevitably doomed to any sort of contumely and indignity that would he heaped upon them. This was certainly a misleading understanding. Able thinkers and writers like Mill and Macaulay eventually, have betrayed a boundless contempt for the people whose loyalty owing to the tranquility and peace afforded by the paramount power remained unaffected. Even now it is as firm as the soundest basis would require it. But the Government ever suspicious of the ruled have by a series of overt insults showed the people "do all you can to give honest pledges of your sincerity and fidelity, we are determined to pursue the policy of wounding your feelings and affronting you." They began by showing partiality to the Parsis more akin to our rulers by their power of adaptability and to the Natives by the observances of certain rituals and keeping up of certain promises made to the original rulers of the soil on their emigration into it. This was not only brooked but acquiesced in. The fervour of the reception accorded to the Honorable Dadabhoy Naoroji, of the public and earnest sympathy felt for the families of Sir Jamsetji Jijibhoy and Sir Dinshaw Manakji Petit and of Khan-Bahadur Pestonji Padamji and several other Parsi gentlemen and families would prove to a demonstration that the people are not blind to religious sects. They are on the other hand ready to respect merit actual or presumptive and to pay respect to virtue fallen or towering wherever they be found. Where were the religious animosities of the Hindus and Mahomedans proir to the Mohorum of the preceding year? In isolated places like Burhanpur, Raver and Malegaon there were Hindus, even prior to this date smarting under the wrongs done to them by their Mahomedan brethren. But was ever any serious notice taken of them either by the people at large or by the Governments under whose jurisdiction those atrocities were perpetrated? In Burhanpur the Mohurrum of every year previous to three years ago never continually passed without the bloodshed of the Hindus. In December 1890, one cold night more than 10 Hindus were mortally wounded. Yet no cry was raised. The people were lulled into a misplaced confidence in their rulers, who are never sparing of empty and delusive speechifications on such occasions. But speeches and professions of adherence to justice ever remained unaltered and nevertheless all footsteps were turned the same way. The people knew full well that in all questions in which people of two creeds were involved the Government were ready to throw in their balance against the Hindus, the original inhabitants of the country. Yet they willingly

submitted trusting the eyes of their just, impartial, enlightened and benign rulers would be opened at last to the real state of things.

(to be continued)

Whatever may be the religion of a nation, it is religion that has modelled a national life and aspirations. Religion is the best available check over human passions and emotions. This ultra control teaches men to appreciate the eternal pleasure of virtue and the painfulness vice that are to follow human ils in the next life. The Hindu of Madras while admitting this superhuman force as a grand power proceeds to observe:—

"The nation might devote its best energies to the self imposed duty of carrying out in its manifold details, the following general programme: "(1) Of steadily raising the naral level of successive generations, morally, physically, and intellectually, by every reasonable means that could be suggested; (2) of keeping its numbers within appropriate limits; (3) of developing the health and vigour of the people. In short, to make every individual efficient, both through nature and by nature. A passionate aspiration to improve the heritable powers of man to their utmost, seems to have all the requirements needed for the furtherance of human evolution, and to suffice as the basis of a national religion, in the sense of that word as defined by J. S. Mill, for, though it be without any ultra-rational sanction, it would serve to "direct the emotions and desires of a nation towards an ideal object, recognized as rightly paramount over all selfish objects of desire.""

We are glad to find that our high estimation of Mr. Hare's literary abilities is confirmed by the Judicial Commissioner who remarks thus on his criminal report of this district:—

"*Akola*—Captain Morris was in charge of the district till the end of October. The report was written by Mr. Hare who had been only two months in the district, and is a most careful and able report. The feature of the report is the ill success that attended prosecution. The percentage of convictions is the lowest in the province and the tendency of getting worse results in this respect has been continuous for some years. With reference to Mr. Obbard's remarks on the subject of nuisance cases, I think, perhaps, he has misunderstood Mr. Hare, who, must have known what occurred in Basim in these cases and the orders when issued. The Deputy Commissioner's remarks on the subject of prosecutions for bad livelihood show that he is alive to the improtance of careful discrimination in these cases."

## वऱ्हाड.

गेल्या १।११ वे तारखेस पोलीस लोकांची चांदमारी झाली. त्या वेळीं सकाळचे सहा वाजल्या पासून मार्च करीत होते व ब्यांड वगैरे चालू होता.

कर्नल लेन साहेब रजेवरून परत येऊन काळच्या गाडीनें उमरावतीस गेले.

आणि ते कामावर रुजूं झाल्या कारणानें त्यांच्या रजेंतल्या बदल्या संपुन असि. पोलीस सुपरिनटेंडेंट मि. राईट (छोटे राइट साहेब) हे आकोल्यास येऊन मि. स्पानस्की यांची आकर्टींग असि. पोलीस. सुपरिनटेंडेंटची नेमणूक बंद होईल.

गेल्या पोलीस खात्याच्या परीक्षेंत तेव्हांच्याचे चांफ कानस्टेबल मि० बिहारीसिंग नापास झाल्यामुळे त्यांस एकदम हेड कानस्टेबल केलें म्हणजे ४० पगाराचा १५ रुपये पगार झाला. २५ वर्षांवर यांची नोकरी आहे तेव्हां पेनशनला आलेल्या मनुष्याला परीक्षेची कसोटी नको होती आणि परीक्षा लागू केली तर निदान ही शिक्षा नको होती. मि० राईट यांनीं फार कडक शिक्षा दिली तेव्हां कर्नल लेन कृपावंत होऊन ती रद्द करितील असें आम्ही इच्छितों.

पातुरास गेल्या • व तारखेसही पेटाना हिरसभा भरली असतां कित्येकांचा चुकीचा ग्रह झाला होता परंतु रा. रा. शिवरतन सिंह वर्मा यांनीं सर्वांची योग्य समजूत घातल्यावरून तेथील काजी साहेब सरफरन अली आ॰री माजिस्त्रेट यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारून सभेचें काम अत्यंत प्रेक्षणीय झालें.

आकोला लायब्ररीच्या व्याख्यान मालेच्या पद्धती वर पातुरच्या 'शंकरसिंग लायब्ररींत' व्याख्यानमाला सुरू झाली आहे. चांगले अनुकरण!

आकोल्यास येत्या ३।४ थे तारखेस जी प्रांतिक राष्ट्रीय सभा भरणार आहे तिला गांवोगांवाहून प्रतिनिधी निवडून पाठविण्यासाठीं बाळापुर तालुक्यांत सभा भरू लागल्या आहेत आणि अशा सभा येत्या एकदोन आठवड्यांत सर्व प्रांतभर भरत असल्या विषयीं आनंदकारक वार्ता कळविण्याचा योग येईल असें आम्ही इच्छितों.

No. 44

Order of Dissolution of Partnership

Section 215 of the Code of Civil Procedure

In the Court of Civil Judge at Akola

Civil suit No. 105 of 1894

Sewaram Mahidas and Rampratap trading in the name of Laxmandas Mahidas of Khamgaon Manager Sewaram by Mukhtiar Anandrao Ambadas of Akola — Plff.

Kesheo Mansaram Vidur of Khamgaon — Deft.

Claim Rs. 2000

It is declared that the partnership in the plaint mentioned between the Plff. and Deft. to stand dissolved from the 17th. day of September 1894.

Akola 10-10-94 } (sd) V. N. Dandekar
Civil Judge
Akcla District

True Extract
V. N. Dandekar
Civil Judge

नोटीस.

रा. रा. बाळकृष्ण पांडुरंग जोशी राहणार लाखणवाडा हाली वस्ती खामगाव यांस नोटीस देणार हरी अपा वल्लद गोविंद अपा वाणी राहाणार लाखणवाडा बुजरूक तालुके बाळापुर जिल्हे अकोले नोटीसीने असे कळवितो की तुम्ही १८ माहे सपटेंबर सन १८९४ इसवी रोजी हातची रजिष्टर नोटीस दिली ती पावली. नोटीशित लिहिले प्रमाणे रुपये ७५ शेचा बारामहिनेचा ठराव तुम्हां बरोबर आम्हीं केला नाहीं. तुम्हांस तुमचे मेहनती बद्दल ठराव बारा महिन्याचा रुपये ३० तीस उक्ता ठराव केला होता त्या प्रमाणें तुम्हीं आमचे पासून येकंदरीत रुपये (४५) पंचेचाळीस घेतले आहेत. व त्याज बद्दलचा हिशोब आज पावेतो तुम्ही दिला नाहीं. सदरहू रुपये (४५) चा हिशोब तुम्ही नोटीस पावल्या पासून च्यार दिवसात तपशिलवार खात्री लायक द्यावा. आमची खात्री जाहाल्यास तुमचे देणें आम्हां कडे निघाल्यास आम्ही देणेस तयार आहो. तुम्ही विनाकारण हिशोब वगैरे न दाखविता नोटीस देणे भाग पाडले अशाच तंडेलपणाने तुम्ही आणखी फिर्यादीचे वगैरे खर्चात आम्हास घातल्यास त्याज बद्दलचे जबाबदार आम्ही कोणच्याही प्रकारानें नाहीं. कारण तुम्हीं हिशोब रितवार दाखऊन रुपये जे तुमचे आम्हांकडे निघतील ते च्यार दिवसात घेऊन जावे. असे जाहाले नाहींतर आमचे रुपये तुम्हांकडे तुमचे रुपये अंदाजाने साहामहिन्याचे सदरील ठरावा प्रमाणे पंधरा १५ रुपये वजाजाता बाकी रुपये (३०) ही नोटीस पावल्या पासून च्यार दिवसात आणुन देऊन निकाल करावा. असे जाहाले नाहींतर योग्या रितीने कोर्ट मारफत नुकसानी सह वसूल केले जातील. म्हणुन दिल्ही नोटीस सही तारीख १३।१० ९४ इसवी.

(सही.)

सही हरी आपा वल्लद गोविंदअपा राहणार लाखणवाडा दस्तुर सदासिव हरी अपा.

नोटीस.

मि. बाळाराम हेड कानस्टेबल व कालिकासिंग कानस्टेबल औटपोस्ट अडगांव यांस.

मेहरबान डेपुटी कमिशनर साहेब बहादुर यांनीं माझ्या अर्जावर तोंडी हुकूम दिल्या अन्वयें व पोलीस आक्ट ५ सन १८६१ चें कलम ४२ प्रमाणें मी नामें गणपती वल्लद बिठोबा पाटील राहणार लोहारी तालुके आकोट अशी नोटीस देतो कीं शिवराम नांवाच्या मनुष्या वरील वारंट मी तो मनुष्य नसतां मला पकडून हातकडी घालून दोरखंडानें आखला प्रमाणें औट पोस्टांत नेऊन तेथें रात्रभर पिंजऱ्यांत ठेविलें आणि आकोटास नेल्या नंतर मला तेथून सोडण्यात आलें. वारंटाची व पकडल्याची तारीखवार मला आठवत नाहीं तरी त्याचा सरकारी दप्तरीं दाखला पाहिजेच.

इंग्रजी राज्या खालीं मला विनाकारण खोट्याच नांवानें कांहीं विचारपूस न करितां फुकट वारंटांत पकडले आणि माझी हाल अपेष्टा व बेअब्रू करून कैदेंत ठेविलें त्या मुळें माझ्या पाटीलकीच्या घराण्याला डाग लागला आणि मला जाती मध्यें तोंड काढून फिरण्यास जागा नाहीं तर या बद्दल मी आपल्यावर फौजदारी काम ही नोटीस पावल्या नंतर योग्य कोर्टांत चालविणार आहे. कळावें तारीख १३-१०-९४ इ.

(सही)

गणपती वल्लद बिठोबा पाटील
राहाणार लोहारी निशाणी
खुद्द हातची.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावे ह्मणून त्याने जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयी जाहीरांत.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ६ प्रमाणें

दि० क्लास नंबर १५ मि० नंबर १८/९४

विद्यमांन सिव्हिल जडज्य साहेब जिल्हे अकोला यांचे कोर्टांत.

नांव गंगाराम वा। भवानी सोनार
आई गोपिका मर्द भवानी सोनार
राहणार बाळापूर तालुके.
जिल्हे अकोले यांस मयत.

भवानी बापाचें नांव परशराम राहणार बाळापूर ता. बाळापूर जिल्हे अकोले याचे कर्ज वसुल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावे ह्मणून सदरहु अर्जदार याणे अर्ज केला आहे त्याजकरिता सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यात येत आहे कीं, त्याणी तारीख २३ माहे अक्टोबर सन १८९४ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल. त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावे. तारीख १० माहे आक्टोबर सन १८९४ इसवी.

V. N. Dandekar.
सिव्हिल जडज्य.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करतां येण्या साठी सरटीफीकिट मिळावें ह्मणुन त्यांने जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन१८८९ चा आक्ट ७ कलम६ प्रमाणें

(वर्ग १५) दि. की. मि. नंबर १९/१८९४

विद्यमान सिव्हिल ज्यडज्य साहेब जिल्हा आकोला यांचे कोर्टांत.

नांव गणपत वा। दत्ताजी आ०
पा० क० मातोश्री बनाई जवजे दत्ताजी
राहणार सिलोडें ता० आकोला.
जिल्हा अकोला यास मयत

दत्ताजी बापाचें नांव जानजी राहणार सिलोडे ता. आकोला जि. आकोला यांचे कर्ज वसूल करितां येण्या साटीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्यांचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख २६ माहे अक्टोबर सन १८९४ इसवी रोजीं सदरहु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख ११ माहे अक्टोबर सन १८९४ इ०

V. N. Dandekar.
सिव्हिल जडज्य.

## वर्तमानसार.

जपान सरकारची फौज आरमारातून उतरून चिफू बंदराच्या उत्तरेस तिने तळ दिला आहे.

व्हाईसराय लिहुंगचंग ह्यानें चीनच्या बादशाहास विनंती केली कीं, लढाईची सर्व व्यवस्था माझ्या ताब्यांत द्यावी. ती विनंती बादशाहानें मान्य केली. त्याप्रमाणें त्यांनीं आपला फौजेचा तळ लुटाई येथें दिला आहे.

जपानचें सैन्य मनचूरियावर चाल करून येईल म्हणून त्यांना सामना करण्या करितां चिनानें आपली फौज कोरिआ प्रांतातून काढून घेऊन चिनलिएनचेंग येथें जमून ठेविली आहे.

जपानचा राजा आपणास सूर्यवंशी ह्मणवितो असें कळतें.

पोर्टलुई— आक्टोबर ता० ३ मडागास्कर येथील बंदरावर फ्रेंच आरमारानें नाकेबंदी केली आहे. व त्याबद्दलचा जाहीरनामाही काढण्यांत आला आहे.

जपानची फौज नलचेन येथें येऊन दाखल झाली आहे.

असें समजतें कीं, ५००० जपानिज फौजेनें पोसियट बंदरावर उतरून तळ दिला आहे.

सेंटपिटर्सबर्ग-- रशियांतील खेट नांवाचें लष्करी वर्तमानपत्र चीन आणि जपानच्या लढाई संबंधानें लिहितें कीं, जपानें कोरीया प्रकरणांत खबरदारीनें वागावें. व कोरीया खालसा करण्यात स्वप्नीही बसूं देऊं नये. कारण यामुळें रशीयाचा पायाची आग मस्तकास जाऊन पोंहोंचेल.

सिंहलद्वीपच्या एका पत्रावरून कळतें कीं, समुद्रांत फार लांबवर एक महाभयानक आग लागलेली आढळण्यांत आली आहे. ही आग, समुद्रतांच असून पाण्यावासून दोन गज वरती त्याच्या ज्वाला येतात. व त्यांचा रंग निळ्या रंगाचा आहे. असें खलाशी लोक सांगतात. " विचित्राणि विचेष्टितानि. "

बनारस येथील एक श्रीमंताचा मुलगा एका मुसलमाणीण वेश्येला बरोबर घेऊन विंध्याचल देवीच्या देवळांत गेला होता. तेथें त्या मुसलमान स्त्रीस नेऊन, भलभलतें आचार केल्यामुळें, देवी अत्यंत कोपिष्ट होऊन तेथच्या तेथेंच त्यांस भयंकर भिति दिसण्यांत आली. बरोबरच्या मंडळीनांही याचा प्रसाद भोगावा लागला. देवीच्या देवळांत कोणी देखील जाण्यास धजेना. इतका तेथें भयंकर ध्वनी होत होता. अनाचार करणारे लोक तर मेलेच. अखेर मोठ्या खटाटोपानें देवीची पूजा अर्चा यथासांग केल्यावर, निकडे तिकडे स्थिरस्थावर झालें असें कळतें. अनाचार करणारांनां इतर जागा नाहींत कीं अगोदर अनाचार व पुनः पवित्र जागेत; त्यांचा असा परिणाम झालाच पाहिजे.

— राष्ट्रीयसभा यंदा मद्रासेस भरणार आहे ही गोष्ट सर्व प्रसिद्ध झालीच आहे. या वेळीं पुढील प्रमाणें विषयांचा विचार होईल असें दिसतें:— ( १ ) कायदे कौन्सिलाची रचना विशेष चांगल्या पद्धतीवर करणें; (२) कायदे कौन्सिलबाबद झालेल्या कायद्यांत सुधारणा; ( ३ ) फौजदारी व दिवाणी अधिकार, एकाच अधिकाऱ्याच्या हातांत नसावे; ( ४ ) सिविल सर्विहसच्या परीक्षे बद्दल पार्लमेंटाच्या ठरावा विरुद्ध स्टेटसेक्रेटरीनें दिलेल्या अभिप्राया विरुद्ध पुरावा; ( ५ ) हिंदुस्थानच्या प्रजेची दरिद्रिस्थिती इंग्लंडच्या लोकांस कळविण्याची व्यवस्था ( ६ ) स्टेट सेक्रेटरीचे आफीसचा खर्च काढून टाकण्याची खटपट याप्रमाणें मुख्य असून या शिवाय आणखी कांहीं विषय निघतील असें वाटतें. या वर्षी आदरसत्कार करणाऱ्या मंडळीचे अध्यक्ष, मद्रास येथील आ० रंगनाथ नायडू यांस निवडलें आहे. स० वि०

कुत्र्याचें शहाणपण.—विलायतेमध्यें ट्रामवेच्या गाडीच्या चाकाचा धक्का एका कुत्र्यास लागला त्या योगें त्याच्या एका तंगडीस फार इजा झाली तेव्हां तो तसाच लंगडत लंगडत त्याचा धनी ज्या एका डाक्टराच्या दवाखान्यांत औषधोपचारास्तव जात येत असे त्या दवाखान्यांच्या इमारतीजवळ गेली व वाड्याचा दरवाजा बंद होता तो पायांनीं खरवडून मोठा गोंगाट त्यानें तेथें केला, त्यावरून दरवाजा उघडण्यांत येतांच तो झरदिशी आंत शिरला व डाक्टरासमोर उभा राहून आपल्या तंगडीस झालेली दुखापत त्याणें दाखविली, ती पाहून डाक्टरही आश्चर्यभरित होत्साता त्याणें औषधोपचार करून त्याच्या तंगडीस पट्टा बांधला. तदनंतर त्या शहाणें कुत्र्यानें आपला कृतज्ञपणा दाखविण्यास्तव ह्मणा किंवा डाक्टराची 'फी' देण्यास्तव ह्मणा डाक्टराच्या हातास मोठे प्रेमानें व नाचून बागडून चाटलें व पुढें तंगडी बरी होई पर्यंत तो दोन तीन वेळां त्या दवाखान्यांत आपण होऊन गेला होता.

पैशापासून नफा—गेल्यासाली तांब्याचें नाणें पाडण्यांत सरकारला पांच लाख रुपये नफा मिळाला. तांब्यांस कांहीं किंमत तरी आहे. कागदांच्या नोटांपासून किती फायदा होता बरें !

सोळा मिनिटांत बूट शिवून तयार करण्याचें एक यंत्र विलायतेंत निघालें आहे.

चोर पकडण्याची अजब युक्ति.--अमेरिकेंत एकानें घरांतील चोर पकडण्याची एक अजब युक्ति योजिली. एका सावकाराचे पैशाच्या पेटीतून त्याच्या नोकरांपैकीं एकजण दररोज कांहीं पैसे चोरीत असे. तो चोर कोणता नोकर आहे हें त्या सावकारास कांहीं कळेना. ही गोष्ट त्यानें आपल्या एका डाक्टर मित्राला सांगितली. तेव्हां त्या डाक्टरनें त्याला एका प्रकारची पूड आपले पैशावर टाकण्यास दिली व असें सांगितलें कीं, तुह्मी आपल्या चाकरांस पैसे जातील त्याचे दुसऱ्या दिवशी आपले समक्ष हात धुण्यास सांग, जो चोर असेल त्याचे हात धुतल्याबरोबर नामले होतील. हा प्रयोग करण्यापूर्वी जर त्यानें आपले हात धुतले असतील तरी सुद्धां ते नामलेच होतील व तो रंग साबणानें देखील जाणार नाहीं. त्या चोर चाकराला त्याचे धन्यानें सांगण्या पूर्वी हात धुण्याचा प्रसंग आला नाहीं व जेव्हां त्यांनें पैसे नेले त्याचे दुसरे दिवशीं आपल्या सर्व चाकरांस हात धुण्यास सांगितलें तेव्हां कोणता चाकर चोर आहे हें त्याला तेव्हांच कळून आलें. व त्या चाकरानेंही आपले पूर्वीचे सर्व गुन्हे कबूल केले. चोर सांपडल्या वर जी तजवीज करतात ती त्या धन्यानें केली हें निराळें सांगणें नकोच. त्या.

इंग्लंडची जमाबंदी या वर्षी फार वाढली आहे. करटम, पोष्ट, टेलिग्राफ, या खात्यातच १६,००,००० पौंड वाढवा आहे.

इंग्लंड व फ्रान्स हे दोघेही आफ्रिकेंत शिरले असून तिकडचा सांपडेल तो प्रांत आपल्या ताब्यांत घेण्याचा यत्न करीत आहेत. या आफ्रिकेंतल्या प्रकरणा बद्दल त्या उभय सरकारांत कांहीं लढा उत्पन्न झाला आहे व त्या मुळें इंग्लंड व फ्रान्स या दोघांत लढाई सुरू होण्याचा रंग दिसूं लागल्याचें तिकडच्या लोकांचें ह्मणणें आहे. त्रयस्थ राहणाऱ्या आफ्रिकेचे तुकडे तोडण्या करितांच हे दोघेही त्याच्यावर बिलगले व आतां त्या तुकड्याच्या लहान मोठेपणा बद्दल आपसांत मारामारीस तयार झाले !!

मादागास्कर प्रकरण फार नाजुक झालें आहे.

मादागास्कर बंदर फ्रेंच फौजेनें अडवून टाकलें आहे.

फ्रेंचांची नवी फौज सायम येथें जात आहे.

हिंदुस्थानच्या फारेष्ट अक्टांत कांहीं दुरुस्ती करून तो तावडतोब प्रसिद्ध होणार

मध्य हिंदुस्थानांत अरुंद आगगाड्यांची समृद्धी करण्यास लष्करी व राजकीय कारणा करितां स्टेट सेक्रेटरीनीं मंजुरी दिली आणि बाराबंकी व कानपूर यांच्या दरम्यान एक स्वतंत्र रस्ता लवकरच करण्याचें ठरलें.

तहाच्या बंदरावरून असणाऱ्या इंग्रजी प्रजेच्या संरक्षणांकरतां जास्त खबरदारी घेणें जरूर आहे असें ठरवून त्याप्रमाणें इंग्रज सरकारानें आपली कांहीं गलबतें चाईनें तिकडे रवाना करण्याचा हुकूम केला आहे.

कोरियांतली लढाई बंद होऊन आतां खुद्द चीन देशांत लढाई सुरू होणार असें त्या संबंधाच्या अगदीं अलीकडच्या बातम्यांवरून दिसतें खुद्द पेकीन शहरावर हल्ला करण्याची जपानचा इरादा असल्याची बातमी साधार दिसत,आणि तसें झालें ह्मणजे चीनची काय दशा होईल हें सांगतां येत नाहीं. चीन व जपान यांची ही लढाई कोरियाकरितां सुरू झाली व ती बरीच जोरांत आल्यावर कोरियांत पाय ठेवण्याचा अधिकार नाहीं असें रशियानें दरडावून सांगून आपली कांहीं फौज एक गुप्त हुकूम हातांत देवून रवानाही केली; इतकेंच नव्हे तर या लढाईच्यासंबंधानें युरोपियन राष्ट्रांनी विचार करण्याची वेळ येऊन पोंचली असेंही रशियानें आपलें मत प्रसिद्ध केलें. जपानच्या फौजेनें व आरमारानें या चीन बरोबरच्या लढाईत जो मोठा शहाणेपणा दाखविला त्याच्या योगानें, आपल्या आरमाराची धमेंडी बाळगणाऱ्या युरोपांतल्या कांहीं राष्ट्रांतही चळवळ सुरू झाली. जपानानें चीनास बराच जेरीस आणून आतां चीनचें पवित्र स्थान जें मंचेरिया त्यावर व चीनच्या पेकीन नांवाच्या राजधानीवर हल्ला करण्याचें जपानानें सुरू केलें व त्यामुळें चीन कोरियांतला पाय काढून आपल्या बचावास लागला असतां रशिया, फ्रान्स व इंग्लंड या तिघांनीं मिळून चीनाची मुंही मुरगाळून त्याच्या वाटण्या करून घ्याव्या. अशा प्रकारची सूचनाही राशियनलोकांकडून बाहेर आली. तेव्हां या सर्व हकीकतीचा विचार करूं लागलें ह्मणजे चीनचें जरठ राष्ट्र या पुढें कायम राहतें कीं नाहीं याचीही शंका वाटूं लागली आहे. अ. द.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करतां येण्या साठी सरटीफीकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन१८८९ चा आक्ट ७ कलमप्रमाणें ( वर्ग १५ ) दि. की. मु. नंबर १...

१४ रह..

विद्यमान डिपुटी कमिशनर साहेब जिल्हे इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव रामाराम

बापाचें नांव बाळाजी कुणबी

राहणार ब्राह्मणवाडा पाठक ता०इलिचपूर जिल्हा इलिचपूर यास मयत

विक्रमजी बापाचें नांव मरोजी राहणार ब्राह्मणवाडा पाठक ता. इलिचपूर जि. इलिचपूर यांचे कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं तारीख ६ माहे नोवेंबर सन १८९४ इसवी रोजीं सदरहु अर्जीची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टात हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २० माहे सपटेंबर सन १८९४ इ०

C. E. Biddulph
Offg. Deputy Commissioner.
Ellichpur District.
दि. लडुप.
इलिचपूर


## घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचें ( ह्मणजे चकांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत ) चावी देण्यास मागरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक विलायती काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।१२ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें बाच भाव पर्यंत मुळींच स्वस्त विकले नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पाळ
वाच मेकर
नाशिक


☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ............ ०४
Single copy ............ 4 as.

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस.... ०।०६
दुसरे खेपेस ...... ०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over 10...4 as.
Repetition per line 3 as.

THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII — AKOLA MONDAY 22 OCTOBER 1894 — NO. 42

वर्ष २८ — आकोला सोमवार तारीख २२ माहे अक्टाबर सन १८९४ इ० — अंक ४२


## ह्या राजश्रीनें केव्हां तरी पळ काढला असावा.

एका गृहस्थास त्याच्या धर्मवेडा मुळें एका जुल्मी सरकारनें कारागृह दाखविलें पुढें त्या कारागृहाच्या मजबूत दगडी भिंती पाहून त्याच्या मनाची खात्री झाली कीं आतां आपलें राहिलेलें आयुष्य ह्या एकांत व भयाण कारागृहांत घालविलें पाहिजे. जरी त्याला आतां पुढची गत चांगली नाहीं असें भासत होतें तरी त्याला दुःखांत सुख इतकेंच वाटत होतें कीं मला जुलमामुळें बळी व्हावें लागलें परंतु सद्वर्तनाचें उल्लंघन केल्यामुळें कांहीं नाहीं. जर त्याच्या स्वाधीनची गोष्ट असती तर ह्या संकटांतून तो सहज पार पडला असता.

असें असून त्या बिचाऱ्यास सतत सोळा वर्षें हाल काढीत राहावें लागलें. हीं वर्षें संपतात तों त्याच्या मनांत आलें कीं ह्या भिंतीवर पुढें आलेल्या दगडाच्या आधारानें तर चढावें व त्यानें खिडकीच्या वरून काय दिसतें ह्मणून वर डोकें केलें. आणि असें केल्यामुळें त्याला वाटलें कीं पुढें लोखंडाचे गज आहेत ते काढून टाकतां येतील व त्या चौकटीची आगळही लाविली नव्हती. त्याच्या मनांत घोळूं लागलें कीं काय मी पळ कां न काढावा? त्यानें खिडकी तर उघडली आणि सहा फुट उडी जमिनीवर मारली आणि त्या प्रदेशास शेवटचा राम राम ठोकला. जर त्यानें त्याच्या ठाम झालेल्या विचारास एकीकडे ठेवून बिचाराची दोरी जर सैल सोडली असती तर ह्या स्थळीं इतके दिवस कुंथत रहावें लागलें नसतें.

ह्या स्वधर्मार्थ प्राण अर्पण करणाऱ्या या बिचाऱ्याची दैवघटित गोष्ट साधक व बाधक आहे. त्याच्या मनाची धांव बंद केल्यामुळें साधक; त्याला ज्या कारणास्तव बंदींत टाकावयाचा होता तें नसल्यामुळें बाधक.

ही गोष्ट पत्र रूपानें जी सर्वांस आवडते त्या प्रमाणें खालीं थोडक्यांत व साध्या शब्दांत सांगतो. एक लेखक बाई ह्मणते कीं, आज सोळा वर्षें झालीं, पित्तक्षोभानें व अशक्तपणामुळें फारच गांजून गेले आहे. नेहमीं थकून जाऊन अगदीं हलक होऊन जाई. माझी अन्नावरची वासना उडाली, पुढें आणलेले ताटास हात लावीन तर शपथ. कित्येक दिवस माझ्यानें एक घास देखील खाववत नसे, कधीं कधीं मला मळमळ सुटे. पोट नगारा होई आणि तोंडावाटें मोठा घट्ट वेडका येई.

मला फारच त्रासदायक खोकला होऊन बरगड्यांत फारच वेदना होत व दम बरोबर छाटत नसे. मी फारच हलक झाले आणि दुकानांत आंत बाहेर करण्याचा माझा तकवा अगदीं निघून गेला. सन १८९१ च्या डिसेंबरात माझ्या एका गिऱ्हाईकानें मदर सिजेलचा क्युरेटीव सीरपा (माता शिजेलचा रोगहारक पाक) बद्दल बरेच गुणानुवाद गाईल्यामुळें मी तें औषध घेण्यास सुरूं केलें. मी थोडें थेंब घेतल्या बरोबर मला बरेंच समाधान वाटलें आणि पुढें पंधरा दिवस औषध घेतलें नाहीं तरी मला बरें वाटत होतें. मला असा धीर आला ह्मणून मी अगदीं बरी होई तों पर्यंत ह्या औषधाचा उपयोग केला. आमचे चिरंजीव आरथरास एक वर्ष सतत जेवल्यावर जड झाल्या सारखें व वेदना होत होत्या आणि पोटाची दामटी होऊन खळगा पडल्या सारखें वाटे. त्याला हें औषध घेण्याची मी गळ घातली आणि त्याचा शेवट ह्मणाल तर माझ्या सारखाच झाला. मला पक्कें माहीत आहे कीं ह्या प्रदेशांतल्या बऱ्याच मंडळीनें दुसरे नाना उपाय करून थकल्यावर ह्या शिरपाचा (पाकाचा) उपयोग केला तेव्हां तात्काळ गूण आला. ह्या औषधाचा (ह्मणजे) माता सिजेलच्या सिरपाचा मला रामबाण गुण आला तो इतर पिडीतास ह्यामुळें यावा असें आपणास वाटत असेल तर हें पत्र आपण खुशाल छापावें.

मी तुमची
(सही) (मिसेस) एम वार्ड
१९४ इकसटन रोड
शडफर्ड. नोटिंगह्याम
ता० १ ली माहे एप्रिल सन १८९२

मीसिस वर्ड बाई साहेब ह्या त्रासदायक व भयंकर रोगा पासून बऱ्या झाल्या ह्मणून आह्मी तीस अभिनंदन करतो. आपल्या आयुष्यांत सोळा वर्षांचा कांटा सतत शारीरिक व मानसिक वेदनेंत घालवावा म्हणजे फारच खराब समजावयाचें. कुबेराचे सोबती होणें फारच थोड्याच्या ललाटीं लिहिलेलें असतें. परंतु सुदृढता जसा सूर्य प्रकाश सर्वजगभर जिकडे तिकडे सारखा पसरतो तद्वत् पसरली पाहिजे. ही नीट राखावी हें ज्याला अवगत आहे तो तर त्याची काळजी घेईल व ती दूर झाल्यास आपल्या स्वाधीन करून घेईल.

ह्या बाईचा रोग पचनीय पिंडाचा म्हणजे अग्निमांद्य व अजीर्णाचा होता. हा रोग फारच धोक्याचा व दुःख देणारा आहे कारण कीं ह्या रोगाचा पगडा इतका बसतो कीं शरिरांतलीं सर्व अंगें ह्याच्या बळी पडतात व रक्ताभिसरण मुळें ह्या रोगाचें वीष सर्व शरीरांत पसरतें. ह्या रोगाचें मुख्य कारण निरनिराळ्या नांवानें होणारे परिणाम व चिन्हें हीं होत. ती जे औषध सांगते त्याच्या गुणाची ज्यास चांगली माहिती झाली आहे त्यास नवल वाटण्यास नको. मोठ मोठाले असाध्य रोग ह्या औषधास शरण येतात.

आमचे वीर जे आपल्या गुहेंत कसा तरी वेळ काढीत होते त्यास बाहेर निघून जाण्याची गुरु किल्ली माहित नव्हती.

जर ह्या आळी अवलोकन करणारे दुःखी जे गुलाम झाले असतील तर त्यास तसें राहण्यास कांहीं कारण दिसत नाहीं.

तिच्या सचोटीच्या आटोक्यांत लिहिलेल्या पत्रावरून रोगाचें शमन कसें होईल ह्याचा रस्ता दाखवून देते. हें आमच्या पत्रव्यवहार करणाऱ्या गृहस्थाच्या लेखा वरून समजेल.

H. D.

---

## वऱ्हाडवाशी लोकांस विनंती.

प्रांतांतील लोकमत कळण्यासाठीं वऱ्हाड सामाजिक सभेकडून येते नोव्हेंबर महिन्यांत अकोलें येथें जाहीरसभा भरणार आहे. सभे पुढें विचारा साठीं येणारे विषयांची माहिती सर्व लोकांस होण्या करितां खालीं देत आहो.

### विषय.

१. वऱ्हाडच्या जमिनीची स्थिती आणि अधिक सारा वाढविला असतां होणारे अनिष्ट परिणाम.

२. जंगल खात्याच्या बंदोबस्ता मुळें लोकांस खरोखर कांहीं त्रास आहेत कीं काय? असल्यास ते कोणते? व त्यांचे परिहारार्थ काय करावयास पाहिजे.

३. वऱ्हाडच्या शेतकऱ्यांची सांप्रतची दीन स्थिती सुधारण्यास त्यांना माफक व्याजानें कर्ज मिळण्याची कांहीं सोय करितां येईल कीं नाहीं व करितां येईल तर सरकारा पासून सहाय्य कोणकोणतें मागावें.

४ सर्व प्रांत शेतकीवर अवलंबून राहणें सर्वथा इष्ट नाहीं. यास्तव धंदेशिक्षणा साठीं कोणकोणते उपाय योजणें जरूर आहे.

५. न्याय आणि मुलकी खात्याचीं कामें निरनिराळ्या अधिकाऱ्यांस देण्याचें योजिलें असतां काटकसरीनें तसें करितां येईल कीं नाहीं.

६. वऱ्हाडांत प्रांतिक अधिकाऱ्यांच्या जागा मिळण्यास उमेदवारांच्या आंगीं कोणकोणती योग्यता असावी. आणि हल्लींच्या व्यवस्थेनें कोणकोणते इष्ट व अनिष्ट परिणाम घडतात.

७. वऱ्हाडा करितां जे जे कायदे होतात ते कोणत्या शिस्तीनें होणें इष्ट आहे.

८. सिव्हिल सार्व्हिसची परीक्षा विलायतेस होते त्या प्रमाणें हिंदुस्थानांतही होत जावी असा पार्लिमेंटमध्यें ठराव झाला असून सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनीं त्यांस अनुकूलता दिली नाहीं. याजबद्दल वऱ्हाडच्या लोकांच्या तर्फे असंतुष्टता दर्शवून वरील पार्लिमेंटच्या ठरावाची बजावणी करण्या विषयीं मुख्य सरकारास विनंती करावी किंवा नाहीं.

९. वऱ्हाड शाळाखात्यांतून नुकतेंच एक सरक्युलर प्रसिद्ध होऊन आठव्या यत्तेंत जाणाऱ्या मुलांच्या वयाची यत्ता ठरविली गेली आहे. तशी इयत्ता ठरविल्या पासून लोकांस उच्च प्रतीचें शिक्षण मिळण्यास अडथळा येईल. यास्तव तें सरक्युलर रद्द करण्या विषयीं लोकांच्या तर्फे सरकारास विनंती करावी किंवा नाहीं.

सदर्हू विषया संबंधानें घडत असलेल्या परिणामाबद्दल स्वतःचे अनुभवा वरून व लोकस्थिती वरून जें मत झालें असेल तें सदर्हू सभेपुढें सादर करण्या साठीं तसेंच दुसरे लोक जी माहिती देतील ती योग्य आहे कीं नाहीं ह्या बद्दल संमती देण्या करितां विचारी व व्यवहारदक्ष मंडळीनें येणें जरूर आहे.

प्रत्येकास स्वतंत्र पत्रानें कळविण्यास सभेचे चालक समर्थ नाहींत सबब तसें पत्र येण्याची वाट न पहातां अकोलें येथें तारीख २ माहे नोव्हेंबर सन १८९४ रोज शुक्रवारीं येऊन व्यवस्थापक मंडळीस भेटण्याची सर्वांनीं कृपा करावी. मंडळी येथें कधीं व किती येणार हें पत्रानें सेक्रेटरीस कळविल्यास फार उत्तम होईल.

सभेचा समारंभ रोज शनिवार व रविवार ह्मणजे तारीख ३।४ नोव्हेंबर रोजीं होण्याचें ठरलें आहे.

येणारे लोकां पैकीं फक्त गरीब शेतकरी वगैरे लोकांचे (दोन दिवस) जेवण्याची व गरजेनुरूप औषधी फुकट मिळण्याची सोय कांहीं उदार मंडळीच्या सहाय्यानें केली गेली आहे. ह्या सोयीचा उपयोग करून घेणारास सभेच्या आफिसांतून दाखला मिळेल.

ज्यास परमेश्वर दयेनें सर्व अनुकूल आहे अशा लोकांस उतरण्या साठीं त्यांच्या पत्रा प्रमाणें जागेची होतां होईल तों पावेतों तजवीज केली जाईल.

प्रत्येकास खानगी कामें आहेतच पण हें काम सार्वजनिक व मोठें महत्वाचें आहे असें सर्व जाणतच आहेत. येण्या बद्दल सुज्ञांस अधिक लिहिणें नको. सर्वांनीं आपले आप्त व स्नेही मंडळी बरोबर आणल्यास हरकत नाहीं कळावें तारीख ११ माहे आक्टोबर सन १८९४ इसवी.

मुक्काम अकोलें.

पांडुरंग बापुजी राजंदेकर.
होणारे सभेचे सेक्रेटरी.

---

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन वद्य ८ शके १८१६

पुण्यास दंगली संबंधानें पोलीस सुपरिन्टेंडंट यांनीं जें नवें सरक्युलर काढिलें आहे त्याची तर सर्वांवर ताण आहे. रस्त्यांत व घरींदारीं वाद्यांची बंदीच केली आहे

म्हटलें तरी चालेल. सेशन कमिट झालेले खटले पुष्कळांवर लवकरच चालू होणार आहेत. माजिस्ट्रेटी हुकूम एकावर एक सुटत आहेत. बाईस तर गेल्या दसऱ्याचा मोठा सण सार्वजनिक दुःखप्रसंगा सारखा गेला. सर्व हिंदु लोक चिंताक्रांत व शोकनिमग्न असून राजनिष्ठेनें महाराणी सरकाराकडे डोळे करून परमेश्वराचा धांवा करीत आहेत! या धुमाकुळीचा भावार्थ सरकार लक्ष्यांत घेईल काय?

चालूं सालाच्या अखेरीला मद्रासेस राष्ट्रीय सभेची दहावी बैठक होईल त्या वेळीं प्रांतोप्रांतीचे प्रतिनिधी पुष्कळ येतील व हा समारंभ पूर्वीच्या समारंभापेक्षां मोठा व्हावा ह्मणून मद्रासच्या स्वागत मंडळीचे अध्यक्ष नामदार पी. रंगया नायडू यांनीं आतां पासून मोठी खटपट चालविली आहे. अध्यक्ष हे स्वतः स्पष्टवक्ते, उदार विचारांचे व अत्यंत कळकळीचे आहेत. स्वागत मंडळीनें सर्व राष्ट्रीय सभेच्या पोट कमिट्यांस एक पत्र लिहिलें आहे. त्याचा सारांश असा कीं, यंदाच्या बैठकीला राष्ट्रीय सभेचे जनक मि. ह्यूम हे येऊं शकणार नाहींत. त्यांची ती दीव्य मूर्ती लोकांच्या डोळ्या समोर नसल्या मुळें पुष्कळांचा मनोभंग होईल हें खरें. परंतु विलायतेंत ते आहेत तथापि त्यांच्या मनोरथांचा किल्ला राष्ट्रीय सभेच्या जयजयकारावर बांधला आहे. त्यांनीं आम्हां लोकांमध्यें जें राष्ट्रीयत्व आणिलें आहे, जें राजकीय विचारामृत पाजिलें आहे आणि जी कार्यदक्षता प्रेरित केली आहे तीं सर्व आपण यंदाच्या बैठकीला उत्तम प्रकारें व्यक्त व स्पष्ट करून दाखविलीं पाहिजेत. त्यांनीं भागिरथ प्रयत्नानें लाविलेला वृक्ष वर्षानुवर्ष अमृततुल्य फळपुष्पांनीं ओथंबलेला त्यांच्या अंतर्दृष्टीस विलायतेस दिसला म्हणजे आपल्या लोकांची धन्यता व त्यांची त्यांस कृतकार्यता वाटेल.

राष्ट्रीय सभेचे शत्रू कांहीं म्हणोत, पण दहा वर्षांमध्यें राजकीय गोष्टींत जें स्थित्यंतर झालें आहे त्या वरून सभेचा प्रभाव अक्रम दुनियेस कळून चुकलाच आहे. कायदे कौंसिलांत लोकनियुक्त लोक नेमूं लागले. अद्याप पुष्कळ सुधारणा व्हावयाच्या आहेत पण क्रमा क्रमानें आपला गड जिंकिला पाहिजे. सिव्हील सर्व्हिसच्या परीक्षेला १९ वर्षांची अट होती ती २३ झाली. पार्लमेंट मध्यें आपल्या पक्षाचे पुरस्कर्ते निदान शंभर सभासद तरी कायमचे असून या ब्रिटिश कमिटीचें पाऊल उत्तरोत्तर पुढेंच आहे. न्याय कोडतांची सुधारणा व स्वतंत्रता स्थापित होईल अशी आशा येत चालली आहे. स्टेट सेक्रेटरी मि. फौलर यांनीं सिव्हिल सर्व्हीस परीक्षा इंडियांत होऊं नये म्हणून जो अत्यंत चुकीचा व क्षुद्र विचारांचा ठराव केला त्याचा आपणास येत्या बैठकीला प्रतिकार केला पाहिजे. स्टेट सेक्रेटरीचें इंडिया आफिस हें निरुपयोगी, निरर्थक खर्चीचें, व विघ्नकारक आहे. तें अस्तित्वांत असल्या पेक्षां उपयोगद्वारा पाहिजे ह्मणने लयास जाईल तर बरें! आपणास यंदांच्या बैठकीला या व अशाच महत्वाच्या पुष्कळ गोष्टींचा विचार कर्तव्य आहे तर सर्व राष्ट्रवाल्यांनीं मद्रासची सभा आपल्या आगमनानें सुशोभित केली पाहिजे. नामदार दादाभाई, वेडबर्न इत्यादिकांचा जो निरोप आला आहे त्यावरून यंदाच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष नामदार वेब हे होतील असा सुयोग दिसतो. हे हल्लीं अमेरिकेंतील कानडा देशांत आहेत. तेथून ते विलायतेस जाऊन नंतर इंडियांत येतील असा अंदाज आहे. ईश्वर करो आणि मद्रासची राष्ट्रीय सभा निर्विघ्नपणें तडीस जावो!

## चिरीमिरी

सरकारी कचेऱ्यांतील शिपायी प्यादे नेहमीं सणावारा निमित्त वर्षांतून एक दोनदा चिरीमिरी मागत असतात. ही वहीवाट पुष्कळ दिवसाची आहे. जेव्हां लोक साहेबांच्या भेटीला जातात तेव्हां त्या लोकांचा योग्य परामर्ष व मानपान ठेवण्याबद्दलही चिरीमिरी शिपायी घेत असतात. सारांश, हलक्या प्रतीचे नोकर ज्या लोकांच्या उपयोगीं पडतात त्या लोकांपासून ते आपल्या कामगिरी बद्दल बक्षीस ह्मणून घेत असतात. किंबहुना साहेबांचे जमादार वगैरे कनिष्ठ चाकर सरबराईच्या प्रसंगीं कसकसे तहशीलदारा सारख्या अधिकाऱ्यांस देखील नम्र व मऊ करून सोडतात हें पुष्कळांच्या आढळांत असेल तेव्हां अशा सेवकगणाच्या तोंडावर एखादा तुकडा टाकला ह्मणजे तो भुंकण्याचे बंद करितो असें पुष्कळांच्या अनुभवास आलें असेल. प्रथम चिरीमिरीची बाब मेहरबानी खातर दिली जात असे पण तिचें स्वरूप कित्येक प्रसंगीं सरकारी करा प्रमाणें होत असतें. श्री व्यंकटेश स्तोत्रामध्यें याला दृष्टांत एक उत्तम आहे तो असा कीः—

समर्थी घरिचें श्वान। त्यासि देती सर्वही मान।

या कवि वचना प्रमाणें लोकांस वागणें भाग पडतें. परंतु अशा कृत्याचा लाजिरवाणा प्रकार व अपयश मालकाच्या पदरीं नेहमीं लोक बांधतात तेव्हां ज्या सत्वस्थ व सन्मार्गी अधिकाऱ्यांस गैरमार्गानें सरबराई किंवा अन्य फायदा नको असेल अशा न्यायी अधिकाऱ्यांनीं असली जवळची कीड पळवून लावावी. ह्मणजे नेहमीच्या वर्तनांतला लुब्रेपणा, तोंडपुजो, व हांजी हांजी ही पुष्कळ कमी होतील. या वरून आमच्या लेखाचा भावार्थ असा नाहीं कीं शिपाया सारख्या क्षुद्रवेतनाच्या मनुष्याला मेहेरबानीची चिरीमिरी दिली जाऊं नये. आपणास ईश्वरानें अनुकूल केलें तर आपल्या जवळ येणाऱ्या इसमावर कृपादृष्टी ठेवावी हा राजमार्ग आहे. नाहीं तर, कांहीं लक्ष्मीसंपन्न, अधिकारारूढ, पण धनलोभी अधिकाऱ्यांनीं स्वताला चिरीमिरी देण्याची पाळी येऊं नये ह्मणून हाताखालील चाकरांस हुकूमही सोडल्याचें ऐकिवांत आहे. खरोखर, चिरमिरीचा दुरुपयोग होतो तो होऊं नये एवढाच आमच्या लिहिण्याचा मतलब आहे. वरिष्ठाकडे येणाऱ्या कार्यसाधु जनांकडून चिरीमिरी पटकावणें ह्मणजे दुरुपयोगाचा दरवाजा खुला होण्यासारखें आहे. परंतु वरिष्ठाकडेच कनिष्ठ चाकरांनीं चिरीमिरी याचकवृत्त्या मागितली तर त्यांना वाटण्याच्या अक्षता लावणें हें मात्र आह्मांस तिळमात्र कबूल नाहीं.

हा चिरीमिरीचा विषय आठवण्यास कारण कीं उमरावती तहशील कचेरींत एक नुकताच मासलेवाईक घडलेला प्रकार ऐकण्यांत आला. तो असा कीं त्या तहशिलींतील जमादार आदिकरून शिपायांनीं चिरीमिरीचा फंड गोळा केला पण तो आपसांत यथाविभाग न वांटल्यामुळें अखेरीस तें प्रकरण एक हताश शिपायानें मे. निकोलेट साहेब यांच्याकडे अर्जद्वारा पोंचविलें. त्यावरून साहेब बहादूर यांनीं तहशीलदार मार्फत चौकशी करून जमादारा सुद्धां दहा इसमांस बडतर्फ केलें. माफी मागितल्यावर व वहिवाट दिसल्यावरून कर्नल मेकंझी यांनीं त्यांस नोकरीवर ठेऊन त्यांच्या बदल्या परगांवीं केल्या. वरील उदाहरण कनिष्ठ प्रतीच्या चाकरांनीं ध्यानांत धरावें आणि वेळेवरच शहाणे व्हावें हें फार उत्तम. त्याच प्रमाणें खुद्द मे कमिशनर साहेब पासून तों शेवटच्या अधिकाऱ्या पर्यंत सर्व अधिकाऱ्यांनीं सरबराईच्या प्रकरणीं अन्याय व धामधूम न होईल अशी प्रत्यक्ष पैरवी राखिली ह्मणजे चिरीमिरीच्या दुरुपयोगांतील शेंकडा ९९ भाग लयास जाईल.

पुण्याच्या कांहीं गृहस्थावरील खटले नाशाबित झाले इतकेंच नाहीं तर रा. रा. ढोले या गृहस्था वरील प्रकरणांत खुद्द न्यायाधिशांनीं ह्मटलें आहे कीं पोलीसचा पुरावा वस्तुस्थितीच्या व स्थलरचनेच्या दृष्टीनें अगदीं खोटा ठरतो. मि० क्राय हे न्यायाधीश होते. मि० ढोले यांनीं आपल्या घरांतून मशिदीवर धगड मारले असा आरोप होता परंतु पोलिसच्या मनोराज्यांतला सर्व व्यूह ढासळला! ईश्वर करो आणि सर्व खऱ्या गोष्टी सेशन जज्जा समोर येवोत म्हणजे सरकारच्या पोलिसद्वारा होणाऱ्या अंदाधुंदीनें लोकांचे डोळे चांगले उघडतील व तेही जरा हुषारीनें रहातील.

The Berar Samachar

MONDAY OCTOBER, 22, 1894

### THE PRESENT MAHA—RASHTRA

(Concluded from our last issue)

The resolution of the Government of India for giving Mahomedans preferential claims to employment over the Hindus, out of consideration to their backwardness in education has likewise fostered an immense mischief as well as discontent. If the Government had by a similar resolution first opened for them free or even paying institutions in which they were first to be trained and educated and so to say fitted for public employment both morally and intellectually or mentally and then as a sequal to this step making education the chief qualification had they professed to give them preferential claims to public employment over their Hindu brethren of like educational accomplishments, the resolution would have meant something and would have prevented a deal of mischief now occasioned by it.

Yet this safeguard was not to be imposed. Men already under an impression of being the chosen sons of their Redeemers and thus indemnified as it were from any acts however contrary to public peace found themselves beyond their expectations raised to an unthought—of eminence not supported by a gift of nature or education to counterbalance its effects often detrimental to the interests of those whose interests they are called upon to guard. A Mahomedan or a Parsi witness can give any reliable evidence in a court of law against a Hindu who is as it were proscribed to eternal damnation Every reliance is placed on a Mahomedan witness, no matter however insignificant, making a statement of any foulness against a Hindu never so great or respectable. The evidence of a single Mahomedan police peon far more than conclusively decides the fate of respective Hindus though supported by the unassailable testimony of respectable, and honorable gentlemen even of castes different from those of the contending parties! What can follow from all this? Where are the assurances of Lord Landsdowne the ex—Viceory of India so solemnly made from Agra only last year? Why should the Hindus and Mahomedans revive their animosities after a dead silence of so many generations? Every where in the course of the late disturbances which have shaken the peace of the country to its inmost recesses the Mahomedans are proved to have been the aggressors. Why should they be so audacious to take the law into their own hands? Has not the vexed music question which is apparently the cause professed for these disturbances, still been suffered to remain as vague and mysterious as ever? Why are there no disturbances of the Mahomedan Native states? How is it possible that the same strain of mind should possess all no matter however remote from the scenes of the disturbances? It is said the vernacular Press is responsible for these unquiet times. Is it not acknowledged that nearly 80 percent of the Hindu population is so grossly ignorant of the use of letters that they can neither read nor write? How then are the newspapers the cause of the disturbances? Are not the Bombay dailies by a false and damnable misrepresentation perverting facts and in doing so either misleading the Government or supporting and applauding their policy?

If the arguments such as the Bombay dailies are passing against the Vernacular Press were to pass current, it will be easy to prove that there never was such a thing indirect persecution since the creation. For there never was a persecution in which some crime was justly or unjustly said to be obviously deducible from the surroundings of those persecuted. To argue that because a man is a Hindu, he must think it right to foster disturbances because they are common everywhere and that because he thinks it right he will foster, abet, or make them, and then to find out on this principle a law or a section to punish him as if he had done it is plain persecution. What steps has the Bombay Government taken or any other Government likewise taken to prevent such disturbances? What notorious, devilish, and mischievous authority is given to the Mahomedan police peons or Head Constables or Inspectors? How is it that such disturbances are so common only in places where there are Mahomedan inspectors of Police? Why are not the same means of defence extended to the persecutors as well as to the persecuted? Had the disturbances between the Hindus and Mahomedans been simply the disturbances between any two contending religious parties, there certainly could never have been so universal discontent. Even the High Court of Bombay the most unassilable fortress of the goddess of justice threatens to be infected perhaps for the first time with the contagion. The question at issue if not timely vigorously dealt with does not comprehend these social

disturbances. The vanity, peremptoriness, offhandedness, and unbearableness of our Anglo Indian officers in whose hands properly speaking hang the real threads of Government are being strained to their utmost tension. The Government of India ought to lose no time in checking the alarming condition whose begining however inconsiderable is certainly manifest. What have the different Governments done to snub the perverters of justice. Mr. Kendedy is certainly responsible for the disquiet he has so gratuitously and unbearably caused througbout the presidency. The City Magistrate, the Assistant Collector, the Cantonment Magistrate and the District Superintendent of Police of Poona have indeed invented a new Criminal Procedure Code and considering the framers of the Indian Evidence Act were by far less wise than themselves have hit upon acts, and reasonings quite new!

We are humble and loyal subjects. We consider it our duty to represent public opinion. And inspite of the want of confidence Government has manifested towards particular Hindus by denying the privilege of forming a Volunteer corps granting it at the same time to some other Hindus, inspite of the unbearable conduct of most of our Anglo Indian officers our real Governors, our real Ma Baps, inspite of the Governmental partiality for some religious creeds to the prejudice or detriment, nay destruction of others, and inspite of innumerable other maltreatments which though taken singly may be overlooked, yet which when viewed in connection prove to a demonstration the policy of our real governors, we earnestly wish that public opinion, the only and the enviable safety to any Government may go with our rulers. This being our solicitude for the general good of our community the only consolation we can afford to ourselves is that inspite of the vilest accusations of our detractors we are doing our duty in laying before our government the true state of facts. Justice and Reason have so far left our rulers, it appears, that the aggressors are quietly let off: the real offenders neither detected nor dealt an adequate punishment and good, honest, respectable and dignified persons are being dragged into courts, subjected to the penalties of law for a fictitious cause and fictitious offence. The Vernacular Press is doing its duty in exposing such a loathsome state of things while the Anglo Indian Press is trying to revile at it.

## वऱ्हाड.

रा. रा. रघुपत मोहनराव यांस मूर्तिजापुरास तहशिलदार नेमल्या कारणानें खालील फेरफारीच्या बढत्या देण्यांत आल्या आहेत:—

| रा. रा. | पगार रुपये. |
| --- | --- |
| सैफुद्दीनखान, क्लार्क आफकोर्ट बुलढाणा | १५० |
| मारुती हरी, सेशन जज्जचे क्लार्क आफ कोर्ट | १२५ |
| शिवराम रामकृष्ण क्लार्क आफ कोर्ट बडनेरा | १०० |
| पांडुरंग वासुदेव भगत डेपुटी क्लार्क आफ कोर्ट उमरावती | ७० |
| महादेव गणेश डे. क्लार्क आफकोर्ट वाशिम | ७० |
| लक्ष्मण गोविंद ओक क्लार्क डेपुटी कमिशनर आकोला | ५० |
| तुकाराम वामन शिरस्तेदार निसबत सिव्हील जज्ज दांडेकर | ४० |

मे० आवर्ड साहेब सेशन जज्ज, हे सिम्ल्यास रेव्हेन्यु कोड रचण्या करितां गेले होते. तिकडील त्यांचें काम पुरें होऊन ते आपल्या कामीं आज रोजीं दाखल होतील आणि मि. इलियट साहेब परत यवतमाळास डेपुटी कमिशनरचे जागीं रवाना होतील.

वरील मुदतींत आफिशिएटींग डेपुटी कमिशनरचें काम श्रीकुमार हाबाजी रावजी असि. कमिशनर यांनीं फार उत्तम प्रकारें करून चांगली लोकप्रियता संपादन केली.

वऱ्हाडांतील अव्वाचीस आसिस्टंट कमिशनरची जागा योग्य वेळीं हक्कदारानें दिली जावी असा पूर्वी पासून परिपाठ होता परंतु अलिकडे असिस्टंट कमिशनर बाहेरून हिंदुस्थान सरकार रवाना करिते आणि त्या मुळें प्रांतांतील अव्वाची लोकांच्या हक्काला मोठा धक्का पोचतो. उदाहरणार्थ, आमचे येथील अव्वाची मि. हैदर अली खान यांचे हक्क पुष्कळ वेळा लक्षांत घेतले नाहींत आणि त्यांस हल्लीं जाचा रोकडा जबाबमिळाल्याचें कळतें! त्याच प्रमाणें एकस्ट्रा असि. कमिशनर वर्ग १ याच्या पुढील बढत्या असिस्टंट कमिशनरांच्या दर्ज्यांत कां होऊ नये हें आम्हांस समजत नाहीं. नेटीव लोकांस पुढें सरसावू न देण्याची ही युक्ती नव्हे काय? जरूर वाटल्यास त्यांना आणखी कांहीं अटी लागूं करावयात. नाहीं तर, मि. हेअर थोडे दिवस जिल्ह्या बाहेर गेले कीं खामगांवाहून हार्स ब्री साहेब आक्टींग काम करण्यास आले पाहिजेत. आणि आकोल्याचे लोकमान्य रा. रा. दांडेकर उपयोगाचे नाहींत.

नबाब सुलतान उल मुल्क, माजिस्ट्रेट वर्ग ३ अकोला हे परवां दिवसाच्या गाडीनें वडिलांच्या भेटीला हैदराबादेस आठ दिवसांच्या रजेवर गेले आहेत.

मे. हेअर साहेब, डेपुटी कमिशनर यांची स्वारी फिरावयास लवकरच निघणार असून त्यांचा उद्याचा मुक्काम खामगांवास होणार आहे.

येत्या दीपवाळीच्या सुटींत आकोल्यास क्रिकेटचे खेळ होणार असून त्या निमित्त पुष्कळ युरोपियन अधिकारी येथें जमणार आहेत.

रा० रा० नारायणराव शिंदे हे पेनशनदार झाल्यामुळें त्यांच्या वर्ग १ च्या नायब तहशिलदारीवर रा. रा. विनायक आप्पाजी काणे यांस बढती देण्यांत आली.

येत्या २४ तारखेला मि० सिम्पसन असि० कमिशनर हे तीन महिन्यांच्या रजेवरून परत आकोल्यास येतील.

( वाशीम जिल्ह्यांतील बातमी )

ता० १८।१०।९४

हवामानः— आज दुपारीं एक दोन जोराचे पाऊस पडले. हे पिकांस फारच उपयोगी झाले. पिकें चांगलीं आहेत. रोगराई विशेष नाहीं.

देवळा जवळील तलावः— वाशीम येथील बालाजीचे देवळाचा तलावाशीं कांहीं संबंध नाहीं ह्मणून हा तलाव स्वच्छ करण्या करितां जे १५६५ रुपये मुनसिपालिटीनें खर्च केले त्या बद्दल बालाजीचें संस्थान जबाबदार नाहीं; ह्मणून संस्थाना कडून जी कमेटीस नोटीस गेली होती, तिचा विचार होऊन सदर्हू रकम संस्थाना पासून वसूल करावी व त्या करितां जप्तीचें वारंट म्याजिस्ट्रेटा कडून मागवावें म्हणून ठरल्याचें समजतें.

दसरा. यंदाचा दसरा नेहमीच्या प्रमाणें आनंदांत पार पडला. तरी येथील हिंदु लोकांस थोडेसें वाईट वाटण्या सारखी गोष्ट झाली. येथें नवरात्रांतील पंचमी पासून रोज रात्रीं बालाजीचीं वाहनें निघून तीं गांवांत मिरविण्याची वहिवाट आहे. त्या प्रमाणें यंदा सर्व दिवस वहानें निघालीं नाहींत. फक्त दसऱ्याचे आदले दिवशीं व दसऱ्याचे दिवशीं मात्र निघालीं. सर्व वाहनें न निघण्याचे कारणांचा तपास करितां असें होण्याचें कारण पोलीसचा तोंडी मनाईचा हुकूम हें आहे असें समजतें. ही गोष्ट खरी असेल तर आज कित्येक वर्षें चाललेल्या हिंदु लोकांचे वाहेवाटीस अडथळा आला असें म्हटलें पाहिजे अशा तऱ्हेच्या पोलीसच्या हुकूमावरूनच जर वहानें निघालीं नसतील, तर अधिकाऱ्यांनीं ह्या गोष्टीची चौकशी करून ह्यांत कांहीं गैर समज किंवा चुकी असेल तर ती लवकर दुरस्त करण्याची तजवीज करावी म्हणजे बरें. नाहींतर अशिक्षित व अडदांड असे जे मुसलमान लोक असतील त्यांचे मनावर ह्या गोष्टीचा कांहीं भलताच परिणाम होण्याचा संभव आहे.

येथें पातूरचे कोणी हरदास आले आहेत. त्यांचीं किर्तनें होत असतात. रा. रा. गणेश बापुजी ह्यांचे घरीं किर्तन झालें. आज रा. रा. शामराव साहेब ह्यांचे घरीं आहे. हरदास बोआ आपले कामांत फारच कुशल आहेत.

हास्पिटल असिस्टंटच्या परीक्षे करितां ह्या जिल्ह्यांतून पुसद व उमरखेड येथील असिस्टंट गेले होते. पैकीं पुसद येथील असिस्टंट मि. कल्याणराम हे पास झाल्याचें समजतें.

येथील म्युनिसिपालिटी कुड्यांवर कर बसविण्याचे विचारांत आहे, असें समजतें.

रा. प्रल्हाद अण्णा ह्या नांवाचे एक सत्पुरुष ४।५ वर्षां पूर्वीं वैतागून उमरी नांवाच्या एका खेड्यांत जाऊन राहिले होते, ते हल्लीं येथें आले आहेत व त्यांस येथें राहून घेण्याचा कांहीं मंडळींचा विचार आहे.

येथील इंग्लिश म० शाळेंत आठवे इयत्तेचा वर्ग आहे. त्या वर्गा करितां दरसाल ३०० रुपये सरकारांत आगाऊ भरावे लागतात. त्या प्रमाणें यंदाही भरण्याची खटपट चालूं आहे ह्या खटपटीस कितपत यश येतें पहावें. यंदा आठवे इयत्तेंत आलेलीं मुलें गरीब आहेत असें दिसतें.

नोटीस.

हरिराम छगुलाल साहू दुकान तेल्हारे तालुके अकोट यास खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं माझा मुलगा नामें रानुजी वल्लद विठोबा राहणार अटकळी याणी ता० २२।३।८७ इ॥ रोजी गहानखत २०० रुपयाचे लिहून दिले नंतर तो साहासात महिन्यांनीं मरण पावला तुम्ही त्याचे पश्चात सर्वे नंबर ४१।५४।३३ ची सेते गाहाणखतात लिहिलेले आपले ताब्यांत जबरदस्तीनें घेऊन आज सात पिकाचा उपभोग घेऊन साल मजकूरचे आठवें पिकही तुमचे ताब्यात आहे सबब नोटिशीनें कळविण्यात येते तुमचे रुपयाची आदाई व्याजासह होऊन रुपये फाजल निघतात करितां आठ वर्षांचे पिकाचे उत्पन्नाचा हिशेब व शेताचा ताबा ही नोटीस पावल्या तारखे पासून आठ दिवसाचे आत द्यावा तसें न केल्यास रिती प्रमाणें तजवीज करून व्याजा सह व खर्चासह रुपये घेण्यांत येतील कळावें.

( सही )

सहीची निशानी नांगडी न्हनाईमर्द विठोबा पाथरकारीन राहणार अटकळी तालुके अकोट ईचे हातची असें दस्तुर रघुनाथ नारायण काळे डोंगरगावकर.

## नोटीस.

तुळशी मर्द मुकाजी लोखंडे हल्लीं राहणार कापुसतळणी तालुके दर्यापूर—इस नोटीस देणार मुकाजी वल्लद रावजी लोखंडे राहाणार अंबाडे तालुके अकोट- नोटिशीनें असें कळवितो कीं, तूं माझी लग्नाची बायको असून आज सुमारें दाहा ( १० ) महिने झाले तू आह्मास न कळत पळून गेलीस आह्मी तू पळून गेल्या पासून तपास करीत आहो परंतु पत्ता कांहीं लागला नाहीं. आज सुमारें दोन महिने झाले तुझा ठिकाणा आह्मास लागला को, तू आपले बापाचे घरीं कापुसतळणी गांवीं आहेस त्याजवरून तुजला घेणें करितां माझा चुलता व मी तुझे बापाचे घरी आलो होतो परंतु तूं साफ सांगितलेस कीं मी येत नाही ह्मणून वगैरे मजकूर. त्यांस तुजला आतां ह्या नोटिसीनें असें कळवितो कीं, तूं पळून गेलीस त्या वेळीं दागीनें बरोबर नेलेस व कांहीं रोख रुपये व सणगे वगैरे घेऊन गेलीस त्याचीं नांवें तपशीलवार लिहिले प्रमाणें.

कापरवाळ्या चांदीच्या तोळे ४० चाळीस

पोलट चांदीचे चार ४ तोळे १० दाहा.

गुंडवाळ्या चांदीच्या तोळे ४० चाळीस.

वाळ्या सोन्याच्या किंमत रुपये अदमासे २५ पंचवीस.

नथ सोन्याची किंमत रुपये १५ पंधरा.

पुतळी सोन्याची एक किंमत रु. ६ सहा

रोख रुपये ५० पन्नास. व आणखी किरकोळ जिन्नस व पांघरुणें वगैरे किंमत रुपये ३० अदमासे असे जिन्नस घेऊन गेलीस. आतां तुजला वागविण्यास व पोटास अन्न वस्त्र देण्यास मी सर्व प्रकारानें तयार आहे. व तू दहा महिने झाल्या पासून गेलीस याजबद्दल तुझी खावटी रीतवार जी आहे ती मी देण्यास तयार आहे इतकेच नाहीं तर तुझ्या जीवास किंवा पोटा पाण्यास व तुजला चांगल्या रितीनें वागविण्यास मी सर्व परीनें तयार आहे. व ह्याजबद्दल चार जात भाई पंचाची खात्री करून देऊन मग तुजला घेऊन जावें. अशा बद्दल मी तयार आहे तर तुजला ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसात सदरील सर्व तपशीलवार लिहिलेल्या दागिन्या सुद्धां घरीं मजपाशी यावेस. असें झालें नाहीं तर तुजला दागिन्या सुद्धां ताब्यांत घेणे बद्दल फिर्याद करून ताब्यात घेतली जाईल. ह्मणून दिली नोटीस सही तारीख १८ माहे आक्टोबर सन १८९४ इसवी.

( सही )

मुकाजी वा रावजी लोखंडे राहणार आंबोडे दस्तूर खुद्द.

## वर्तमानसार.

जामिनींतून निघणाऱ्या ग्यासचा इन्टअ- नापोलेस येथें लोक दुहेरी उपयोग करूं पहात आहेत. ग्यॉस जामिनींतून बाहेर प डल्यावर त्याला विस्तार पावूं दिल्याम ता शून्य अंशाहूनही कमी थंड होतो; ह्मणून त्याच्या उपयोगानें पाण्याचा बर्फ करितां येतो. ह्याच कामीं लावलेला ग्यॉस पेटविला असतां उष्णता उत्पन्न करितो. येणें प्रमाणें ह्या ग्यॉसचा थंडी व उष्णता अशी दोन्हीं तर्‍हेनें उत्पन्न करण्यांत दुहेरी उपयोग होतो.

समुद्र व मीठः— मृत समुद्राच्या एक टन पाण्यांत १८७ रतल, तांबड्या समुद्राच्या तितक्याच पाण्यांतून ९३ रत्तल, भूमध्य समुद्राच्या तिततक्याच पाण्यांत ८९ रतल, इंग्रजी खाडी मधील पाण्यांतून ७२ रतल, बाल्टिक सरोवरांतील पाण्यांतून १३ रतल, काळ्या समुद्रांतील पाण्यांतून २६ आणि कास्पियन समुद्रांतील पाण्यांतून ११ रतल मीठ निघतें. दी० बं०

पोरांचा दंगा आणि पाजीपणाची कमालः— कोल्हापूर येथें नवरात्राचा उत्साह ८ दिवस दंग्या धोप्या शिवाय सुयंत्र चालला, तेव्हां पार पडला असें वाटलें होतें. पण अखेर रात्रीं त्यास गालबोट लागलेंच. परस्थ हरिदासाच्या कीर्तनाची हजरी श्री आंबाबाई समोर चालविण्याची असतां कांहीं हलकट व उनाड पोरांनीं कित्येक हरदासांचे डोकीवरील पागोटी उडविण्याची सुरवात प्रथम केली. त्या बिचाऱ्यांनीं पागोटीं खालीं ठेवून डोकीस उपरणी गुंडाळलीं इतक्यांत कीर्तनास उभे राहणारे एक हरिदास बुवा तयारीचे ऐन भरांत असतां या कारट्यांनीं त्यांजवर एकदम हुल्लड करून त्यास मृदंगाचे घोडीखालीं सारलें व ही कारटीं स्वार झालीं! त्या बिचाऱ्यास पुढें कीर्तन कसलें सुचतें आणि काय आपलें स्वतःचें सामान आवरून धरतां धरतां पुरें वाट झालीं! व निवानिशीं पार कसा पडतों असें त्यांस झालें. पोलिसास वर्दी लागतांच फौजदार व स्वा० पोलीस हजर झाले. परंतु ते येण्या पूर्वींच सर्व फांकाफांकीं झाली होती. या मुळें दंगा करणारे मुलांचा पत्ता लागला नाहीं. आंबाबाई सारख्या सार्वजनिक देवालयांत अशा प्रकारें दंगे व्हावेत व त्यांचा पत्ता लागूं नये या परती दुसरी दुःखाची गोष्ट ती कोणती? मुलांनीं कोल्हापूरचें नांव चांगलें गाजविलें ह्मणावयाचें! ज्ञा० सा०

मृत्युः— टाईम्स आफ इंडिया पत्राचे मालक मि. केन हे डाक्टरच्या सल्ल्या वरून ता० ६ आक्टोबर रोजीं विलायतेस गेले ते रस्त्यांत समुद्रांत गेल्या शनिवारीं सकाळीं १०॥ वाजतां वारले. दी. बं.

पोटांत किडा—कराचीस बगदादी लेन मध्यें राहणाऱ्या एक मुसलमान बाई बारा वर्षें पोटाच्या आजारानें आजारी होती पुष्कळ उपाय केले परंतु गुण आला नाहीं शेवटी तिच्या पोटांतून सहा फूट लांब आणि दोन इंच जाड किडा काढला आतां ती बाई बरी आहे. खा० चि०

फ्रेंच व इंग्रज यांच्यांतील वांधा सुखानें मिटेलसें दिसत नाहीं असें फ्रेंच पत्रें ह्मणतात हा वांधा उद्भवण्यास मूळ कारण इंग्रजांची राष्ट्रांतील वर्तणूक आहे असेंही त्यांचें मत आहे

रशियानें इंग्लंडशीं मध्यएशियांतील कांहीं भागासंबंधानें वांधा घातला आहे.

रशियाचे दोन हेर, अडीच वर्षें पर्यंत चीन व तिबेटमध्यें, मोंगलाच्या वेषानें फिरत होते. ते स्वस्थानीं सुरक्षित जाऊन पोंचले असें कळतें.

अमेरिकेंत नुकतेंच एका ठिकाणीं पावसांत कांसव पडला. मागें एकदां काश्मीरांत कबुतरें पडलीं होतीं, व मासे तर बरेच ठिकाणीं पडले होते. दोन चार वर्षांपूर्वीं मुंबईस एकदां अगदी बारीक पत्र्याच्या टिकल्या पडल्या होत्या.

बंगाल्यांत देवीचा महोत्सव जिकडे तिकडे चालू आहे. हा एक महिनाभर असतो.

आयर्लंडांत एका हरिणाची शिकार एक मनुष्य करीत असतां, तें हरिण, समुद्रांतून एक मैलावरील एका बंदराच्या कांठावर जाऊन, शिकारी माणसाची गंमत पाहूं लागलें असें वर्तमान आलें आहे. शिकारी मनुष्याला मनच्या मनांत मांडे खावे लागले असतील. स० वि०

कोरियाचें राज्य व चीनचा मांचुरिया प्रांत इतका प्रदेश या लढाईत रशियानें खालसा करावा म्हणजे आपल्या सैबिरिन रेल्वेची वृद्धी करण्यास साधन होईल अशा रशियन लोकांकडून सूचना होऊं लागल्या आहेत.

विक्टोरियन पार्लमेन्टानें असा एक कायदा केला आहे कीं, शेतकी करणारे व गुरें चारण्याचा धंदा करणारे यांस तगाई देण्याचा सेविंग ब्यांकच्या कमिशनास अधिकार दिला आहे. या तगाईत शेतकऱ्यांच्या शेतजमिनी व चारणीच्या गुरेचरणी गहाण घेऊन त्या जमिनीच्या त्या वेळच्या बाजार किंमतीच्या निम्मी इतकी रकम ५ टक्के व्याजानें द्यावी व ती सर्व रकम व्याज मुद्दलासह, दर साहामाही एक हप्ता अशा ७३ हप्त्यांनीं फेडून द्यावी व त्याजबद्दलचे दस्तैवज रीती प्रमाणें रजिस्टर करून घ्यावे असें ठरविलें आहे.

जपानची ७० लढाऊ गलबतें पिचिली आखातांत दाखल झाल्याचें सांगतात.

जपानी अरमार चाल करून येत असल्यामुळें चिनी बंदरांतल्या लोकांची अगदीं धांदल उडाली आहे.

दुसऱ्या तीन लढाऊ गलबतांची फ्रेंच सरकारानें चीनावर रवानगी केली.

या लढाईच्या संबधानें इंग्लंड व इतर राष्ट्रें यांच्या दरम्यान बोलणें सुरू आहे.

इंग्लंड व इतर राष्ट्रें यांच्या हितापुरताच इंग्लंडचा उद्योग आहे.

पेकीनच्या आग्नेयेकडील ३५० मैलांवर यंगटे व पीहो या नद्यांच्या मुखांच्या दरम्यानचें चेफो ठिकाण जपानानें बळकावलें अशी योकोहामाची बातमी आहे.

योकोहामा, शत्रुकडून कांहीं हरकत झाल्यावाचून जपानी फौज यलु नदी ओलांडून आली अशी कोरियांतली बातमी आहे.

यूलु नदीच्या दुसऱ्या आंगास चिनी व जपानी फौजेची एक मोठी लढाई होण्याचा रंग आहे.

गेल्या आठवड्यांत जपानची ९००० फौज कोरियांच्या हद्दींत चेंगल्या येथें आली व त्यांतील ४००० फौजेस तावडतोब सेवलवर पाठविलें.

कोरियांतले जंगली लोक जपानच्या विरुद्ध झाले आहेत.

शांघाई— फुको नदींतून नौकागमन करण्याचें चीनानें बंद केलें आहे.

इंग्रजांच्या रक्षणार्थ इंग्रज अरमार मांचूरियाकडे जात आहे.

कोरियाचें महत्व किंवा स्वातंत्र्य कायम ठेवण्याचें युरोपियन राष्ट्रांचें एकमत झालें व जपान त्याविरुद्ध वर्तन करूं लागल्यास त्यास हरकत होणार.

युलु नदीच्या उत्तरेस जपानी फौजेचें जें एक ठाणें होतें तेथून जपानी फौजेस चिनी फौजेनें हाकून लावलें व त्यामुळें त्या जपानी फौजेस नदी ओलांडून पलीकडे जाणें भाग झालें.

रशियाची ५,००० फौज कोरियाच्या हद्दीवर दाखल झाली व पोसिटबेच्या वायव्येस हंचन येथें जी जपानी फौज आली आहे तिला रोखीत आहे.

अफगाण अमीर रशियन प्रकरणी अगदीं इंग्लंडच्या तंत्रानें वागत आहे.

फौमोसा बेटाच्या बाजूस टकाउकडे जपानी अरमार आलें.

जपानी फौजेनें चिन्यांस हाकून युलु नदीचा दक्षण किनारा घेतला.

शांघाई माकडनपासून १९० मैलावरील विजु येथें जपानी फौज शिरली. ठा० अ०

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयी जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ६ प्रमाणें

दि० क्लास नंबर १५ मि० नंबर २१/९४

विद्यमान सिव्हिल जडज्य साहेब जिल्हे अकोला यांचे कोर्टांत.

नांव—सटवाजी

बापाचे नांव—बेदराजी पाटील

राहणार घाब तालुके अकोला.

जिल्हे अकोले यांस मयत.

शिवराम बापाचें नांव बेदराजी राहणार घाब ता. अकोले जिल्हे अकोले याचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहु अर्जदार याणे अर्ज केला आहे त्याजकरितां सदर्हू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्याणी तारीख ३ माहे नोव्हेंबर सन १८९४ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल. त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख १६ माहे आक्टोबर सन १८९४ इसवी.

V. N. Dandekar.
सिव्हिल जडज्य.

---

नादारी मोकद्दमा नंबर ४२/१८९४

नमुना (जी)

विद्यमान नादारी कोर्टाचे जडज्य जिल्हे अकोलें.

नोटीस सर्वत्रांस प्रसिद्ध करण्यांत येते कीं, हद्माई वल्लद पाचन्या भाट राहणार आकोलें हा नादार आहे असा आज तारीख ६ माहे अक्टोबर सन १८९४ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ३ माहे नवंबर सन १८९४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्याज बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारानीं पाहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बदलचे प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यानीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरा पुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपाल कडून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिष्टरांत दाखल होतील कळावें तारीख ११-१०-९४ इ०

B. B. Sule
Judge.
Bankruptcy Court.
AKOLA.


घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे (ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मागरा, कांटे शास्त्रोक्त प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।१२ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक


हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ७ १८८

किरकोळ अंकास ........... ०४

Single copy........................ 4 as.

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.... ०।०६
दुसरे खेपेस ....... ०१

# व्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over 10...4 as.
Repetition per line 3 as.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII — AKOLA MONDAY 29 OCTOBER 1894 — NO. 43

वर्ष २८ — आकोला सोमवार तारीख २९ माहे अक्टोबर सन १८९४ इ० — अंक ४३


### ह्या राजश्रींनें केव्हां तरी पळ काढला असावा.

एक गृहस्थास त्याच्या धर्मवेडा मुळें एका जुल्मी सरकारनें कारागृह दाखविला पुढें त्या कारागृहाच्या मजबूत दगडी भिंती पाहून त्याच्या मनाची खात्री झाली कीं आतां आपलें राहिलेलें आयुष्य ह्या एकांत व भयाण कारागृहांत घालविलें पाहिजे. जरी त्याला आतां पुढची गत चांगली नाहीं असें भासत होतें तरी त्याला दुःखांत सुख इतकेंच वाटत होतें कीं मला जुलमामुळें बळी व्हावें लागलें परंतु सद्वर्तनाचें उल्लंघन केल्यामुळें कांहीं नाहीं. जर त्याच्या स्वाधीनची गोष्ट असती तर ह्या संकटांतून तो सहज पार पडला असता.

असें असून त्या बिचाऱ्यास सतत सोळा वर्षें हाल काढीत राहावें लागलें. हीं वर्षे संपतात तों त्याच्या मनांत आलें कीं ह्या भिंतीवर पुढें आलेल्या दगडाच्या आधारानें वर चढावें व त्यानें खिडकीच्या वरून काय दिसतें ह्मणून वर डोकें केलें. आणि असें केल्यामुळें त्याला वाटलें कीं पुढें लोखंडाचे गज आहेत ते काढून टाकतां येतील व त्या चौकटीची आगळही लाविली नव्हती. त्याच्या मनांत बोलूं लागले कीं काय मी पळ कां न काढावा? त्यानें खिडकी तर उघडली आणि सहा फुट उडी जमिनीवर मारली आणि त्या प्रदेशास शेवटचा राम राम ठोकला. जर त्यानें त्याच्या ठाम झालेल्या विचारास एकीकडे ठेवून विचाराची दोरी जर सैल सोडली असती तर ह्या स्थळीं इतके दिवस कुंथत रहावें लागलें नसतें.

ह्या स्वधर्मार्थ प्राण अर्पण करणाऱ्या या बिचाऱ्याची दैवघटित गोष्ट साधक व बाधक आहे. त्याच्या मनाची धांव बंद केल्यामुळें साधक; त्याला ज्या कारणास्तव बंदींत टाकावयाचा होता तें नसल्यामुळें बाधक.

ही गोष्ट पत्र रूपानें जी सर्वांस आवडते त्या प्रमाणें खालीं थोडक्यांत व साध्या शब्दांत सांगतो. एक लेखक बाई ह्मणते कीं, आज सोळा वर्षें झालीं, पित्तक्षोभानें व अशक्तपणामुळें फारच गांजून गेले आहे. नेहमीं थकून जाऊन अगदीं हलक होऊन जाई. माझी अन्नावरची वासना उडाली, पुढें आणलेले ताटास हात लावीन तर शपथ. कित्येक दिवस माझ्यानें एक घास देखील खाववत नसे, कधीं कधीं मला मळमळ सुटे. पोटाचा नगारा होई आणि तोंडावाटें मोठा घट्ट बेडका येई.

मला फारच त्रासदायक खोकला होऊन बरगड्यांत फारच वेदना होत व दम बरोबर छाटत नसे. मी फारच हलक झाले आणि दुकानांत आंत बाहेर करण्याचा माझा तकवा अगदीं निघून गेला. सन १८९१ च्या दिसेंबरात माझ्या एका गिऱ्हाईकानें मदर सिजेलचा क्युरेटीव सीरप (माता शिजेलचा रोगहारक पाक) बद्दल बरेच गुणानुवाद गाईल्यामुळें मी तें औषध घेण्यास सुरूं केलें. मी थोडे थेंब घेतल्या बरोबर मला बरेंच समाधान वाटलें आणि पुढें पंधरा दिवस औषध घेतलें नाहीं तरी मला बरें वाटत होतें. मला असा धीर आला ह्मणून मी अगदीं बरी होई तों पर्यंत ह्या औषधाचा उपयोग केला. आमचे चिरंजीव आरथरास एक वर्ष सतत जेवल्यावर जड झाल्या सारखें व वेदना होत होत्या आणि पोटाची दामटी होऊन खळगा पडल्या सारखें वाटे. त्याला हें औषध घेण्याची मी गळ घातली आणि त्याचा शेवट ह्मणाल तर माझ्या सारखाच झाला. मला पक्कें माहीत आहे कीं ह्या प्रदेशांतल्या बऱ्याच मंडळींनें दुसरे नाना उपाय करून थकल्यावर ह्या शिरपाचा (पाकाचा) उपयोग केला तेव्हां तात्काळ गूण आला. ह्या औषधाचा (ह्मणजे) माता सिजेलच्या सिरपाचा मला रामबाण गुण आला तो इतर पिडीतास ह्यामुळें घावा असें आपणास वाटत असेल तर हें पत्र आपण खुशाक छापावें.

मी तुमची
(सही) (मिसीस) एम वार्ड
१९४ इकसटन रोड
शडफर्ड. नोटिंगह्याम
ता० १ ली माहे एप्रिल सन १८९२

मीसीस वार्ड बाई साहेब ह्या त्रासदायक व भयंकर रोगा पासून बऱ्या झाल्या ह्मणून आह्मी तीस अभिनंदन करतो. आपल्या आयुष्यांत सोळा वर्षांचा वांटा सतत शारीरिक व मानसिक वेदनेंत घालवावा म्हणणे फारच खराब समजावयाचें. कुबेराचे संपत्ती होणें फारच थोड्याच्या कपाळीं लिहिलेलें असतें. परंतु सुदृढता जसा सूर्य प्रकाश सर्वजगभर जिकडे तिकडे सारखा पसरतो तद्वत् पसरली पाहिजे. ही नीट राखावी हें ज्याला अवगत आहे तो तर त्याची काळजी घेईल व ती दूर झाल्यास आपल्या स्वाधीन करून घेईल.

ह्या बाईचा रोग पचनीय पिंडाचा म्हणजे अग्निमांद्य व अजीर्णाचा होता. हा रोग फारच धोक्याचा व दुःख देणारा आहे कारण कीं ह्या रोगाचा पगडा इतका बसतो कीं शरिरांतलीं सर्व अंगें ह्याच्या बळी पडतात व रक्ताभिसरणामुळें ह्या रोगाचें वीष सर्व शरीरांत पसरतें. ह्या रोगाचें मुख्य कारण निरनिराळ्या नांवानें होणारे परिणाम व चिन्हें हीं होत. ती जे औषध सांगते त्याच्या गुणाची ज्यास चांगली माहिती झाली आहे त्यास नवल वाटण्यास नको. मोठ मोठाले असाध्य रोग ह्या औषधास शरण येतात.

आमचे वीर जे आपल्या गुहेंत कसा तरी वेळ काढीत होते त्यास बाहेर निघून जाण्याची गुरु किल्ली माहित नव्हती.

जर ह्या ओळी अवलोकन करणारे दुःखाचे गुलाम झाले असतील तर त्यास तसें राहण्यास कांहीं कारण दिसत नाहीं.

तिच्या सचोटीच्या आलोकांत लिहिलेल्या पत्रावरून रोगाचें शमन कसें होईल ह्याचा रस्ता दाखवून देते. हें आमच्या पत्रव्यवहार करणाऱ्या गृहस्थाच्या लेखा वरून समजेल.

H. D.

### वऱ्हाडवाशी लोकांस विनंती.

प्रांतांतील लोकमत कळण्यासाठीं वऱ्हाड सामाजिक सभेकडून येते नोव्हेंबर महिन्यांत अकोलें येथें जाहीरसभा भरणार आहे. सभे पुढें विचारा साठीं येणारे विषयांची माहिती सर्व लोकांस होण्या करितां खालीं देत आहो.

#### विषय.

१. वऱ्हाडच्या जमिनीची स्थिती आणि अधिक सारा वाढविला असतां होणारे अनिष्ट परिणाम.

२. जंगल खात्याच्या बंदोबस्ता मुळें लोकांस खरोखर कांहीं त्रास आहेत कीं काय? असल्यास ते कोणते? व त्यांचे परिहारार्थ काय करावयास पाहिजे.

३. वऱ्हाडच्या शेतकऱ्यांची सांप्रतची दीन स्थिती सुधारण्यास त्यांना माफक व्याजानें कर्ज मिळण्याची कांहीं सोय करितां येईल कीं नाहीं व करितां येईल तर सरकारा पासून सहाय्य कोणकोणतें मागावें.

४ सर्व प्रांत शेतकीवर अवलंबून राहणें सर्वथा इष्ट नाहीं. यास्तव धंदेशिक्षणा साठीं कोणकोणते उपाय योजणें जरूर आहे.

५. न्याय आणि मुलकी खात्याचीं कामें निरनिराळ्या अधिकाऱ्यांस देण्याचें योजिलें असतां काटकसरीनें तसें करितां येईल कीं नाहीं.

६. वऱ्हाडांत प्रांतिक अधिकाऱ्यांच्या जागा मिळण्यास उमेदवारांच्या अंगीं कोणकोणती योग्यता असावी. आणि हल्लींच्या व्यवस्थेनें कोणकोणते इष्ट व अनिष्ट परिणाम घडतात.

७. वऱ्हाडा करितां जे जे कायदे होतात ते कोणत्या शिस्तीनें होणें इष्ट आहे.

८. सिव्हिल सार्व्हिसची परीक्षा विलायतेस होते त्या प्रमाणें हिंदुस्थानांतही होत जावी असा पार्लमेंटमध्यें ठराव झाला असून सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनीं त्यांस अनुकूलता दिली नाहीं. याजबद्दल वऱ्हाडच्या लोकांच्या तर्फे असंतुष्टता दर्शवून वरील पार्लमेंटच्या ठरावाची बजावणी करण्या विषयीं मुख्य सरकारास विनंती करावी किंवा नाहीं.

९. वऱ्हाड शाळाखात्यांतून नुकतेंच एक सरक्युलर प्रसिद्ध होऊन आठव्या यत्तेंत जाणाऱ्या मुलांच्या वयाची यत्ता ठरविली गेली आहे. तशी इयत्ता ठरविल्या पासून लोकांस उच्च प्रतीचें शिक्षण मिळण्यास अडथळा येईल. यास्तव तें सरक्युलर रद्द करण्या विषयीं लोकांच्या तर्फे सरकारास विनंती करावी किंवा नाहीं.

सदर्हू विषया संबंधानें घडत असलेल्या परिणामाबद्दल स्वतःचे अनुभवा वरून व लोकस्थिती वरून जें मत झालें असेल तें सदर्हू सभेपुढें सादर करण्या साठीं तसेंच दुसरे लोक जी माहिती देतील ती योग्य आहे कीं नाहीं ह्या बद्दल संमती देण्या करितां विचारी व व्यवहारदक्ष मंडळीनें येणें जरूर आहे.

प्रत्येकास स्वतंत्र पत्रानें कळविण्यास सभेचे चालक समर्थ नाहींत सबब तसें पत्र येण्याची वाट न पहतां अकोलें येथें तारीख २ माहे नोव्हेंबर सन १८९४ रोज शुक्रवारीं येऊन व्यवस्थापक मंडळीस भेटण्याची सर्वांनीं कृपा करावी. मंडळी येथें कधीं व किती येणार हें पत्रानें सेक्रेटरीस कळविल्यास फार उत्तम होईल.

सभेचा समारंभ रोज शनिवार व रविवार ह्मणजे तारीख ३।४ नोव्हेंबर रोजीं होण्याचें ठरलें आहे.

येणारे लोकां पैकीं फक्त गरीब शेतकरी वगैरे लोकांचे (दोन दिवस) जेवण्याची व गरजेनुरूप औषधी फुकट मिळण्याची सोय कांहीं उदार मंडळीच्या सहाय्यानें केली गेली आहे. ह्या सोयीचा उपयोग करून घेणारास सभेच्या आफिसांतून दाखला मिळेल.

ज्यास परमेश्वर दयेनें सर्व अनुकूल आहे अशा लोकांस उतरण्या साठीं त्यांच्या पत्रा प्रमाणें जागेची होतां होईल तों पावेतों तजवीज केली जाईल.

प्रत्येकास खानगी कामें आहेतच पण हें काम सार्वजनिक व मोठें महत्वाचें आहे असें सर्व जाणतच आहेत. येण्या बद्दल सुज्ञांस अधिक लिहिणें नको. सर्वांनीं आपले आप्त व स्नेही मंडळी बरोबर आणण्यास हरकत नाहीं कळावें तारीख ११ माहे आक्टोबर सन १८९४ इसवी.

मुक्काम अकोलें.

पांडुरंग बापुजी शजंदेकर.
होणारे सभेचे सेक्रेटरी.

व्हाडसमाचार

मिती कार्तिक शुद्ध १ शके १८१६

अफूचा पेय व विक्री हीं या देशाच्या नैतिक संपत्तीला ऱ्हासमूलक आहेत आणि इंडियाच्या संसर्गानें चीनदेशाही बिघडत चालला आहे अशा कल्पनातरंगांनीं पार्लमेंटा-

चा वाद्सम्रुद्र खवळून गेला होता हें आमच्या वाचकांच्या ध्यानांत असेलच. कांहीं टोपीवाल्यांनीं व आमच्यांतील कांहीं आंग्ल बनू इच्छिणाऱ्या विचारशून्य लोकांनीं कंबरा बांधल्या आणि अफू कमिशन बसाविण्यांत आलें. कमिशनचा रिपोर्ट उजेडांत लवकर येणार आहे परंतु साधारणतः कांहींच नवीन गोष्ट बाहेर आली नाहीं. फायदा इतकाच कीं सर्व माहिती या वाद्युद्धांतली संग्रहित झाली आणि पुढील सुधारणेला एका प्रकारें हा मूळ पाया घातला गेला.

अफूचे परिणाम चांगले आहेत तसे वाईटही आहेत. अफूच्या प्रमाणावर व नित्य उपयोगावर तिच्यांतली व्यसनाधीनता, तल्लफ-जाणी व दुष्परिणाम हीं अवलंबून असतात. उपयोग द्वारा अफू सारखें सौम्य मादक द्रव्य दुसरें क्वचित् आढळेल असा सिद्धान्त ठरत आहे. अफूनें जितका हा देश विपन्न, आचारभ्रष्ट, व कर्तव्यशून्य झाला असेल त्यापेक्षां दारू सारख्या पेय पदार्थांनें इंग्लंड देश अधिक बुडत चालला आहे असें निदर्शनास आलें. इंडियन लोकांवर अफूच्या प्रकरणीं सक्ती व मनाई करूं नये असाच सर्व कमिशनच्या निकालाचा ओघ दिसतो.

ह्यांत प्रश्न दुसरा असा आहे कीं या कमिशनामुळें जो सहस्त्रावधि पौंड खर्च लागला आहे तो विलायत सरकारची मर्जी हिंदुस्थानावर लादण्याचा आहे. ही मर्जी मोडावी आणि फुकट अव्यापारेषु व्यापार करणाऱ्या इंग्लंडवाल्या लोकांनीं हा खर्च सोसावा हें कोणीही सूज्ञ कबूल करील. इंग्लंडानें अनेक खर्च विनाकारण या देशावर बसविले आहेत तेव्हां त्या खर्चां मध्यें हा खर्च कांहीं वावगा दिसणार नाहीं परंतु कंठस्थ प्राण आल्याबर देखील या देशाची काळजी वेतली जाऊं नये यास कोणती धनतृष्णा म्हणावी!

## भिमेचा पूल.

( पंढरपुरच्या सोयी साठीं )

पंढरपुर म्युनिसिपाल कमिटीनें एका मोठ्या सत्कार्यास हात घातला आहे. पंढरपूरास भिमेला पूल नसल्या मुळें ग्रामस्थांचे व यात्रेकरूंचे फार हाल होतात हें सर्वश्रुत आहे तेव्हां ही अडचण दूर करण्यासाठीं पंढरपूर म्युनसिपालिटीनें पूल बांधण्याचा पक्का संकल्प केला आहे. या पुलाला सहा लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. या रकमे पैकीं सरकारांतून या सार्वजनिक कार्या प्रीत्यर्थ ६२०८९ रुपये मिळणार असून बाकी ११५४७३ रुपये मुनसिपाल फंड व लोकांच्या वर्गण्या यांवर जमवावयाचे आहेत.

पंढरपुर मुनसिपालिटीचे प्रेसिडेंट मि. जी. स्काट साहेब आपल्या सूचनेंत सर्व लोकांस या विषयीं असें कळवितात कीं:—

"जरी मी पर जातीचा मनुष्य आहे तसेंच परधर्मीचा आहे तरी अशा सत्कृत्यास व पुण्यकर्माचे कामास (हें पुल बांधण्याचें काम माझ्या कारकीर्दींत आल्यानें या रूपानें तरी माझे हातून श्री पांडुरंगाची थोडी बहूत सेवा स्वतः घडणें व तें माझ्याच वाट्यास येणें ही खरोखर माझे महत् भाग्योदयाचीच वेळ आहे असें दर्शविल्या वांचून माझ्यानें राहवत नाहीं अशा सत्कृत्यास) सर्व लोकांनीं यथाशक्ति मदत केल्यास तो ईश्वरास रुजू होऊन प्रसिद्ध कविराज वामन पंडित यांचे " अनंत हस्ते कमलावरानें देतां किती घेईल दो करानें " या उक्ती प्रमाणें लोकांचें कल्याण होईल यांत संशय नाहींच.

हिंदु धर्माभिमान्यांनीं ही पांडुरंग सेवेची अमोल्य संधि दवडूं नये म्हणून वर मि. स्काट यांनीं बोध केला आहे त्या पेक्षां आम्हास अधिक लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. जे उदार लोक यथाशक्ति या सत्कृत्यास मदत करितील त्यांच्या नामावळीची नोंद पांडुरंगाच्या मंदिरांत फार जपून ठेविली जाईल. या प्रासंगिक व यथाकाल मदतीनें वर्गणीदारांच्या उदार देणगीचा महिमा चिरकाळ त्यांच्या पुढील पिढ्यांसही संस्मरणीय होईल इहलोकच्या वाटसरूंनीं हा पुण्यमार्ग यथाशक्ति स्वीकारावा आणि आपआपल्या धनव्ययानें पांडुरंगाला आपलासा करावा हा उपदेश धर्मशीलांस नकोच आहे. तेव्हां वैकुंठपेठेंत आपापल्या नांवाच्या हुंड्या या सत्कार्यमिषानें किती वऱ्हाडवासी गृहस्थ धाडतात हें पाहण्यास आह्मी फार उत्सुक आहों.

---

रा० रा० महादेव चिमणाजी आपटे मुंबई हायकोर्टाचे सुप्रसिद्ध वकील यांस गेल्या सोमवारीं देवाज्ञा झाली हें कळविण्यास फार फार दुःख वाटतें. या गृहस्थाची वकिली चांगली वर्णनीय व हृदयवेधक होती. गुदस्ता हे वऱ्हाडांत दोन तीन वेळा आले होते तेव्हां त्यांच्या गोडी वाणीचा, वाद-कौशल्याचा, कायद्यांतील पारंगतेचा अनुभव आमच्या पैकीं पुष्कळांस येऊन चुकला आहे. हे थोर गृहस्थ मोठे बाणीदार, साधे, व सरळ मार्गी होते. ते आपल्या कर्तृत्वानें व शहाणपणानें नांवालौकिकास व श्रीमंतीस चढले. त्यांच्या तोडीचा मुंबई हाय कोर्टांत दुसरा वकील विरळा आढळेल! मरण समयीं यांचें वय ५० वर्षांचें होतें. हिंदुस्थानचे चांगले चांगले लोक साठ पाऊणशे वर्षें वांचतात असें क्वचितच घडतें आणि त्यामुळें आमच्या समाजाचा ज्ञानविकास, अनुभवश्रेणी व समाजप्रगती हीं जानेंत दृशेला येतात तोंच समाजाच्या घटकावयांच्या अकालीं मृत्यूमुळें अस्तंगत होतात!

रा. रा. महादेव चिमणजी आपटे यांनीं पुण्यास जो "आनंदाश्रम" स्थापिला आहे त्याच्या मुळें त्यांची आठवण व कीर्ती सदैव लोकांच्या मनांत जागृत राहील. "आनंदाश्रम" ही एक अपूर्व संस्था आहे. तिचा उद्देश जुन्या ग्रंथाचा उद्धार करून वेदाविद्येचा प्रसार करण्याचा आहे. लाख दीड लाख रुपये या संस्थेकडे खर्च झाले आहेत. ही संस्था त्यांचे पुतणे रा. रा. हरीभाऊ आपटे यांनीं माधवरावजींच्या हयातींतच फार उत्तम प्रकारें चालविली असून ते आपल्या चुलत्यांचा 'आनंदाश्रम' यथार्थनामा करून दाखवितील अशी आह्मास बळकट आशा आहे. रा. हरीभाऊ चांगले शिकलेले कादंबरीकार, व कार्यदक्ष आहेत. त्यांच्या आजपर्यंतच्या सुकृती वरून कैलासवासी महादेवराव यांचा मनोरथ ते संपूर्ण व सुफल करितील अशी त्यांच्या मित्रमंडळीस पक्की खात्री आहे. कै. महादेवराव यांस विषम ज्वरानें फार आकस्मिक मरण आलें. निधनसमयीं त्यांस आतुर सन्यास देण्यांत आला होता. त्यांच्या इच्छे प्रमाणें पुण्यास 'आनंदाश्रमां' तच त्यांस समाधि देण्यांत आली. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरकाल सुख व शांति देवो!

---

कानपूरचे श्रीमान जमीनदार पंडित नमनलाल तिवारी यांनीं एक वेदशाळा स्थापण्याचा विचार केला आहे. ३९ हजार रुपये शाळागृहा प्रीत्यर्थ खर्च होणार असून दरमहा ते ३०० रुपयांचा खर्च चालविणार आहेत. हिंदुधर्माचे पुनरुज्जीवनास प्रारंभ होत आहे ही मोठा आनंदाची गोष्ट आहे. "स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः" हें ध्यानांत वागवून प्रत्येक धर्मवाल्या लोकांनीं परकीय धर्मा विषयींही आदरबुद्धि जागृत ठेविली पाहिजे. वरील स्तुत्य व उदार कृत्याचें चित्र लक्ष्मीसंपन्न गृहस्थांनीं अनुकरणेच्छेनें नेहमीं आपल्या अंतर्चक्षू समोर ठेवावें अशी आह्मी शिफारस करितों.

---

मद्यपी लोकांचे व्यसनाला कांहीं प्रत्यवाय करावा आणि नवे दारूबाज लोक आपल्या राज्यांत पैदा होऊं नयेत अशा हेतूनें गायकवाडशाईंत एक उत्तम उपाय योजण्यांत आला आहे. नवीन दारूचा गुत्ता चालू व्हावयाचा नाहीं. कोठें अशा पिठ्याची जरूरी वाटली तर ती जरूरी खुद्द दिवाण साहेब यांच्या नजरेस आली पाहिजे. आणि कोणत्याही गांवच्या पांचषष्टांश लोकांनीं जर एखादें दुकान बंद करण्याविषयीं अर्ज केला तर त्या प्रमाणें लागलीच अर्जावर हुकूम मिळून त्याची अंमलबजावणी केली जाईल. उपाय मोठा सुलभ व बळवत्तर आहे. फक्त लोकांच्या ठिकठिकाणीं जाहिरसभा भरून एक दृढनिश्चय झाला पाहिजे म्हणजे स्वल्प काळांत या धन्वंतरी उपायानें मद्यपानाचा रोग आमच्या लोकांच्या हाडा मासांतला नष्ट होईल अशी बळकट आशा आहे. या उपायाचा अनुभव इंग्रजी अमलांत घेण्यासारखा आहे. पण तसा करण्यानें तिजोरींत जी अबकारीकडील तूट पडेल ती कशी भरेल हा मात्र मोठ्या चिंतेचा प्रश्न आहे. आधीं स्वार्थ आणि त्यांत चुकून झाल्यास परमार्थ.

---

सिव्हील सर्व्हिसची परीक्षा विलायतेंत नुकतीच झाली. त्या परीक्षेला १३ नेटीव उमेदवार होते त्यापैकीं सहा जण पसार झाले. त्या गृहस्थांचीं नांवें येणे प्रमाणें:— दादाचारी, मुसफअली, घोसाल, हुसनअली, बानरजी आणि चांद.

या निकालावरून आंग्लो-इंडियनांच्या हृदयांत तत्काळ उजेड पडेल कीं इंडियांत ही परीक्षा सुरू झाली तर सिव्हील सरव्हीस मधील हुद्यांच्या जागांस आपण आंचवलोंच असें त्यांनीं पक्कें स्मरावें. इंग्रजी विद्येनें सुधारलेल्या राष्ट्राशी देखील टक्कर देण्याचा बीजांकुर आह्मा लोकामध्यें प्रेरित झाला आहे पण त्याच्या फलोद्गमाला छाटून काढण्यासाठीं आंग्लो-इंडियन शस्त्र घेऊन उभे आहेत असें ह्मटल्यास काय चूक होईल! कांहीं नाहीं. पण त्यांना आपली 'पॉलिसी' राखली पाहिजेना.

---

The Berar Samachar

MONDAY OCTOBER, 29, 1894

### Ourselves

Our subscribers will, we hope, allow us the usual Dewali Holidays which they have hitherto done ungrudgingly. As our offices will be closed for these days there will be no paper issued on the 5th. proximo.

---

The old Police Act V of 1861 is on the legislative anvil. The Imperial Legislative has proposed some signal amendments. The bill under deliberation touches the public most vitally except on some minor changes. Such a measure of public interest, it is but right, should be thoroughly convassed in the public press and from the people's platforms. It is therefore a real pleasure to find that the Hon'ble Sir A. Mac Donnell the mover of the bill has made some effort to court public opinion on this piece of proposed legislation.

The police Act, as it stands vests the police force with a large & wide measure of executive powers. We have often times met with examples of the abuse of these powers. It is the right and proper use of them that will make the Police department the real guardians and custodians of the people's peace and safety both of purse and person. We are however of opinion that the unsuccessful aspect of the police administration is not due to the legislative act. It is the result of the very constitution of the Police corps itself Few men of light and leading enter that branch of service or rather, the police force is made up of men of low calibre and little social standing.

The new bill is acceptable to us in so far as it makes the discipline of the police more systematic and more stringent. Some new checks ought to control the extravagent exercise of the powers under the act. The internal organization does not undergo these necessary and effective changes. So we are disappointed because the bill is for that purpose quite useless and a mere nullity.

We must confess that the Police Act has attained a high stage in its usefulness. It has proved a tolerably successful and salutary legislation. The inherent defects are few and far between. So with all its weaknesses and the abuses of the human machinary that utilizes the Act for the prevention and detection of crimes, it has well stood the trial of the past thirty-three years. One generation's experience is sufficient to warrant our view of the utility of the Police Act. It might as well suggest new lessons for further guidance and improvements. The history of the police administration] teaches that the police force has become an object of public hatred and odium. Mr. Plowden was no doubt right when he remarked last year that the quota of work in the sphere of government that falls to the lot of a police officer is rather disagreeable and vexations. Even making a large discount for this distribution of administrative labour, we cannot make out why the police force should be looked upon as the spies of the King of Terror and despo— tism.

The Magistracy and the police act in concert and perfect harmony. Their union makes the giant's power more giant like. The amendments to the Police Act strengthens the union in stead of weakening it. To our plain mind, the bill appears to take its

origin in the recent disturbances of the last two years. The bill is an attempt to undo the long experience of a generation in order to justify the action of the various local Governments in quelling the disturbances and riots between the Hindus and Mahomedans. The bill, if it passes into an Act, is just like a sword in a madman's hands. The heads of local governments imbibe the ideas of their inferiors who are found to set up one consistent policy of *divide et imperio*. The masses are thus estranged from the ruling classes. If the bill is framed to meet the present exigencies we are sorry that it will prove a grand failure. The chances are that it will accentuate the unfriendly relations between the two races and will hasten the current of events to impair the stability and permanence of the British Government. Let us quote below the whole clauses that throw in our midst the dangerous apple of discord and anarchy. No Government pulls on well that rules by the sword. If the amity and loyalty of the people be put at stake through the energising exercise of the magisterial powers we cannot vouchsafe for the utility of a legislation that makes magistrates and the police force the supreme rulers of a locality in a district. The clauses run as follow:—

"The cost of such additional police-force shall be borne, as the Magistrate of the district may direct,—

(*a*) by the inhabitants of, or persons having interest in land in, the local area described in the notification, or both, or

(*b*) by any such inhabitants or persons, or class or classes of such inhabitants or persons, or both, as aforesaid, as in the opinion of such Magistrate have caused or contributed to the disturbance or other cause which led to the quartering of the additional police-force, and no portion of such cost shall be payable by any person or class of persons who, in the opinion of the Magistrate, have been free from blame;

and such Magistrate, after enquiry if necessary, shall apportion such cost according to his judgment of their respective means among the inhabitants and other persons who are as aforesaid liable to bear the same."

After section 15 of the said Act the following shall be inserted,

If in any part of the general police-district as aforesaid, in which, under the provisions of the last foregoing section, an additional police-force might be quartered, death or grievous hurt or damage to property has been caused by or ensued from the misconduct of the inhabitants of, or persons having interest in land in such part, or both, and if no additional police-force has been quartered therein it shall be lawful for the Magistrate of the district, with the previous sanction of the Local Government to—

(*a*) make an award fixing the amount of compensation payable to the sufferers for the injury caused by or which has ensued from such misconduct;

(*b*) make an order determining the persons or class or classes of persons, being inhabitants of or having interest in land in such part as aforesaid, by whom the amount so awarded shall be paid; and

(*c*) make an order assessing the portion in which the same shall be paid by each such person or class of persons according to his judgement of their respective means.

Provided that no portion of the compensation so awarded shall be payable by any person or class of persons whom the Magistrate shall, in such order, declare to be innocent of complicity with the misconduct."

If any tract be found to be in a disturbed or dangerous condition it is but right that punitive police force should be established to make people return to a life of peace and safety. The cost of such an arrangement should no doubt be levied from the entire population of the particular tract. The law as it stands is well and good. The first in—road on the old rule is to make land—holders liable for riots and disturbances though they may not themselves be residents in the area affected. The inhabitants including of course the non—resident landholders must therefore contribute to the cost of the quartering of additional police. There is a further attempt at refinement to apportion the cost among the very persons and classes that have caused such disturbances. If the disturbance be not a chronic and contnuous one so asnot toi require additional police an alternative procedure is proposed to levy compensation from those who are the real disturbers of the locality and to pay it away to the real sufferers.

The scheme on paper can defy any argument contrary to its soundness and justness. But who is it that finds out the real doers of the wrong and the real patients of the serious outrages? The highest judge of these matters is the *Magistrate of the District*. The District Magistrates in the general run of officers have belied our hopes as to their decisions either in point of calm, patient and searching inquiries or of a sound, just and comprehensive principle of action. The picture of the 'Present Maharashtra' that we have essayed to draw in a broad out—line in the last two articles will convince our readers of the truthfulness of our remarks. Today we have exposed the real danger in the bill and on some next occasion we propose to ourselves to take up the subject again with a view to suggest some remedial measures.

---

## वऱ्हाड.

हवामान--- अकाली मेघवृष्टीनें लोक खिन्नहृदय व चिंतातुर झाले आहेत. पावसाळ्यास प्रारंभ झाल्या प्रमाणें सर्व प्रकार चालू आहे. खरिपाची पिकें चांगली होतीं परंतु रुपयांतली चार आणे सुद्धां येतील किंवा नाहीं याची वानवा आहे. अस्मानी पुढें इलाज नाहीं! हवा रोगट आहे.

मि० सिम्पसन अकोल्यास या आठवड्यांत आल्यावर मि० सी. इ. प्राइस एक्स्ट्रा असि० कमिशनर हे यवतमाळास जातील. मि० प्राइस यांची बदली फार लवकर झाल्यामुळें व चांगला मनुष्य बदलल्यामुळें लोक नाखुष आहेत. यवतमाळचे रा० रा० रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. एक्स्ट्रा असि० कमि० यांची बदली उमरावतीस होणार असल्या विषयीं कळतें.

दिवाळीच्या सणा निमित्त मामुल वहिवाटी प्रमाणें आजच्या अंकाची सुटी घ्यावयाची होती पण कारखान्याच्या सोयीसाठीं पुढील अंकाची सुटी घेतली आहे तेव्हां आमचे वाचक आनंदानें आमची विनंती मान्य करितील अशी आशा आहे.

राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. यांची नेमणूक वऱ्हाडच्या डायरेक्टरच्या स्थलीं कायम झाल्याची चिंतित शुभ गोष्ट गव्हर्मेंट सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झाली आहे हें कळविण्यास परम संतोष वाटतो. ईश्वर करो आणि पटवर्धनशाही वऱ्हाडास चांगली लाभो!

येत्या शनिवारीं वऱ्हाड प्रांतिक राष्ट्रीय सभेस अकोल्यास सुरुवात होईल हा समारंभ या प्रांतीं पहिलाच आहे तथापि त्याच्या चालकांच्या व्यवस्थे वरून मेवराजांनीं कृपा केली तर ही सभा फार अप्रतिम होईल. उपोस फावेल त्यांनीं अवश्यमेव आपल्या डोळ्यांची सार्थकता करून घ्यावी.

रा. रा. श्रीराम मोतीराम खत्री हे गृहस्थ तेल्हाऱ्याचे लज्जन रा. रा. देवराव जयकृष्ण यांच्या विरुद्ध फिर्यादीतील वादी या नात्यानें पुष्कळांस ठाऊक असतील. राजश्री श्रीराम यांजवर खोटा रुपया चालविल्या बद्दल तेल्हाऱ्याचे चीफ कान्स्टेबलानें खटला केला होता. आरोप खोटा ठरला आणि आरोपीची दोषमुक्तता झाली. मि. सिम्पसन यांस पोलिसचा पुरावा विश्वसनीय वाटला नाहीं.

आणि या पुढें राजश्री श्रीराम यांनीं त्या चीफ कान्स्टेबलावर खोटा खटला रचल्या बद्दल उलट फौजदारी केली पण मि. हेअर यांनीं ती रद्द केली. पुराव्या वरून फिर्याद पुढें चालावी असा आमचा ग्रह आहे. प्रकरण येथेंच थांबणार नाहीं. परंतु पोलिसाच्या बंदोबस्तानें व कायद्याच्या सबबीनें एका मनुष्याचे किती प्रकारें हाल होऊं शकतील याचें हें प्रकरण चांगलें उदाहरण आहे.

येत्या नोव्हेंबर ३१४ तारखेस अकोल्यास जी राष्ट्रीय सभा भरणार आहे तिला येणाऱ्या पाहुण्यांना शिवा सामुग्री एक सहस्र मंडळी पुरती देण्याचें कै. रा. रा. गोविंदराव लक्ष्मणराव देशमुख उगवें, यांनीं कबूल केलें होतें आणि दुःखांत सुख इतकेंच कीं, रा. रा. गोविंदराव यांच्या आकस्मिक मृत्यूस एक महिना होत नाहीं तोंच त्याचे बंधु व इतर आप्त यांनीं त्या गृहस्थाचें वचन पुरें करण्याचें मनावर घेतलें आहे. उगवेकर देशमुखांचें घराणें जुन्या राहशातींतलें आहे. देशमुखांच्या चतुर्वर्ग बंधूवर आसपासच्या गांवकऱ्यांचा पूर्ण विश्वास असून त्यांच्याच सल्ल्यानें पुष्कळ लोक आनंदानें वागतात. राजश्री गोविंदराव यांस घोड्यांचा शोक भारी असे. ते दिलदार व सार्वजनिक कार्यांत पुढारी असत. उगव्याच्या शाळेस त्यांची मदत पुष्कळ असून त्या शिवाय आकोल्यास मुलीच्या शाळेला त्यांनीं १००० रुपये देणगी दिली होती. डफरीन फंडाला हे वर्गणीदार होतेच. ४१ वे वर्षी या गृहस्थांच्या मरणामुळें सर्व घराण्याचा एक खंबीर खांब पडल्या सारखें झालें तथापि त्यांचे आप्तबंधु त्यांचा कार्यभार शिरावर घेऊन नीट चालवितात आणि आपल्या घरंदाजीचा लौकिक कायम ठेवितात हें ऐकून पुष्कळांस आनंद व अभिमान वाटेल. सद्गृहस्थ विरळा आढळतात!

---

## नोटीस

कोंडवाड्याचे तपासणी करितां आणि यांमधे व्यवस्थे करितां वऱ्हाड म्युनिसिपल कायदा कलम ११६ (१) (इ) प्रमाणे अकोलें म्युनिसिपल कमिटीनें तारीख १७ माहे आक्टोबर सन १८९४ इ० रोजीं भरलेल्या स्पेशल जनरल सभेंत केलेले नियमांचा मसुदा सदर्हू कायद्याचें कलम १५० अन्वयें प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

सदर्हू मसुदा तारीख १५-११-९४ इ. रोजीं कमिटींत विचारा करितां घेतला जाईल तरी सदर्हू नियमास कोणाची हरकत असल्यास लेखी कमिटीचे आफिसांत सदर्हू तारखे पूर्वी दाखल करावी.

---

१. अकोलें म्युनिसिपाल हद्दींतील प्रत्येक कोंडवाडा महिन्यांतून एकदां कमिटीनें तपासणीचे कामा करितां नेमलेल्या किंवा अधिकार दिलेल्या इसमानें तपासावा. सदर्हू इसमानें तपासणी रजिष्टरावर सही करावी आणि पावत्या रुजूं पहाव्या.

२. कोंडवाड्या वरील नोकरानें, कोंडवाड्यांत आलेल्या जनावराचे विक्री संबंधीं

आक्ट $\frac{१}{१८७१}$ ( Cattle Tress pass Act )

यांत सांगितलेले पद्धती प्रमाणें चालावें.

३. कोंडवाड्या वरील नोकरानें ठेविलेले हिशेब म्युनिसिपाल कमिटीनें सदर्हू हिशेब तपासण्या करितां नेमलेल्या किंवा अधिकार दिलेल्या इसमानें दरमहा तपासावे. व आपल्या तपासणीचा दाखला म्युनिसिपाल कमिटीस द्यावा.

Dated Akola. 22nd. October 94. } D. G. Patvardhan. Secretary. Municipal Committee. Akola.

---

NOTICE

Draft of rules made by the Akola Municipality in their special General Meeting of the 17th October 1894, under see. 116[i] (e) of the Berar Municipal Law 1886 for the inspection and proper regulation of pounds is published for general information as required in sec. 150 (l) of the Law.

The draft will be taken into consideratoin on the 15th. of November 1894 before which date, objections, if any, will be received in writing.

1 Every pound situated within the limits of the Akola Municipality should be inspected once in every month by a person appointed or authorized by the Municipal Committee for the purpose. Such person shall sign the inspection register and compare the vouchers.

2. Every pound keeper shall follow the procedure laid down by the Cattle Tresspass act I of 187I in respect to the sale of impounded animals.

3. The pound keeper's accounts shall be audited once in every month by a person appointed or authorized by the Municipal Committee for the purpose and such person shall certify the result of his audit to the Municipal Committee.

Akola Dated 22nd October 1894 } D. G. Patvardhan Secretary Municipal Committee Akola.

---

## वर्तमानसार,

पुण्यांतील हिंदु लोकांनीं पुढें सांगितलेल्या नियमांप्रमाणें वागण्याची खबरदारी घ्यावी, अशी आमची त्यांस प्रेमपूर्वक सूचना आहे.

१. वायू न सरेल, अशी व्यवस्था ठेवावी. ह्यातार्‍याकोतार्‍यांची आवरशक्ति वयाच्या मानानें कमी होते. सबब त्यांनीं ही सूचना अधीं अमलांत आणावी.

२. कित्येकांना मोठ मोठ्यानें लोकांच्या काढण्याची संवय असते, ती त्यांनीं बंद करावी.

३. देवपूजेचे वेळेस घांटा वाजविणें बंद करावें; अथवा त्या नाहींशा करून संग्रयास जागा ठेवूं नये.

४. एकावर एक भांडीं आपटून नाद न निघेल. अशी तजवीज व्हावी.

५. मिटक्या मारीत अथवा भुर्के मारीत जेऊं नये.

६. चालतांना जोडा फटक फटक व करकर न वाजेल, अशी खबरदारी घ्यावी, अथवा जोडे घालण्याचें सोडून द्यावें.

७. जांभई आली ह्मणजे चुटक्या वाजविणें व ढेंकर देणें सोडून द्यावें.

८. लिहितांना कित्येकांची लेखणी कुरकुर वाजते, ती वाजतां उपयोग नाहीं.

९. टांगे गाड्या वगैरेस रबराच्या धावा घालाव्या.

१०. टापा न वाजविण्याबद्दल व न ओरडण्याबद्दल पशूंच्या मालकांनीं त्यांस सक्तीचे हुकूम द्यावे.

११. लहान मुलांचीं खेळणीं अंधारांत नेऊन टाकावीं; पण टाकतां वेळेस अवाज न होण्याबद्दल खबरदारी घ्यावी.

१२. सर्व लोकांनीं सेंदूर खावा. अथवा सडकून तूप खावें. सारांश, घसे बसतील अशी तजवीज तरी करावी. अथवा मोठ्यानें बोलणें बंद करावें.

१३. झोंपेंत घोरतां उपयोग नाहीं.

१४. ज्यांच्या घरांत झोपाळे, पाळणे वगैरे असतील, त्यांनीं ते अवाज न करितां सोडावेत अथवा न वाजतील अशी खबरदारी घ्यावी.

१५. वाजंत्र्यांनीं वाजविण्याचा धंदा बंद करावा, व पोटावर निखारे ओढावे. अथवा दुसरा धंदा करण्यास येत असेल तर तो कोठेंही आवाज न होईल, अशी व्यवस्था करावी.

१६. आतां दिवाळी जवळ आल्या मुळें कित्येकांचें करंजा कडबोळी तळणें सुरू होईल तेव्हां अवाज न होईल, अशी व्यवस्था करावी.

१७ तडतडणारीं लांकडें अथवा जळण उपयोगांत आणूं नये.

१८. पदार्थांस फोडण्या देणें बंदच करावें.

१९. ज्यांच्या जवळ घड्याळें असतील त्यांनीं तीं बंद ठेवावींत व टुकटुक न वाजणारी घड्याळें असतील तर तींच वापरावीं.

सारांश, ज्या योगानें कोणत्याही तऱ्हेचा नाद, आवाज होणार नाहीं, असें करावें; जो असें करून सांपडेल, त्यास दंड होईल. सर्वांस जाहिर व्हावें. व्यापारी.

हिऱ्यांचा व्यापार कारणाऱ्या लोकांवर इंग्लंडातील चोरांची धाड फार पडूं लागली असून, तिकडे इतर चोरांचाही बराच सुळसुळाट झाला आहे.

आंगठींत चपखो योजना करून, ती कोणत्याही बोटाला सहजीं बसेल अशा तऱ्हेची एक नवी व्यवस्था युरोपांतील जवाहिऱ्यांनीं केली आहे.

चाबकाचा मार.—कलकत्यास हल्लीं एक युरोपियन नाटक कंपनी आली आहे. तिच्या संबंधानें तेथील 'डेलीन्यूज' पत्रांत कांहीं टीका आली होती. ह्मणून त्या कंपनीतील ३ स्त्रिया, त्या पत्राचा कर्ता डा. हालीयाच्या घरीं, गेल्या मंगळवारीं गेल्या होत्या. त्याला त्यांनीं सदर मजकूर लिहिणाराचें नांव विचारलें असतां, तें त्यानें सांगितलें नाहीं ह्मणून चाबकाचा मारा सुरू केला. परंतु मोठ्या मिनतवारीनें त्यांतून बचावला. "मी बायकांवर हात टाकूं इच्छीत नाहीं" असें डेलिन्यूज कर्ता त्या झटपटींत त्या स्त्रियास ह्मणाला. त्यावर त्यांनीं त्याला जबाब दिला कीं, "पण त्यांच्या पोटावर लाथ मारण्यास लाज नाहीं वाटली?" या खटल्याचा पुढें काय परिणाम होतो तो पहाणें आहे.

जर्मनीच्या राजाच्या भेटीस, सरव्हियाचा राजा चालला आहे. यांत काय कारस्थान आहे तें अद्याप बाहेर पडलें नाहीं.

मेक्सिको प्रांतांतील युकेटन निरल्यांत एक तिकडील जुन्या इंडियनांचें शहर आहे त्याचा तपास लागावा ह्मणून पुष्कळ युरोपियनांनीं मेहनत घेतली आहे. परंतु मरणाच्या भीतीनें तेथें कोणी जाऊं शकत नाहीं. तथापि त्या शहराचा गांवकूस संबंध चांदीचा असल्याविषयीं शोध लागला आहे.

बर्फाचें फूल. सायबेरिया देशांत बर्फांत होणारें एक तऱ्हेचें फूल, प्रो. फिलीप एल्. न्यूमेन यांच्या आढळण्यांत आलें आहे. बर्फांत एका प्रकारचें रोप दर वर्षी अदमासें जानेवारीच्या आरंभीं उत्पन्न होतें. तें तीन फुटी पर्यंत वाढतें. तिसऱ्याच दिवशीं त्यावर एक फूल येतें, व तें २४ कलाक सुरेख असतें, नंतर तें करपूं लागतें आणि लौकरच गळून पडतें. या रोप्याला तीनच पानें येतात फुलाचा आकार, आकाशांतील चांदणीसारखा असतो. रोप निघाल्यापासून तिसऱ्या दिवशीं पानाच्या शेवटीं, हिऱ्याच्या तेजाप्रमाणें चकाकणारा एक लहानसा डाग दिसूं लागतो. तो डाग, हें त्या फुलाचें बीज होय. त्या कांहीं बिया, सेंटपिटर्सबर्ग येथें नेऊन बर्फांत लावल्या होत्या. त्या पासून जानेवारीच्या पहिल्या तारखेस सदरहु प्रमाणेंच रोपे तयार झालीं होतीं. ममीरा ह्मणून एक नेत्ररोगावर फार उत्तम वनस्पती आहे. तिचेंही वर्णन साधारणपणें या रोप्यासारखेंच ऐकण्यांत आहे. स० वि०

दुःचिन्हच ह्मणावयाचें! रशियाचे झार व काबूलचे अमीर हे उभय फार आजारी आहेत. ते जास्त दिवस वाचतील अशी आशा नाहीं. अमीर हे मेल्याचें बाहेर आलें आहे परंतु त्यांत खरेपणा नाहीं. अमीर जर निवर्तले तर काबुलांत मोठाच बंडावा होणार आहे, अर्थात आमचे इंग्रज सरकारास मोठी काळजी पडली आहे. कारण बंडखोर लोक एकाही मोगल्यास काबुलांत राहूं देणार नाहींत. त्याच प्रमाणें रशियाचे झार मृत्यु पावल्यास त्यांचे कित्येक सरदार लोक काबूलचे बंडखोर लोकांस हातांत घेऊन हिंदुस्थानावर स्वारी करण्यास चुकणार नाहींत. प्रसंग फारच आणीबाणीचा आला आहे तेव्हां इंग्रज सरकारानें दूर दृष्टी फेंकून हिंदुस्थानचें संरक्षण कशानें होईल हें पाहून त्या प्रमाणें त्वरित व्यवस्था करण्याचे हातीं घ्यावें. आज दिनपर्यंत हिंदुस्थान संरक्षणा करितां लाखो रुपये अमीरास दिले आहेत व यांच्या पश्चात जर विपरित प्रकार घडून आला तर दुर्दैवच समजलें पाहिजे.

चिन व जपान, त्याच प्रमाणें फ्रेंच व पोर्च्यूगीस हे आपापल्यापरी झगडत आहेत तेव्हां इंग्रज सरकारास चोहोंकडून एक बळकट बादृल आल्यावांचून दिसणार आहे.

रहिम नजर— पोष्ट खात्यांतील १० रुपये पगाराच्या आंतील नोकरांपासून दरसाल १ रुपया, व १० रु० हून जास्त पगारांचे नौकरांचे पगारांतून दरसाल २ रुपये त्या खात्यांतील सिक्युरिटी फंडाकडे आजपर्यंत काढून घेण्यांत येत असत, परंतु पोष्टाकडील डिरेक्टर जनरल साहेबांनीं रहिम नजर करून ह्या नौकराचे पगारांतून अनुक्रमें आठ आणे व १ रुपयाच घेण्याचें ठरविलें आहे.

ग्वाल्हेरचे महाराज माधवराव शिंदे साहेब हे आपल्या राणीसह मुंबई येथील दिपवाळीची रचना पहाण्यास ता० २९ रोजीं येथें येणार होती. मुक्काम ८–१० दिवस होणार आहे. दी० बं०

आलिथाच्या गेल्या वर्षीच्या जमेंतून खर्च वजा जाऊन २,००,००,००० रुपये शिलक राहिले. हिंदुस्थानचें उत्पन्न वाढत असतां खर्चीसही पुरत नाहीं.

फ्रान्स आपली १५,००० फौज मादागास्करवर पाठवीत आहे. ठा० अ०

## नोटीस

रा० नारायण वल्लद भिकाजी माळी राजणकार रहाणार तामगांव मोठे ता० जळगांव जिल्हे अकोले यांस नोटीस देणार वकी मर्दे लक्षुमण माळीण रहाणार खेरडे खुर्द तालुके जळगांव वऱ्हाड नोटिशीनें असें कळविते कीं तामगांव येथील मळयाचे शेत तुह्मांस एक वर्षा करितां रुपये २५ पंचवीसास लाविलें. रुपये माल तयार झाल्यावर तुम्हीं द्यावेत व माल घेऊन जावा अशा करारानें शेत लागवण केली. शेतात माल कापूस तयार होऊन तो तुह्मी घरीं घेऊन गेला. ठरल्या प्रमाणें रुपये मागितलें असतां रुपये देऊं अशा प्रकारच्या थापा देत आहा यावरून तुमचे मनांत रुपये देण्याचे नाहींत असें पक्के दिसून आल्यावरून तुम्हांस ही नोटीस देत आहे तर, नोटीस पावल्या पंदरा दिवसांत सदरहू रुपये २५ पंचवीस आणून देऊन निकाल करावा व रीतीप्रमाणें पावती घ्यावी. असें झाले नाहीं तर तुम्हावर कोर्टांत फिर्याद करून ह्या नोटिशीचे व अखेर निकाल होईपर्यंत फिर्यादीचे खर्चा सह सर्व नुकसान भरून घेतली जाईल म्हणून दिली नोटीस सही तारीख २३ अक्टोबर सन १८९४ इ०

(सही)

सहीची निशाणी नांगर वकी मर्दे लक्षुमण माळीण इच्या हातची असे.

## नोटीस

नोटीस बेशमी— शेख महेबुब वल्लद महमद हयाद मुसलमान रहाणार वडनेर गंगाई यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुजला २०० रुपये अक्षरी दोनशें रुपये घेऊन मौजे हिंगणी येथील सरवे नंबर २० पातील साहवा हिस्सा, कसबे यवदे येथील सरवे नं० ११ यातील निमे हिस्सा तुह्मांस ताबे गहाण लावून दिला त्यांत असें लिहून दिलें कीं सदर्हू जमिनेचा सरकारी सारा तुह्मी देऊन बाकीचा माल कसरीत खावा. त्याप्रमाणें सन १३०२ व १३०३ फसली सालाचा माल तुह्मी खाल्ला परंतु सरकारी वायदा दिला नाहीं तो सरकारांनीं दोन्ही सालां माझे जवळून घेतला. तो वायदा रकम रुपये ९१८९ तुमचे जवळून घेणें आहे ती रकम व तसेंच सन १३०२ फसली सालीं तुह्मांस दिलेले हिश्याचा व राहिलेले निमे हिशाचें पीक एकंदर खंडी ९ सर्व पाच एक ठिकाणींच ठेवलें होते ते सर्व तुम्ही एकल्यांनीं विकून सर्व रकम वसूल केली त्याबद्दल दर खंडीस रुपये ५० प्रमाणें रकम ३०० पैकीं माझे निमे हिशाची रकम १५०, शिवाय वरील दोन्ही सालची बांकी ही तुमचे कडून घेणें आहे अशी एकंदर तुमचे कडे रुपये २०२८९ घेणें आहेत ते मुजरा देऊन शेत यंदा सोडून देण्याचे होतें परंतु तुम्ही तसें केले नाहीं व साल मजकुरी शेत विनाकारण वाहिलें या करितां साल मजकूरचे पिका बद्दल तुमेवर दिवाणीत फिर्याद करणें भाग पडेल याकरितां नोटिशीनें आगाऊ कळविलें आहे. कळावें. ता० २४ माहे अक्टोबर सन १८९४ इ०

(सही)

निशाणी–मूळाजी वल्लद तिमाजी धनगर.


## घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे (ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी कांचेचे मुदाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकले नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता–
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक


☞ हें पत्र आकोलें येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनी छापून प्रसिद्ध केलें.